इ. सन. १९५१

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १७१६७

# उदारमतवादी लोकशाही

मॅसिमो सॅल्वादोरी

व्यंकटेश वकील

REFBK-0010276

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्रमांक

# उदारमतवादी लोकशाही

# उदारमतवादी लोकशाही

[ Liberal Democracy चा अनुवाद ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८५५२ विः
क्रमांक ११६१ नोंः दिः १३-२-५८

मूळ लेखक

**मॅसिमो सॅल्वादोरी**

अनुवादक

**व्यंकटेश वकील**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२७५
दा. क्र.

REFBK-0010276

**व्होरा आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.**

३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई २

Reproduced by permission of the Author

मूल्य : रु. १·५०

प्रकाशक : एम. के. वोरा, वोरा आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.
३ राउंड बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई. २
मुद्रक : मणिलाल टी. शाह, लिपिका प्रेस, कुर्ला रोड, अंधेरी.

अनुक्रम २४५२९ वि.
क्रमांक ११६१ दि. १३-२-५८

# स्वतंत्रतेच्या शत्रूंना एका उदारमतवाद्याचें उत्तर

# मॅसिमो सॅल्वादोरी

## ग्रंथकारासंबंधीं :

मॅसिमो सॅल्वादोरी हे मॅसाचुसेटस् येथील स्मिथ कॉलेज आणि व्हर्मान्ट येथील बेनींग्टन कॉलेज यांच्यांत इतिहासाचे प्रोफेसर आहेत. ते ब्रिटिश आणि इटालियन मातापितराची मिश्र संतति असून त्यांचें पालनपोषण इटालींत झालेलें आहे. त्यांनीं व त्यांच्या कुटुंबियांनीं तेथील फॅसिस्ट राजवटींत तीव्र छळ सोसला. युद्धकाळांत त्यांनीं इटालींतील "ब्रिटिश स्पेशल फोर्सेस" मध्यें चाकरी बजावली होती आणि त्यांना डी. एस्. ओ. आणि एम्. सी. पदव्यांनीं भूषविण्यांत आलें होतें; इटालींतलें दोस्तांचें लष्कर आणि इटालियन प्रतिकारकांची मध्यवर्ती संघटना राष्ट्रीय विमोचन समिती यांच्यांत संपर्क स्थापन करण्यासाठीं त्यांना मध्यस्थ नेमण्यांत आलें होतें. युद्धाचे शेवटील कांहीं महिने त्यांना शत्रुव्याप्त प्रदेशांमधील तुरुंगात काढावे लागले होते. युद्धानंतर ते आपला वेळ अध्यापन आणि युनेस्को व नाटो यांचे कार्य यांच्यात विभागून व्यतीत करीत आहेत. "दि राइज ऑफ् मॉडर्न कम्युनिझम" (आधुनिक साम्यवादाचा उदय), 'अमेरिकन कॅपिटालिझम" (अमेरिकन भांडवलवाद) इत्यादि ग्रंथाचे ते लेखक असून, इंग्लंडमधील लंडनच्या "लिबरल इंटरनॅशनल" च्या त्रैमासिक "वर्ल्ड लिबरॅलिझम" (जागतिक उदारमतवाद) मध्यें पार्टीनें १९५६ सालीं "मानवी स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य वर्धिष्णु व्हावें" अशी तरफदारी करणारे एक पत्रक काढलें होतें.

ज्याचे अनुयायी शिकागोपासून तों टोकियोपर्यंत आणि जर्मनींत दहा कोटीच्या संख्येइतके होते, त्या उन्माद मूर्तीनें नियमित पणानें तें 'अमेरिकन नोटस्' (अमेरिके संबंधीं स्फूटें) लिहीत असतात.

# प्रस्तावना

आपल्यापुढें एक भव्य दृश्य ठाकलेलें आहे. तीन अब्जांपेक्षां अधिक असणारी मानवजाति आतां आंदोलित झालेली आहे. इतकें परिणामकारक, एकसमयावच्छेदेंकरून आशा, अपेक्षा आणि अनर्थआपदा यांनीं परिपूर्ण असलेलें असें आंदोलन यापूर्वी कधींहि झालें नाहीं. माणूस कूच करीत आहे खरा, परंतु अनेक भिन्न दिशांनीं, कुणी उज्ज्वल भवितव्याकडे जात आहेत. तर दुसरे तमिस्रेकडे. मार्गाचीं नांवें देखील भिन्न भिन्न. **लोकशाही** मार्ग स्थितिनिष्ठ, उदार किंवा समाजवादी; **रूढीवादी** ( परंपरावाद ), ज्याचें अनुसरण अल्जेरियाचे उलेमा, पोर्तुगालचे ( कंपूवादी ) कार्पोरेटिस्टस्, केनयाचे माऊ माऊ, आणि मिकॅडोचे भक्त करीत असतात तो; **राष्ट्रवाद,** आंधळ्या निष्ठेच्या अतिरेकांत व्यक्त झाल्यामुळें ज्याचें पर्यवसान फॅसिझम-कम्युनिझममध्यें होतें तो; आपल्या वाटचालीच्या शेवटीं मार्गावर स्वत:साठीं काय वाढून ठेवलेलें आहे याची जाणीव आमच्यापैकीं पुष्कळांना नाहीं. सहस्र विविध मुखंडांच्या भाषणांवरून एखाद्याची अशी समजूत होते कीं आपण सारे एकाच मुक्कामीं पोहोंचण्याच्या प्रयत्नांत आहोंत. नेमस्त आणि जहाल ( डावे आणि उजवे ), गोरे, काळे आणि सावळे, सगळेच स्वातंत्र्य व लोकशाही आणि प्रगति, समृद्धि व शांतता ह्यांच्या संबंधीं बोलत असतात. एक हजार वर्षांनीं जर इतिहासकार विसाव्या शतकांकडे त्याच्या भावना आणि विकार यांच्यापासून अलिप्त राहून पाहूं लागले, तर ते बुचकळ्यांत पडतील, कीं—असे एक विचाराचे असलेले हे लोक मानवांच्या इतिहासांतील अत्यंत भीषण (मोठ्या) कत्तलींचे अपराधी ठरण्याइतकी मजल जाईपर्यंत एकमेकांचे वैर करूं तरी शकले कसे ?

" मानवमात्रांना स्वातंत्र्याचा हक्क आहे. " असें १७७६ सालची स्वातंत्र्याची अमेरिकन घोषणा सांगते. " मानवमात्र स्वतंत्र आहे, " असें १७८९ मध्यें फ्रेंचांनीं मानवी आणि नागरिक हक्कांच्या घोषणेंत लिहून ठेवलें आहे. " या क्रांतीला नांव देण्यांत येईल...स्वतंत्रता. "–अशी घोषणा १९१९ सालीं फॅसिझम्‌च्या संस्थापकानें केली. " फॅसिझम् हा आमच्या स्वातंत्र्याचा संरक्षक. " असें पालुपद तरुण इटालियनांनीं गायिलें, "स्वातंत्र्याचा सुदिन....तो हाच. " जर्मन फॅसिस्टांनीं प्रतिसाद दिली. अमेरिकन कम्युनिस्ट पार्टीनें १९५६ सालीं " मानवी स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य वर्धिष्णु व्हावें, " अशी तरफदारी करणारें एक पत्रक काढलें.

शिकागोपासून टोकियोपर्यंत आणि जर्मनींत ज्याचे दहा कोटीच्या संख्येंत

अनुयायी होते, त्या उन्मादमूर्तीनें नुरेंबर्गच्या प्रचंड मेळाव्यांच्यापुढें वुभुक्कार केला, "खरी लोकशाही". सर्वत्र पसरलेले एक कोटी कम्युनिस्ट आणि वहुतेक रशियन यांचें आराध्यदैवत बनलेल्या वेडसर नेत्यानें क्रेमलिनच्या निःशब्द दालनांतून हुंकार भरला, "खरी लोकशाही". गेल्या पंधरा वर्षांच्या काळांत सुलतानशाही अधिक कार्यक्षम होण्यासाठीं अनुलक्षिलेले सर्व नवे पंथ, अर्जेंटिनाचा "**जस्टिसीऑलिस्मो**" (न्यायवाद), अमेरिकन "फर्स्टर्स"ची भवितव्यतेची लाट (?), युगोस्लॉव्हचा नॅशनल कम्युनिझम (राष्ट्रीय समाजवाद), या सर्वांच्यावर "खरी लोकशाही" हें लेबल चिकटविलेलें आहे.

आपल्याला अनुरूप वाटतील तसे शब्द योजण्याचा हक्क आम्हांला आहे. परंतु आपल्याकडून खूपच अतिक्रमण झालेलें आहे. आमच्या अपेक्षा वाढविणाऱ्या आणि आमच्या आत्म्यांना सांत्वन देणाऱ्या शब्दप्रयोगांची चिकित्सा न करतां त्यांना प्रमाणभूत मानून आपल्यामधले पुष्कळजण कड्याच्या टोकाकडे हाकलीत नेलेली मेंढरें बनलेले आहेत. स्वातंत्र्याचें नांव घेऊन आमच्यावर जुलूम होत आहे; आणि लोकशाहीच्या नांवाखाली आमचेवर एकशाही सत्ता गाजत आहे; शांततेचा जप करीत मास्कोनें वर्षानुवर्षे युद्धाची तयारी चालविली होती; समृद्धीच्या नांवाखालीं पेपिंग हा चिनी जनतेचें राहणीचें मान (फॅसिझमनें इटालियनांचें घटविलें होतें तसें) खालीं ओढत आहे. प्रगतीचे नांवाखालीं संस्कृति पूर्वकालीन समाजांच्या समष्टिवादाचें पुनरुज्जीवन कम्युनिस्ट करीत आहेत, मध्ययुगीन गिल्डसचा (स्वहिताय स्वसुखाय) कंपूवाद परंपरावादी पुनरुज्जीवित करीत आहेत, आणि यच्चावत् परकीलोकांना दस्यु मानण्याचा प्राचीनांचा वंशाभिमानवाद राष्ट्रवादी जागृत करीत आहेत. निदान दोनशें तरी व्याख्या स्वातंत्र्याच्या आणि तितक्याच लोकशाहीच्या देखील असतील. रूसोला (आणि जॅकोबिन व कम्युनिस्ट यांना) अभिप्रेत असलेली सर्वसाधारणांच्या किंवा समष्टीच्या इच्छेपुढें व्यक्तीची शरणागति, किंवा वक्लेला (आणि ख्रिस्ती परंपरावाद्याला) अभिप्रेत असलेली स्वातंत्र्याची मोक्षाशी झालेली तद्रूपता, अथवा हेगेलला (आणि राष्ट्रवादी व फॅसिस्ट यांना) अभिप्रेत असलेलें, एखाद्या सर्वशक्तिमान् व सर्वव्यापी राज्याचें आज्ञापालन हें सर्व स्वतंत्रता नव्हे, या विषयीं आपलें मन अत्यंत स्वच्छ राखलें पाहिजे. आपल्याला हें देखील मनोमन स्पष्ट समजून घेतलें पाहिजे कीं केवळ समता म्हणजे लोकशाही नव्हे, (सर्व सत्ताधारी ओटोमन साम्राज्यांत शेवटील पांचशें वर्षांत अत्यंत समताप्रधान

समाज होता); तद्वतच ती बहुमताची इच्छा नव्हे, ( प्रशस्त आणि प्रांजळ बहुमत हिटलरचा जर्मनी किंवा पेरॉंचा अर्जेन्टिना लोकसत्ताक बनवूं शकलें नाहीं ); अथवा लोकशाही म्हणजें पितृवत् प्रजापालन करणाऱ्या आदर्श सरकार-बद्दल लोकांतील बहुजनसमाजाची निष्ठा आणि ममता देखील नव्हे. (आगस्टस, ली-शिह्-मिन, हरुन अल रशीद, आणि अकबर यांना मुख्यत: आपल्या प्रजा-जनांचें कल्याण आणि सौख्य यांचा ध्यास असल्यामुळें, ते प्रजेचे आवडते होते, परंतु रोमन, चिनी, अरब, आणि मोगल साम्राज्यांत लोकशाही नव्हती. )

मग स्वतंत्रता आणि लोकशाही म्हणजे काय ? स्वतंत्रता म्हणजे निर्बंध-रहित निवड, व्यक्तिमात्राचा आपल्या कर्तव्याचा मार्ग ठरविण्यासंबंधीचा स्वयं-निर्णय. लोकशाही म्हणजे स्वतंत्रतेची संघटना, राजकीय दृष्ट्या संघटित अस-लेल्या समाजाच्या घटकांचें स्वातंत्र्य ज्यांच्या मार्फतीनें प्राप्त करून घेतां येते अशा संस्था. स्वतंत्रतेची संघटना म्हणून लोकशाहीचा निर्देश करण्यासाठीं बिन-चूक शब्दप्रयोग म्हणजे उदारमतवादी लोकशाही; स्वतंत्रता आणि समता यांची परस्पर गुंफण ज्या पद्धतीनें झालेली असते तीच तिचें अर्थपूर्ण रूप. ( सिद्धांती कांहींहि म्हणोत, इतिहासाची साक्ष—मनुष्यजातीचा अनुभव—असें दर्शवितो कीं समतेविना स्वतंत्रता म्हणजे केवळ एक हक्क आहे आणि कधीं ना कधीं तरी त्याचें पाऊल स्वतंत्र संस्थांच्या विनाशाकडेच वळतें; स्वतंत्रतेविना समता म्हणजे शुद्ध जुलूम होय.) परंपरावादी, राष्ट्रवादी, आणि कम्युनिस्ट एकमेकांचें वैर करीत असतीलहि; त्याहिपेक्षां अधिक वैर ते उदारमतवादी लोकशाहीचें करतात, कारण त्यांच्याठायीं समानपणें स्वतंत्रतेविषयीं वैरभाव आहे. आपल्या आधु-निक युगांत उदारमतवादी लोकशाही उत्तर अॅटलांटिक राष्ट्रांमधून जन्मास आली. परंतु हा केवळ इतिहासाचा योगायोग आहे. येशू यहुदी कुळांतला असल्याचें ख्रिस्त्यांना किंवा गौतम आर्यवंशांतील असल्याचें बौद्धांना जें महत्त्व वाटतें त्यापेक्षां त्याचें महत्त्व अधिक नाहीं. स्वतंत्रता ही सर्वव्यापी आहे, नुसती पश्चिमेची नव्हे. उदारमतवादी लोकशाही देखील पश्चिमेचा मक्ता नव्हे, स्वतंत्रते-ला सर्वोच्च स्थान जे देतात, त्या सगळयाच खंडांतील जनतेची तिच्यावर सत्ता आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
१०२८५
अनुक्रम २८५२५ वि: निबंध
क्रमांक ११६१ नों: दि: १३-२-५८

# धांवतें समालोचन : १

"अनेकांचे मनःक्षोभ आणि थोड्याजणांचे निर्णय,"—भावना आणि बुद्धि—ज्यांना बर्ट्रान्ड रसेल गेल्या पन्नास वर्षांमधील लढाया, क्रांत्या, व सर्व प्रकारचे आणीबाणीचे संकटकाल, यांच्या योगानें घडून आलेल्या परिवर्तनांचें प्रमुख कारण म्हणून मान्यता देतात, त्यांना आगामी दशकांच्या दरम्यान गतकालांत बजावलेल्या कामगिरीपेक्षां अधिक नसली तरी, निदान तितकीच कामगिरी बजावावी लागणार आहे. स्पष्ट विचारसरणी आणि निर्भेळ बुद्धिवादापासून सर्वतः भिन्न असलेल्या बुद्धीचा समंजस उपयोग यांची गरज मनःक्षोभाला लगाम घालण्यासाठीं आणि शहाणपणाच्या निर्णयाप्रत पोंचण्यासाठीं लागत असते. दुर्बोध भावनावशता आणि पंथीय कडवेपणा यांच्यामुळें बलवत्तर झालेल्या क्षुब्ध चळवळींचा जोरांचा हल्ला परतवून लावण्यासाठीं आणि निष्क्रीय क्लैब्याकडे घेऊन जाणारी, अथवा पुष्कळशा उदारमतवादी लोकशाहीवाद्यांना स्वतंत्रतेच्या वैऱ्यांच्या गोटांत सामील करण्यास कारणीभूत होणारी निराशा खणून काढण्यासाठीं निश्चल निष्ठेवर आधारलेल्या सहनशील धैर्याची गरज असते.

जगांत आज कायदेशीर अशीं सुमारें नव्वद सार्वभौम राष्ट्रें आहेत. त्यांच्या राज्यघटनांमध्यें कांहींहि नमूद केलेलें असो, परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र त्यांच्यामधील तिसऱ्या हिश्शांपेक्षां देखील कमी राष्ट्रांतील नागरिकांना मात्र स्वातंत्र्य उपभोगायला मिळतें. इतरत्र प्रत्येक राष्ट्रांत चार शतकांच्या पूर्वी उदारमतवादाच्या उदयकालांत जशी अनियंत्रित सुलतानशाही नांदत होती, तशी आजहि भरभक्कम आहे. तेथें जुलूम राज्य करतो, नेत्यांचे स्वतःचे प्रमाद आणि आपसांतले मतभेद यांच्या शिवाय अन्य कोणतेंहि नियंत्रण त्यांच्या सत्तेवर असत नाही, सांप्रदायिकपणा बळजबरीनें लादण्यांत येतो, आज्ञापालन आणि गुलामगिरी यांचाच लेख प्रजाजनाच्या ललाटीं असतो (आणि हा ललाटलेख बहुधा त्यांना प्रिय देखील वाटत असतो) **इण्डिया क्वार्टर्ली** या नियतकालिकांत १९३३ मध्यें प्रसिद्ध झालेल्या एका लेखांत संयुक्त राष्ट्रसंघाच्या तेव्हांच्या साठ सभासद राष्ट्रांच्या राजकीय रचनेविषयीं वर्णन करतांना मी लिहिलें होतें,—"लोकशाही संस्थाचें अस्तित्व सध्या १८ राष्ट्रांमधून सत्यस्वरूपांत आहे. आशियांतील पांच

राष्ट्रांना लोकशाही कार्यपद्धति लागू करण्यांत मुख्यतः निरक्षरता, दारिद्र्य, किंवा अस्थिर राजकीय परिस्थिति यांचाच गंभीर आळा पडतो. तरी देखील समुदायां-कडून सत्तेचा अंमल होत असतो.......तिचा वापर ते अंतर्गत स्वतंत्रतेची, आणि लोकसत्ताक संस्थाची वाढ करण्याप्रीत्यर्थ करीत आहेत. म्हणजे अशा रितीनें संयुक्त राष्ट्रसंघांत एकूण २३ राष्ट्रें लोकशाहीच्या विकासार्थ झटण्याची कळकळ बाळगतात. एकसत्ताक (प्रचलित परिभाषेंत हुकूमशाही) राज्यपद्धतीचीं लक्षणें युनोच्या अकरा सभासद राष्ट्रांच्या राजकीय रचनेंत दिसून येतात. इतर २६ राष्ट्रांमधून सत्तेचीं सर्व सूत्रें एखाद्या सर्वाधिकाऱ्याच्या किंवा राजकीय, वांशिक अगर सामाजिक बाबतींत अल्पसंख्य असलेल्या एखाद्या गटाच्या हातीं असून त्यांचा लोकशाहीच्या विकासाला विरोध आहे. ते बहुसंख्यांकांना त्यांच्या राजकीय स्वातंत्र्यापासून वंचित ठेवतात; आणि त्यासंबंधीचा विरोध चिरडून अगर दडपून टाकतात. या सव्वीस राष्ट्रांचें सर्वसाधारण लक्षण 'अधिकारशाही' असून, तिचें स्वरूप सगळ्या किंवा बहुतेक बिन राजकीय क्षेत्रांत नागरिकांना योग्य मोकळीक देण्यापुरतें 'हुकूमशाही'हून निराळें आहे." गेल्या तीन वर्षांच्या अवधींत युनोच्या सभासद राष्ट्रांमधील किंवा सगळ्याच सार्वभौम राष्ट्रांमधील लोकशाही, हुकूमशाही, व अधिकारशाही राष्ट्रांच्या परस्पर प्रमाणांत फारसा बदल झालेला नाहीं.

स्वातंत्र्याच्या आकांक्षेनें प्रोत्साहित झाल्यामुळें जेथील नागरिक स्वतंत्र आहेत, अशीं राष्ट्रें मानवी व्यवहारांमधील गतिमान घटकावयवांचें प्रति-निधित्व अजून करीत आहेत, हें मात्र खरें; ते गति देतात आणि प्रगतीचें आदिकारण बनतात; गुलाम राष्ट्रांमधलीं कृत्यें म्हणजे केवळ स्वतंत्र जनतेमध्यें उगम पावलेल्या चैतन्यप्रद गोष्टींचे हुंकार असतात. परंतु आपण आपली फसवणूक करून घेऊं नये. स्वतंत्र राष्ट्रांचा कल मागील पिढ्यांच्या काळीं मानवी प्रयत्नांच्या प्रत्येक कार्यक्षेत्रांत आणि जगाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यांत व्यापक स्वतंत्रतेकडे झुकत होता; त्या मानानें आजचीं स्वतंत्र राष्ट्रें, उत्तर अमेरिकन राष्ट्रांचा संभाव्य अपवाद वगळल्यास, कमी गतिमान बनलेलीं आहेत. आपल्या उदाहरणानें इतरांवर त्यांचा जो प्रभाव पडतो, तो पूर्वी पडत असलेल्या प्रभावाच्या प्रतिबिंबाची पुसट छायामात्र आहे.

स्वतंत्र राष्ट्रांतून देखील आज नजीकच्या भूतकाळाच्या मानानें मानवाच्या

स्वतंत्रतेच्या कक्षेचा संक्षेप झालेला आहे. जनता, कल्पना आणि माल यांचें एका देशांमधून दुसऱ्या देशांत जाणें येणें वाढत्या प्रमाणांत दुष्कर होत असल्याचें दिसून येत आहे. अगणित नवनवीन कल्पनांच्या फुलवऱ्याला ज्यांच्या मतांचें प्रोत्साहन मिळत असे, त्या अन्य जनांच्या मतांविषयीं सहिष्णु धोरण स्वीकारण्याऐवजीं हटवादी विचारसरणी प्रसृत होत आहे, व सत्याच्या शोधार्थ मनें मिटलेलीं आहेत. दुर्वृत्तीशीं झुंज घ्यायला आणि दोषांची दुरुस्ती व प्रमादांचें परिमार्जन करायला नागरिक स्वतःवर आणि स्वकृतींवर विसंबून राहण्याऐवजीं सरकारी हस्तक्षेपासाठीं आर्जवें करतात, आणि अशा रितीनें स्वकृतींच्या कक्षेचा संकोच करून घेतात. अधिकारपदांवर असलेल्यांना कह्यांत ठेवणें वाढत्या प्रमाणांत दुष्कर होत आहे. आणि त्यांना नियंत्रणाखालीं आणण्याची इच्छा देखाल कमी कमी होत चालली आहे. बऱ्याच जणांना असा विचार करायला देखील फुरसद असत नाहीं, कीं जर कां एकदां भस्मासूर मातला, तर मग नागरिकांना आपल्या प्रमादांचे, जे मानवाच्या आणि म्हणूनच त्याच्या हातून जें कांहीं निर्माण झालें, त्याचा अटळ ललाटलेख बनलेले आहेत, त्यांचें परिमार्जन करतां येण्याचें सामर्थ्य कधीं देखील येणार नाहीं.

भूमध्यसागराच्या परिसरांमधील प्राचीन जगतांतल्या स्वतंत्र नगरांमध्यें थोड्या शतकांपुरती, आणि मध्ययुगीन युरोपच्या स्वतंत्र (जमाती) 'कम्यून' मधून अल्पकाळ स्वतंत्रता अस्तित्वांत होती. आधुनिक राष्ट्रांतून स्वातंत्र्याची स्थापना होण्यास कारणीभूत झालेली चळवळ इंग्रजी भाषा बोलणाऱ्या जगतांत जवळ जवळ दहा पिढ्यांपासून आणि युरोप खंडांतील राष्ट्रांत, अन्य खंडांमधील त्यांच्या वसाहतींत व त्यांच्या प्रभावाखालील बिगर युरोपियन राष्ट्रांत सहा सात पिढ्यांपासून चालत आहे. फिलीप, व सीझर यांना उद्धारकर्ते मानून त्यांचें स्वागत करणारे ग्रीक व रोमन, आणि एके काळीं स्वतंत्र असलेले घेंट व फ्लॉरेन्स या शहरांचे नागरिक, कीं ज्यांनीं बर्गन्डीयन आणि मेडिसी लोकांना आपल्या नगरांचे स्वामी बनविले, त्यांच्या घोर प्रमादांची पुनरावृत्ति आज विसाव्या शतकामध्यें होत आहे. ग्रीक व रोमन, फ्लेमिग व टस्कनी येथील लोक, या सर्वांना "खरें" स्वातंत्र्य हवें होतें आणि त्यांच्या पदरांत पडली जुलमी सुलतानशाही, त्यांना हवी होती शांतता आणि पदरीं पडल्या आणखी लढाया, त्यांना हवी होती समृद्धि आणि पदरांत पडलें अल्पावधीच्या भपकेबाज

शोभेनंतरचें दारिद्र्य. तत्कालीन पुरोगामी लोकांना स्वतंत्र संस्थांचे रक्षणकर्ते प्रतिगामी वाटत असून त्यांना फिलीप व सीझर, बर्गंडीयन मेडिसी अशांची गरज वाटत होती. आजचे पुरोगामी देखील तसेंच क्रुश्चेव्ह, माओ, टिटो, फ्रॅन्को आणि नासर यांना अनुकूल आहेत.

सतराव्या, अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांमधील महान् क्रांत्यांचा वारसा असलेले उदारमतवादी आज गोंधळून गेलेले आहेत, आणि म्हणूनच कमकुवत बनलेले आहेत. स्वतंत्रता एक महान् स्वप्न बनलेली होती आणि नित्याप्रमाणें वास्तवता त्या स्वप्नाचें केवळ एक पुसट प्रतिबिंब मात्र ठरली. उदारमतवादी कधींहि भारलेले नव्हते इतके, अस्तित्वांत असलेल्या स्वतंत्र समाजांमधील लाभकारक गोष्टी संपूर्णपणें दुर्लक्षित करून त्यांच्यांतील दोषांवर नेमकें बोट ठेवणाऱ्या टीकेनें, किंवा फक्त पूर्ण जीवांमध्येंच उत्स्फूर्त होणाऱ्या आदर्श स्वातंत्र्याचें उद्दिष्ट अनुलक्षून आमच्या मर्यादित व म्हणूनच अपूर्ण मानवी स्वभावाला अनुरूप अशा अपूर्ण स्वातंत्र्याची हानि घडवून आणणाऱ्या पूर्णत्वानें मंत्रमुग्ध होऊन गेलेले आहेत. उदारमतवाद्यांनी स्वतंत्रता ही समता; किंवा स्वप्नांत वावरणाऱ्या प्रारंभ कालांतील लोकांच्या कल्पनेंतच केवळ अस्तित्वांत असलेल्या सर्व सामाजिक तत्त्वांचें सुसंवादी एकत्रीकरण; किंवा एखादा गट, राष्ट्र अगर वर्ग यांचा स्वायत्तपणा; किंवा प्रगति, शांतता, सुस्थिति, सौख्य, यांचे बरोबर मानलेली होती. उदारमतवादाच्या प्रयोगावस्थेंत असें आढळून आलें, कीं विषमतेचा जे स्रोत होऊं शकतील, अशा भेदांची जोपासना स्वतंत्रता करीत असते; तसेंच एखाद्या गुलाम समाजापेक्षां अधिक तीव्र क्षोभाची अभिव्यक्ति वारंवार एखाद्या स्वतंत्र समाजामधून होत असते (कीं एखाद्या अनिर्बंध अर्थव्यवस्थेत वर्गकलह विशेषेंकरून तीव्र होऊं लागतो), तसेंच एखाद्या गटाचें स्वातंत्र्य त्याच्या सभासदांच्या बंधनमुक्ततेमुळें संकटांत येऊ शकतें; तसेंच उदारमतवादी जगांत प्रजेवर लादण्यांत येणाऱ्या युद्धांसंबंधीं वर्ज्यता किंवा अलिप्तता अस्तित्वांत नव्हती, कीं मालमत्तेची अपार सुबत्ता असून देखील तिच्यामुळें नसलेल्या वस्तूंच्या अभावाची वाढती जाणीव नेहमींच नष्ट होत नव्हती; कीं सौख्याचा स्वतंत्रतेबरोबर सुतराम संबंध नव्हता. या कारणानें बरेचसे उदारमतवादी धैर्य खचल्यासारखे झाले किंवा "खरी" स्वतंत्रता ते प्रथमतः एखाद्या 'सोशालिस्ट' (समाजवादी) समाजांत, व तदनंतर एखाद्या 'कम्युनिस्ट'

(साम्यवादी) समाजांत धुंडाळूं लागले.

उदारमतवादी कल्पनेचा प्रसार करायला हा काळ अनुकूल असला पाहिजे, परंतु प्रसाराच्या ऐवजीं माघार मात्र होत आहे. अगदी थोड्या काळापूर्वी जेम्स वारवर्गनें लिहिलें कीं, "बहुसंख्य मानवजाति ही अत्युत्तम भवितव्य कसें घडेल याची यत्किंचतहि स्पष्ट कल्पना केल्यावांचून एका वेगळ्याच भवितव्याकडे कूच करीत आहे." या कूचाचें उद्दिष्ट प्रगति आहे, मानवाच्या या जगामधील अस्तित्वाचा मानसिक आणि भौतिक दर्जा उंच करण्याचें आहे. ज्या प्रगतीचा पुरस्कार उदारमतवाद नेहमींच करीत असतो, ती म्हणजे परिपूर्त जीवन होय, अवांतर गोष्टींप्रमाणेंच निसर्गाच्या शक्तींवर अत्युत्तम प्रभुत्व प्राप्त करून देणारें आणि म्हणून अधिक सुस्थिति मिळवून देण्याचें ज्ञान होय. प्रगति ही उदार लोकशाहीच्या संस्थांमध्यें मूळांतच वसत असते. पूर्वेतिहास कसाहि असो, अधिक चांगल्या जीवनाकडे डोळे लावून बसलेल्या कोट्यावधि लोकांना प्रगति साधून घेण्याचा उदारमतवादी मार्ग फारसा आकर्षित करीत नसतो. उदारमतवादी मार्ग असें गृहीत धरीत होता कीं स्वतंत्रता आणि समता यांची हमी नागरिकांना देणाऱ्या कायद्यांच्या चौकटीतले व्यक्तीचे सृजनात्मक प्रयत्न, हे मनःपूत अधिकारांच्या सामर्थ्यानिशीं सज्ज असलेल्या राज्यकर्त्यांच्या प्रयत्नांपेक्षां श्रेष्ठतर असतात. बहुसंख्य मानवांना जर कशाचें कांहीं आकर्षण वाटत असेल तर तें "नव रचनां"च्या विविधपणांचें होय. शेवटीं कालांतरानें त्या नवरचना प्रगतीच्या वैरी ठरतात, कारण राजकीय अरेरावी, आर्थिक गुलामगिरी आणि पूर्ण सिद्धांतीकरण यांची अंमलबजावणी प्रतिगामी संस्थाच्या द्वारें करतांना, जिच्यावांचून सतत प्रगति होणें अशक्यप्राय असते, ती सृजनशीलतेची प्रवृत्ति खच्ची करण्याइतक्या थरापर्यंत, त्या दडपशाही करीत असतात.

मानवाचा अनुभव दर्शवितो कीं प्रगति म्हणजे विमुक्तीकरणाची पद्धति होय, राजकीय शिरजोरी आणि विचार-नियंत्रण या जुलमाच्या जुळ्या मध्यस्तीच्या मार्फतीनें पोलादी प्रावरणांतील परंपरांशी पूर्ण तादात्म्य जबरदस्तीनें लादतांना जी तटबंदी आमच्या भोंवतीं उभारण्याचा सतत प्रयत्न चालत आहे, तिच्यापासून व्यक्तीचें क्रमाक्रमानें होत असलेलें विमोचन म्हणजे प्रगति होय. आपल्या स्वतःच्या भवितव्याचा लवाद बनण्याच्या अति महत्वाच्या जबाबदारीकडे आणि श्रेष्ठ कर्तबगारीकडे नेणारे प्रत्येक पाऊल होय. स्वतंत्रता म्हणजे ती प्रेरणा कीं जी

मनुष्यांना प्रगतीकडे धाडीत असते. ती तेव्हांच प्राप्त होते कीं, जेव्हां "श्रेष्ठ" आणि "कनिष्ठ" यांच्यामध्यें सत्य, सम्पदा किंवा सत्ता यांचा वतनदार व इतरेजन यांच्यांत कसलाहि भेदभावाचा तडा जरा देखील असत नाहीं; जेव्हां सर्वांना आपल्या विचारांची जोड सत्याला देणें, स्वतःच्या भौतिक परिस्थितींत सुधारणा करणें, आणि राजकीय अधिकारांची अंमलबजावणी करण्यांत वांटा उचलणें शक्यप्राय होतें.

ज्या प्रमाणांत स्वतंत्रता भेदाभेद आणि समानता निर्माण करीत असते, ज्या प्रमाणांत प्रत्येक व्यक्तीला स्वत्व प्राप्त करून घेण्याची शक्यता लाभत असते, आणि दडपून टाकण्यांत येत नाहीं, त्या प्रमाणांत प्रगति होत असते. ज्या राष्ट्रांत स्वातंत्र्य नसतें, निव्वळ भेदाभेद असतात, त्या राष्ट्राला फार प्रगति करायला नालायक अशा सवर्ण समाजाची कळा येते. समता जेथें स्वतंत्रतेपासून फारकत घेते आणि एक सारखेपणा बनते, तेथें प्रगति तितकीच दुष्कर ठरते. नजीक पूर्वेतले समानताप्रधान इस्लामी समाज भेदांचा अति बुजबुजाट असणाऱ्या हिंदुसमाजापेक्षां कांहीं अधिक प्रगत नव्हते; इतर प्रत्येक बाबतीत भिन्न असलेले ते समाज स्वतंत्रतेच्या अभावाच्या—म्हणजेच प्रगतीच्या अभावाच्या—बाबतीत समसमान होते.

अटलांटिक महासागराच्या उभय बाजूकडील आमच्या पूर्वजांना सुसंस्कृत समाजांत स्वातंत्र्याची अंमलबजावणी करण्याकरितां आवश्यक असणाऱ्या संस्थांविषयी स्पष्ट दृष्टि होती. ही दृष्टि आज तितपत स्पष्ट नाहीं आणि म्हणूनच बऱ्याच उदारमतवाद्यांनी उदारमतवादाचा त्याग केला व असा मार्ग पत्करला आहे की ज्याचें पर्यवसान चार पिढ्यांत त्यांच्या मधल्या बऱ्याच जणांना जुलमी राज्यपद्धतीचे कट्टे समर्थक बनविण्यांत झालेलें आहे. ज्यांनी उदारमतवादी आदर्शाची रचना केली होती, त्यांना हें अवगत होतें, कीं नागरिकांनीं मोकळ्या वातावरणांत निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या सभेंतील वाटाघाटीतून निष्पन्न झालेला राज्यकारभार, राष्ट्रीय मंडळाच्या सभासदांमध्यें अधिकाराची समान वाटणी, कार्यपद्धतीवर भर, मतभेद, विरोध, आणि पाखंड यांचे विषयीं सहनशीलता ह्यांची गरज स्वतंत्रतेला असते. अशा संस्था पूर्णतः निर्दोष असत नाहींत, त्यांच्यांत सुधारणा करण्यासाठी कितीहि प्रयास केले तरी त्या नेहमी सदोष राहाणारच; परंतु त्यांच्या विना स्वतंत्रता अस्तित्वांत राहूं शकल्यास तो

केवळ अनपेक्षित योगायोग होय,—संघटित समाजाचें मूलभूत रूप म्हणून नव्हे.

स्वतंत्र संस्थाचे फायदे जे नाकारीत असतात, असे उदारमतवादाचे प्रतिज्ञा-बद्ध वैरी विपुल, बलिष्ठ व सुसंघटित आहेत. ते म्हणजे 'उजवे'. त्यांच्यांत फॅसिस्ट्, नाझी, नॅशनलिस्ट, धर्मवेडे आणि दुराग्रही ख्रिस्ती व मुसलमान यांचा समावेश आहे. 'डाव्या'गटांत जे आहेत, ते एके काळीं प्रामाणिकपणानें, जसजसा काळ लोटत चालला तसतशी त्यांत घट होत गेली तरी, उदारमतवाद आणि उदार-मतवादी लोकशाही यांच्याशी "खऱ्या" स्वतंत्रतेचें नांव घेऊन लढले; ते स्वातंत्र्या-च्या संस्था कायम ठेवीत आहेत, परंतु त्यांच्यामधला संपूर्ण आशय मात्र ते हिरावून घेतात; ते रयतेला नागरिक असल्याचें आणि गुलामाला स्वतंत्र गृहस्थ असल्याचें सांगतात. त्यांत कम्युनिस्ट, 'सहप्रवासी', अधिकारवादी, किंवा डावा गटवाले सोशॅलिस्ट, पंथवेडे आणि दुराग्रही समष्टिवादी आहेत, त्यांतले लक्षावधि लोक "खऱ्या" स्वतंत्रतेचें नांव घेऊन आणि स्वत:ला मानीव सर्वसाधाण मनीषेची अभिव्यक्ति समजून आतांपर्यंत अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि समाजापेक्षां परा कोटीच्या जुलमी, आणि कम्युनिझमचा विजय व्हावा म्हणून जे मेले, त्या रशिया-मधील दीड कोटि आणि चीनमधील दोन कोटि लोकांनीं प्रत्यक्षपणें पाहिलेल्या पराकोटीच्या क्रूर समाजांना पाठिंबा देतात आणि त्यांचे प्रेमभरानें स्तुतिपाठ गातात. येथें आपण पुन्हां आपली फसवणूक करून घेतां कामां नये; कम्युनिस्टांचें आवाहन मोठें महत्त्वाचें आहे, तें लेलिन आणि स्टॅलिन यांच्या काळांपेक्षां आतां कमी महत्त्वाचें नाहीं, इतर कोणत्याहि राजकीय चळवळीमधील सभासदांपेक्षां कम्युनिस्ट अधिक उत्साही आहेत, त्यांच्या ध्येयाविषयीं त्यांची निष्ठा दुरभिमानी आहे त्यांची विजिगीषा प्रखर आहे. ते एक शक्ति बनलेले आहेत, आणि केवळ तशाच एखाद्या तुल्यबल शक्तीला त्यांची प्रगति रोखून धरतां येईल. जोंपर्यंत हा संघर्ष, संतप्त किंवा शीत, लष्करी किंवा वैचारिक, चालत आहे, तोंपर्यंत सध्यां धुक्यानें झांकळून गेलेल्या उदार लोकशाहीच्या भोंवतालचें तें पटल पूर्णपणें काढून टाकणें, आणि ज्यांना स्वतंत्रतेचा अर्थ समजतो, त्यांची इच्छा बलिष्ठ करणें आवश्यक आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........
११६१ १२-२-५८

# एक व्याख्या : २

उदारमतवाद ही संज्ञा त्या मानानें अर्वाचीन असून, केवळ पांच पिढ्या-पासून ती वापरांत आहे; परंतु तिच्यामुळें ज्याचा बोध होतो, त्याचें अस्तित्व मात्र दीर्घकालीन आहे; आणि अगदीं पहिल्यांदा भूमध्यसागराच्या परिसरांतील जगतांत पूर्व आणि मध्य भागांमधील नगरराज्यांत त्याचा अनुभव घेण्यांत आला होता. उदारमतवादाला दोन अत्यंत वेगळाले अर्थ प्राप्त झालेले आहेत. एकाचा संबंध मन:प्रवृत्तीशीं आहे, तर दुसऱ्याचा एका निश्चित सर्वव्यापी तत्वज्ञानाच्या सिद्धांतावर अधिष्ठित असलेल्या आणि विशिष्ट संस्थांच्या द्वारें साध्य करून घेतलेल्या राज्यपद्धतीशीं आहे. सर्वसाधारणत: प्रांजळपणा, एखाद्याला स्वजना-संबंधीं वाटणारी सहानुभूति, उदारपणा यांच्या स्वरूपांत नेहमीं आढळून येणारी मन:प्रवृत्ति म्हणून मला येथें उदारमतवादाशीं कसलेंहि कर्तव्य नाहीं; त्या अर्थानें (जर झेनोफेनचें वर्णन बरोबर असेल तर) सायरसपासून रशियाच्या पहिल्या अलेक्झांडरपर्यंत—ते उभयतां कर्तुमकर्तुम् सत्ताधारी असूनहि कॉसिमो-डि-मेडिसी-पासून कार्नेजीपर्यंत—ते उभयतां निष्ठुर उद्योग-धंदेवाले असूनहि, कोणत्याहि व्यक्तीला तिच्या मनास येईल ती शक्ति वापरून उदारमतवादी होतां येईल. मला येथें राज्यपद्धति म्हणून उदारमतवाद, त्याला प्रेरणा देणाऱ्या व त्याचें समर्थन करणाऱ्या कल्पना, आणि त्याला असलेलें स्वरूप देणाऱ्या संस्था, यांच्याशीं कर्तव्य आहे. उदारमतवाद हा अशा अर्थी स्वतंत्रतेची विशिष्ट संघटना होय, आणि जे मूल्यांचें मापन करतांना स्वतंत्रतेचा क्रम इतर सर्व गोष्टींच्या वर, तसा प्रसंग आलाच तर समृद्धीच्या आणि शांततेच्या देखील वर ठेवीत असतात, ते उदारमतवादी होत. त्या अर्थी प्राचीन भूमध्यसागराच्या परिसरांमधील नगर-राज्यें साम्राज्यें बनण्यापूर्वी व आपल्या स्वायत्त संस्था गमावण्यापूर्वी अर्थात् केवळ कांहीं पिढ्यापर्यंत कां होईना पण उदारमतवादी होतीं. तद्वतच कांही मध्ययुगीन जमात-राज्यें (कम्युन्स) अल्पलोकसत्ताक पद्धतीचा आणि सुलतानांचा उदय होई तोंपर्यंत, व अर्वाचीन काळांत—ही संज्ञा उपयोगांत येण्याच्या आधीं, पश्चिम युरोपांतील कांहीं राज्यें त्याच अर्थानें उदार-मतवादी होतीं.

जेव्हां लोक स्वतंत्रता ( लिबर्टी ) आणि स्वाधीनता ( फ्रीडम ) या शब्दांचा उपयोग व्यक्तींना अनुलक्षून करतात, तेव्हां त्यांच्यांत खरें सांगायचें झाल्यास त्या संज्ञांचा वास्तविक अर्थ समजण्याइतपत तर्कशुद्ध सूज्ञता असण्यापेक्षां उपजत बुद्धिच अधिक असते. स्वतंत्रतेचा अर्थ आकलन होणें, जीवनाचा अर्थ आकलन होण्याइतकेंच दुष्कर असून, त्याच्यापासून अर्थातच तिला विभक्त करतां येणें शक्य नसतें. आपली बुद्धि मर्यादित असते, व जरी आपल्या सभोंवार काय चालत आहे, याची माहिती ती सांगू शकते, तरी आपल्या अंतर्यामीं काय आहे, कशामुळें आपल्या मनाचो ठेवण बनत असते, हें केवळ महाप्रयासानें तिला सांगता येतें. आपण जगतों, परंतु जीवन म्हणजे काय, याचें ज्ञान आपल्याला नाहीं, आणि बहुतेक कालावधिपर्यंत आपल्याला तिचें भान देखील असत नाहीं. बहुतेक भाषांत 'स्वतंत्रता'-( लिबर्टी )-वाचक शब्दच नाहींत, तेथें स्वयं या जाणीवेचा अभाव आहे. भाषांतरामधून नेहमीं स्वतंत्रता म्हणजे व्यक्तीचें राजकीय स्वातंत्र्य आणि ती व्यक्ति ज्या समुदायांत सामील झालेली असते त्याचें राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वतंत्रता, अशी दोहोंमध्यें गल्लत करण्यांत येते. ( ज्यांना व्यक्तीच्या राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनेचा विचार देखील सुचणें अशक्य असतें, त्यांना देखील समुदायाचें राजकीय स्वातंत्र्य त्याच्या बाह्य स्वरूपापामुळें समजूं शकतें. )

व्यक्तीच्या संबंधांत स्वतंत्रता आणि स्वाधीनता या संज्ञांचा अर्थ काय निष्पन्न होतो, याचा शोध लावण्याचा महत्वाचा प्रयत्न पाश्चिमात्य संस्कृति-प्रधान राष्ट्रांतून बहुतकरून शतकानुशतकें झालेला आहे. गतकालीन आणि सद्यकालीन विचारवंतांनीं केलेल्या व्याख्यांच्या तौलनिक अभ्यासावरून निश्चित आणि सुस्पष्ट व्याख्या देण्याबाबतची अडचण दिसून येते. स्वतंत्रतेची हो व्याख्या असमाधानकारक अशीच होणार. आणि इतर अनेक असमाधानकारक व्याख्यांच्या प्रमाणें तिचा देखील भर वस्तूच्या स्पष्ट आशयापेक्षां तिच्या संदिग्ध मर्यादांच्या विवेचनांवर असणार; **ज्या प्रमाणांत व्यक्ति आपल्या स्वतःच्या विवेकशक्तींचा उपयोग करून त्यांच्या द्वारां निर्णय घेऊं शकतात, आणि ज्या प्रमाणांत त्या घेतलेल्या निर्णयाच्या आधारें कृति करूं शकतात, त्या प्रमाणांत स्वतंत्रता अस्तित्वांत असते.**

स्वातंत्र्य हें व्यक्तीची स्वतंत्र स्वयंसिद्ध बुद्धिमत्ता गृहीत धरते. ज्या बाह्य

परिस्थिति या नैसर्गिक क्षमतेला कार्यान्वित करतात, त्यांची देखील सूचना स्वतंत्रता देत असते. त्यास्तव स्वतंत्रतेचें कसलेंहि अध्ययन करतांना मनाची क्रिया आणि माणूस ज्या समाजांत राहातो, त्याचें लक्षण, यांचा विचार अवश्यमेव करणें भाग आहे. माणसाच्या बाबतींत, अवांतर प्रत्येक गोष्टीप्रमाणें; आमच्या पुरतें तरीं, अमर्याद स्वतंत्रतेचें पूर्णत्व असूं शकत नाहीं. ज्याप्रमाणें आपल्या प्रज्ञेचें सामर्थ्य देखील मर्यादित असल्यामुळें तिला लाभलेली प्रत्येक देणगी—स्वतंत्रता सुद्धां—तशीच मर्यादित आहे. परंतु शहाण्यांतील सामान्यजनां कडून नेहमीं आरोळी ठोकण्यांत येते कीं संपूर्ण स्वतंत्रतेचा अभाव याचा अर्थच स्वतंत्रता नाहीं, असा होतो; आपली दृष्टि मर्यादित आहे, तरीहि आपण बघूं शकतों. आपली श्रवणशक्ति मर्यादित असली, तरी देखील आपण विशिष्ट टप्प्यापर्यंतचे ध्वनि ऐकूं शकतों, आपलें आयुष्य मर्यादित असलें, तरी आपण जगत असतों. ह्यूम म्हणतो, "मनुष्य हा समंजस जीव आहे, परंतु मानवी बुद्धीच्या सीमा संकुचित आहेत." मनुष्यामध्यें स्वतंत्र होण्याची क्षमता असल्याचें निश्चित केल्यावर आपण त्याच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा कोणत्या याचा निर्णय करून घेतला पाहिजे.

उदारमतवाद्यांनीं सतत अवधान राखायला हवें कीं व्यक्तींच्या आणि (स्थानिक जमात किंवा राष्ट्र, वर्ग किंवा मालमत्ता, कुटुंब किंवा धर्ममंडळ, इत्यादि) समुदायाच्या दोन निरनिराळया स्वातंत्र्यांचा घोटाळा माजत असतो. स्पष्टीकरणासाठीं आणि घोटाळा टाळण्यासाठीं पहिल्याला मी स्वतंत्रता (लिबर्टी) आणि दुसऱ्याला स्वायत्तता (इंडिपेन्डस) म्हणतो. मलायी आणि इंडोनेशियन राष्ट्रवादी जेव्हां "मर्डेका" संबंधीं भाषा काढतात, तेव्हां व्यक्तीच्या स्वायत्त-पणाची कल्पना त्याच्यांत अभावरूपानें असते; त्यांना त्यावेळीं अधिकारशाही किंवा हुकूमशाही समाजांतील संस्थांच्या द्वारें व्यक्तिमात्रांच्यावर गटांचें संपूर्ण आधिपत्य स्थापन करून त्यांच्या योगानें, मलायी व इंडोनेशियन राष्ट्रांची राज-कीय स्वायत्तता अधिक बळकट बनविण्याचा अर्थ त्यांत अभिप्रेत असतो.

एकोणिसाव्या शतकांतील युरोपियनांना नेहमीं वाटायचें कीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचें साहचर्य व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर असतें. आज अमेरिकन हेंच अजूनहि गृहीत धरून चालत आहेत. (आणि मग जेव्हां त्यांना दिसून येतें कीं गेल्या एका तपांत ज्यांनी आपली राजकीय स्वायत्तता प्राप्त करून घेतली अशा

वीस एक राष्ट्रांपैकीं कांहींच्या बाबतींत घडलें, त्याप्रमाणें राजकीय स्वायत्ततेचा पहिला उद्रेक हुकूमशाही सत्ता स्थापन करण्याविषयीं होत असतो, तेव्हां ते साश्चर्य बघतच राहातात.) एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं कैक मोठ्या युरोपियन देशांत स्वावलंबी संस्थांना राष्ट्रवादाचा (स्वराष्ट्रांविषयीं भक्तियुक्त प्रजानिष्ठेचा) गंभीर धोका मोठ्या प्रमाणांत निर्माण झालेला होता; त्याचें पर्यवसान १९१९ ते १९४५ पर्यंत सर्वत्र मध्य आणि दक्षिण युरोपांत स्वावलंबी संस्था कोलमडून पडण्यांत झालें; दुसऱ्या जागतिक युद्धाचा शेवट झाल्यापासून जेथें जेथें त्याला वेग प्राप्त झाला, त्या सर्वच देशांत स्वतंत्रता मोठ्या प्रमाणावर संकटांत आहे.

मनुष्यजातीचा एक मोठा वर्ग असें गृहीत धरीत असतो कीं, स्वतंत्रता सत्या-बरोबर (सामान्यतः ज्याला आध्यात्मिक अथवा भौतिक मुक्तीचा मार्ग समजतात त्याचेबरोबर) तद्रूप झालेली असते; जो मनुष्य सत्याचा स्वीकार करतो, तो स्वतंत्र आणि जो तें नाकारतो, तो परतंत्र होय. युरोपांतील मध्ययुगांच्या दरम्यान ही कल्पना मोठ्या परिश्रमपूर्वक बनविण्यांत आलेली होती; आणि तिची चर्चा बऱ्याच मोठ्या संख्येंत तिला लोक चिकटून आहेत म्हणूनच केवळ करावी लागत नसून, तिच्या प्रतिपादनाप्रीत्यर्थ मांडण्यांत आलेल्या विचारांची गोळाबेरीज देखील लक्षांत घेऊनच, ती अगत्यानें करायला पाहिजे. ती कल्पना तेव्हां व्यक्तीची स्वतंत्रता स्वयंसिद्ध मानणाऱ्या आचारविचाराचा मार्ग आणि जे जीवनाच्या व विचाराच्या त्या मार्गांत सहभागी होण्याचें नाकारीत असत, त्यांची समान स्वा-धीनता मान्य करण्याची अनिच्छा, यांच्या मधील तडजोडीचें प्रतिनिधित्व करीत असे. (आजहि ती अगणित कम्युनिस्ट बुद्धिवाद्यांचें प्रतिनिधित्व करीत आहे.)

ही कल्पना आज, कधीं स्पष्टपणें, तर कधीं संदिग्धपणें, पुष्कळांना पटत असली, तरी ज्या पाश्चिमात्य विचारानें तिचा विकास केला, त्याचा कोणताहि संबंध तिच्याबरोबर असल्याचें ते नाकारतील. जे स्वतंत्रता आणि सत्य यांची तद्रूपता उचलून धरतात त्यांना पुढील गोष्टींचा विसर पडतो :—

(अ) स्वतंत्रता ही पसंतीच्या कृत्यामुळें व्यक्त होत असते, पसंतीच्या हेतु-मुळें नव्हे.

(ब) भूतकाळांतल्या आणि सध्यांच्या पुराव्याच्या आधारानें म्हणतां येतें कीं कोणत्याहि व्यक्तीच्या "मी सत्य जाणतों" या आढ्यताखोर विधानाचें समर्थन

करण्यासाठीं मनुष्याची बुद्धि फारच कोती पडत असते.

(क) बुद्धीचा उपभोग केल्याशिवाय अन्य साधनांच्या द्वारें सांपडलेलें सत्य नित्य असिद्ध सत्य असतें, तें शोधून काढणाराला बंधनकारक असूं शकेल, परंतु इतरांच्या साठीं तें निराधार असतें. उदाहरणार्थ, असें निराधार अनुमान करणें हटवादीपणाचें ठरेल कीं इ.स. पूर्वी सहाव्या शतकांत झरत्रुष्ट्र किंवा गौतम हे बरोबर नसून केवळ पायथागोरस हाच काय तो संपूर्णतः बरोबर होता किंवा एकोणिसाव्या शतकांत बहाउल्ला किंवा मार्क्स हे बरोबर नसून स्पेन्सर काय तो पूर्णतः बरोबर होता.

निर्णय घेण्यासंबंधीं व्यक्तीच्या हक्काची हमी देणाऱ्या शर्तीचें महत्त्व मान्य करून उदारमतवादानें नेमस्तपणात्वर अधिक महत्त्व दिलें पाहिजे आणि ज्यांना आपल्या हातीं अंतिम सत्याची गुरुकिल्ली असल्याचें खात्रीपूर्वक वाटत असते, त्या सर्वांचा संपूर्णतावाद झिडकारला पाहिजे. उदारमतवादानें सदासर्वदा मनुष्याची अपूर्णता आणि त्याचा मर्यादितपणा कटाक्षानें लक्षांत घेऊन सहिष्णुतेला महत्त्व दिलें पाहिजे. उदारमतवादी इतरांच्या कडून केवळ याचीच अपेक्षा करीत असतो कीं त्यांनीं नेमस्तपणाइतकीच सहिष्णुता बाळगावी, आणि एका सुस्थिर व सुव्यवस्थित समाजाच्या गरजेनुरूप निवड करण्यासंबंधीं कमाल स्वातंत्र्याची हमी देणाऱ्या संस्थांच्या चौकटींत राहून कार्य करीत जावें.

स्वतंत्रतेची समतेबरोबर कधींहि गल्लत करण्यात येऊं नये. त्या उभयतांमध्यें सलगीचा संबंध आहे, कारण सर्वच व्यक्तिस्वातंत्र्यांचा संबंध सर्व माणसांमधील मूलभूत समानतेबरोबर असतो, आणि शिवाय ऐतिहासिक दृष्टचा स्वतंत्रतेची आकांक्षा प्रत्यक्ष स्वरूपांत विशेषाधिकार आणि विषमता यांना मारक झाली. माणसां-माणसांमधली विषमता क्रमाक्रमानें कमी करीत जाणें, हा उदारमतवादी सुधारणेचा अर्थ, जसा आज आहे, तसाच एकोणिसाव्या शतकांतहि होता. तरी देखील उभयतां स्वतंत्रता आणि समता एक नव्हत, आणि त्या उभयतांमधील वाजवी संबंधांविषयीं, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमधील उदारमतवादी क्रांत्यांच्यामुळें प्रभावित झालेल्या सर्व राष्ट्रांतून वादविवाद प्रसंगविशेषीं झणझणीत व कडवट स्वरूपाचे देखील माजले. चर्चेत रुसोचा पहिल्या प्रथम १७९१ च्या राज्यघटनेच्या समर्थकांना, म्हणजे फ्युइलॉन्टस्नां, व तदनंतर गिरोंडेना, आणि पुढें डेमॉक्रेट्सचा लिबरलांना विरोध झाला, आजहि सोसॉ-

लिस्ट लिबरल डेमॉक्रॅटला विरोध करीत आहे.

समानता आणि समता, भिन्नता आणि विषमता, यांच्यामध्यें जेव्हां तारतम्य करण्यांत आलें, तेव्हां कल्पना अधिक स्पष्ट झाल्या. विद्वान् आणि विदूषकी चिटोऱ्यांचा वाचक, आस्तिक आणि नास्तिक, स्थितिनिष्ठ सांप्रदायिक आणि जहाल सुधारणावादी, मालक आणि नोकर, हे सर्व भिन्न गट आहेत. ते एकाच समान पातळीवर राहूं शकतात. पहिल्यांत समता असून दुसऱ्यांत विषमता आहे. उदारमतवादी सुधारणेचें उद्दिष्ट भिन्नतांचें निर्मूलन करण्याचें नाहीं, तर विशेषाधिकार नष्ट करण्याचें आहे. अटलांटिक महासागराच्या दोन्हीं किनाऱ्यांवर ( लॉइड जॉर्जच्या सुधारणावादी रॅडिकलपासून तर न्युडीलवाल्या परिवर्तनवाद्यापर्यंत ) उदारमतवादी कामगार वर्गाला व्यापारी वर्गाच्या पातळीवर आणण्यासाठीं झटले, त्यांच्यांतला व्यापारी अथवा कामगार वर्ग नष्ट करून टाकण्यासाठी नव्हे. धर्मशास्त्राचें प्रामाण्य झिडकारणारे मनस्वी, आणि धर्मनिष्ठ या दोघांच्या मध्यें समता असावी म्हणून उदारमतवाद्यांनीं कार्य केलें आहे, त्यांच्यामधला कोणता तरी एक समाज नष्ट व्हावा आणि दुसरा विजयी व्हावा म्हणून नव्हे.

जेथें कुठें वांशिक किंवा सांस्कृतिक अल्पसंख्यांक आहेत, तेथें त्यांना वांशिक अथवा सांस्कृतिक बहुसंख्यांकांबरोबर समता प्राप्त व्हावी, असा पक्ष उदारमतवादी उचलून धरतात; त्यांचें खच्चीकरण जोरजबरीच्या एकरूपतेनें किंवा अधिक निर्दय मार्गांनीं करणारांचा नव्हे. जेथें वसाहती आहेत तेथें उदारमतवाद्यांचें अंतिम ध्येय एक तर त्यांची स्वायत्तता मान्य करून किंवा साम्राज्याचें परिवर्तन राष्ट्रकुलांत अथवा सर्व घटकांना समान दर्जा असलेल्या संघराज्यांत करून त्यांना मातृदेशाच्या बरोबरीनें समता देण्याचें असतें. परंपरागत अधिकारशाहीला ( आणि कांहींशा सौम्यवस्थेत युरोपांतील संप्रदायवाद्यांना देखील ) अशी राज्यपद्धति हवी असते कीं जीत धर्माच्या वर्चस्वाला प्राधान्य आणि भिन्न गटांच्या लोकांना भिन्न प्रकारचा दर्जा असतो. कम्युनिस्ट अधिकारशाहीला ( आणि कांहींशा सौम्यावस्थेत समाजवाद्यांना ) सर्व भेदांचें विसर्जन आणि सर्व नागरिकांचें समानत्व अभिप्रेत असतात.

स्वतंत्रता म्हणजे व्यापारस्वातंत्र्य, उद्योगस्वातंत्र्य, किंवा व्यापारधंद्यातील व्यक्तीच्या हालचालींत हस्तक्षेप करण्याविषयीं सरकारची अलिप्तता, यांचा

पर्यायवाचक शब्द नव्हे, तरीहि पुनश्च अर्थव्यवस्थेची रचना आणि स्वतंत्रतेची व्यवहार्य अभिव्यक्ति असणारी निवड करण्याची संभाव्यता यांचा निकट संबंध असतोच. अर्थव्यवस्थेकडे पाहाण्याची उदारमतवाद्याची दृष्टि मनुष्याचें मन आणि इच्छा (तिच्यांत स्वतंत्रता अंतर्भूत असते, याचा पुनरुच्चार मी करीत आहे), यांच्यावर परिणाम घडवून आणणाऱ्या मूलतत्त्वांपैकीं (अर्थातच महत्त्वपूर्ण अशांपैकीं) एक तत्त्व असा आहे. शंभर वर्षापूर्वी युरोपांतील औद्योगिक समाजांना अनुलक्षून मार्क्सनें असें रास्त विधान केलें होतें कीं, संपत्तीचे जे मालक आहेत ते स्वतंत्र, आणि जे नाहींत ते परतंत्र समजावेत. त्या विधानावरून त्यानें तर्कदुष्ट अनुमान काढलें कीं संपत्तीची खासगी मालकी नष्ट केल्यानें अधिक विशाल स्वाधीनता प्राप्त होईल. लॉक, टुर्गाट, आणि जेफरसन यांच्या बरोबर उदारमतवादी सहमत आहेत कीं संपत्तीची मालकी व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मजबूत करीत असते, आणि संपत्तीचें प्रसरण, तिचें विसर्जन नव्हें, करणें हें आपलें अभिष्ट ध्येय असावें. (सत्तेचें केंद्रीयीकरण स्वतंत्रतेला विघातक असल्यानें उदारमतवादी त्याला प्रतिकूल असतात, ज्या कारणास्तव ते धर्मपीठ आणि राज्यांचे विलगीकरण राजकीय सत्तेचें विभाजन, आणि नियंत्रणें व संतुलनें यांचें अनुसरण, यांना अनुकूल असतात, त्याच कारणास्तव ते राजकीय आणि आर्थिक सत्तेमधील विभक्तीकरणाला अनुकूल आहेत. व्यक्तीची मालिकी असणाऱ्या उत्पादनाच्या साधनांवरील नियंत्रण मनुष्याच्या आर्थिक क्षेत्रांमधल्या स्वतंत्रतेचें दर्शक होय. इतर क्षेत्रांमधील व्यक्तीच्या कृत्यावरील मर्यादांप्रमाणेंच, (उदा० इतरांना समान स्वातंत्र्य), त्या मर्यादांचें स्वरूप असेल.

समष्टिवादी कधीं कधीं भौतिक मालमत्तेच्या सुबत्तेची ओळख स्वतंत्रता म्हणून करून देतात. सुबत्ता ही खात्रीनें उपलब्ध करून घेण्याच्या योग्यतेचें उद्दिष्ट आहे, आणि उदार लोकशाहीला राजकीय महत्त्व आल्या दिवसापासून उदारमतवादी तिच्या प्रीत्यर्थ झगडत आहेत. स्वतंत्रतेच्या संबंधांत समृद्धि म्हणजे केवळ एक साधन होय साध्य नव्हे; तिनें जर मनुष्याच्या स्वयंनिर्णयाची कक्षा विस्तृत केली तर तिच्या हातून एक उदारमतवादी कार्य सिद्धीस जातें, मनुष्याची स्वतंत्रता जर बंधनांत राहिली तर तिच्या हातून उदारमतवादी कार्य तडीस गेलेलें नसतें. गलेलठ्ठपणामुळें एखाद्या दासाचा ( जरी त्यांत त्याला सुख वाटत असलें तरी ) दर्जा कधींच वाढत नसतो. संपदा आणि स्वतंत्रता व्यवहारतः समानार्थी आहेत, अशी समजूत समष्टिवादी नमणारांनीं मोठ्या व्यापक-

पणानें स्वीकारलेली आहे; जणूं काय इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकांतील गरीब रोमन नागरिक आपल्या समकालीन श्रीमंत कार्थेजियनांपेक्षां, किंवा सोळाव्या शतकांमधील डच "भणंग" (बेगर्स) वैभवशाली हिंदुस्थानांतील मोंगल राज्यकर्त्यांच्या प्रजेपेक्षां अधिक स्वतंत्र नव्हते.

अनेकांना मन:पूर्वक असा विश्वास वाटतो कीं आज स्वतंत्रतेच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठीं जर कशाची गरज असेल तर ती राहाणीचें मान वाढवून देण्याची; त्यांचें विसाव्या शतकांतल्या जर्मन राष्ट्राच्या पुराव्याकडे दुर्लक्ष होत आहे कीं जरी इ. स. १९०० सालांपेक्षां जर्मनींत १९४० मध्यें सर्व वर्गांच्या नागरिकांच्या राहाणीचें मान अधिक वर गेलें होतें तरी तेव्हां तें राष्ट्र कमी स्वतंत्र होतें; तद्वतच त्यांचें विसाव्या शतकांतल्या आणखी पुराव्याकडे सुद्धां दुर्लक्ष घडत आहे कीं १९४५ पूर्वीचें जपान राष्ट्र, आणि मध्यपूर्वेंतलीं व लॅटिन अमेरिकेंतील आजचीं अनेक राष्ट्रें यांच्यांतून आर्थिक सुस्थिति आणि अधिकारशाही शक्ति यांची प्रगति एकसमयावच्छेदेंकरून झालेली आहे. संपत्ति ही एखाद्या रंगाप्रमाणें असते, तेच समान रंग त्यांचा उपयोग करणाऱ्या कलावंताच्या बुद्धिगुणांप्रमाणें सुंदर किंवा विद्रुप भासूं लागतात. संपत्ति म्हणजे स्वतंत्रता नव्हे, किंवा जुलमी सत्ताहि नव्हे; तिचा उपयोग करणाऱ्यांच्या बुद्धीला अनुसरून ती या अथवा त्या वाटेकडे नेत असते.

कित्येकदां प्रगति, कल्याण, शांतता किंवा सौख्य म्हणजेच स्वतंत्रता असें मानण्यांत येते किंवा ज्यांना मनांतून तिच्याबद्दल नाराजी किंवा संताप वाटत असतो, ते तिचें तादात्म्य अवनति, दारिद्र्य, क्षोभ, संघर्ष किंवा हतभाग्य यांचेशीं असल्याचें सांगतात, हें कसें दुर्दैव होय, याचा निर्देश करण्याची आवश्यकता नाहीं. स्वतंत्रता म्हणजे स्वतंत्रताच, कांहींहि अधिक नव्हे; भल्याबुऱ्यासाठीं आपल्या स्वत:च्या पायावर उभें राहाण्याचा, वादविषयाची छाननी करण्याचा आणि स्वमार्ग शोधण्यासाठीं आपल्या स्वत:च्या बुद्धीचा उपयोग करण्याचा मनुष्याचा हक्क म्हणजे स्वतंत्रता होय. तें सुकृताचें अथवा दुष्कृताचें उगमस्थान होऊं शकेल, ती सौख्याकडे किंवा दु:खाकष्टांच्या परमावधीकडे नेऊं शकेल. तिला कसलेंच गुणविशेषण लागूं पडत नाहीं, आणि तिची जागा भरून काढूं शकेल अशा कोणताहि पर्यायवाची शब्द नाहीं, कारण तिच्या समान तीच, अन्य कांहीहि नाहीं, तिच्यामुळें मनुष्याचें उत्थान होत असतें आणि तसें करून ती कोणतेंहि येऊं शकणारें पतन अधिक व्यथापूर्ण करीत असते.

# कार्यक्रम : ३

सर्व देशांमधील उदारमतवाद्यांना मानवी प्रयत्नांच्या सर्वच कार्यक्षेत्रांतून होत असलेल्या स्थित्यंतरामुळें उपस्थित होणाऱ्या अनेक समस्यांच्या बाबतींत आणि आपल्या विरोधकांना सामना देण्याच्या बाबतींत, आपण कुठें ठाण मांडावें हें जाणून घेण्याची अडचण भासत आहे. या अडचणीला कोंब फुटला तो मुख्यत: स्वतंत्रतेच्या कल्पनेला वेढलेल्या गोंधळामधून. या अडचणीचा प्रादुर्भाव त्या कल्पनेचा संबंध निश्चित संस्थांशीं, आणि ज्यांच्या द्वारें त्या समस्यांचें उदारमतवादी दृष्टिकोणांतून समाधान करुन देतां येईल अशा सुधारणांशीं निगडीत करण्याविषयींची उदारमतवाद्यांची असमर्थता व अनिच्छा यांच्यामधून देखील झालेला आहे. आपल्या उदारमतवादी कार्यक्रमांमध्यें काय कायम स्वरूपाचें आहे, आणि कधीं क्वचित घडणारें व म्हणूनच अस्थिर स्वरूपाचें काय आहे, याच्यांतील तारतम्य ओळखल्याशिवाय उदारमतवादी इतक्या सहजपणानें अशा अवस्थांत स्थलांतर करीत असतात कीं मग कधीं कधीं त्यांचें स्थान अधिकार-शाहीच्या जवळपासच राहात असतें. तीन वर्षांपूर्वी "**अटलांटिक मंथली**" या नियतकालितांत लिहितांना "आमच्या समाजाला (अमेरिकन राष्ट्राला) सुव्यवस्थित पोलिस करण्याचा सरकारी कार्यक्रम" उदारमतवादी आहे, असा उल्लेख जेव्हां जे. एस्. क्लार्कनीं केला, तेव्हां नागरिकाची स्वायत्तता, पुढा-कार, व जबाबदारी यांची गणना स्वतंत्रतेंत करण्यांत येत असते, याचा त्यांना विसर पडलेला असावा. "**ॲडव्हेंचर्स ऑफ् आयडीयाज**" (कल्पनांचें साहस) मध्यें ए. एन्. व्हाइटहेडनीं ज्याला ते 'पेरिकलचा व्यक्तिवाद' म्हणतात, त्याच्यायोगें स्वत:ला तिरस्कारार्ह करुन घेतलें; अमेरिकन तरुणपिढीची अत्यंत बोलकी उदारमतवादी तरफ़दारी करणारे धाकटे ए. श्लेसींजरनी आपल्या अगणित लेखांत उजव्या आणि डाव्या कार्यक्रमांच्या मधील कायमचा अस्थिर क्रम याच्याशिवाय अन्य स्थान उदारमतवादाला केव्हांहि असत नाहीं, असें-प्रतिपादन केलेलें आहे. फ्रेंच रॅडिकल (जहालमतवादी) वसाहतवादाचें समर्थन ज्या तर्कदुष्टतेनें करीत असतो, ती उत्तर आफ्रिकेमधील अरबांच्या कडव्या राष्ट्र-वादाला संपूर्ण पाठिंबा देणाऱ्या एका सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधीशाकडून घडणाऱ्या

१०२५५

तर्क दुष्टतेप्रमाणेंच असते. पुढील मुद्द्यांचें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे :—

(अ) स्वतंत्रतेची कल्पना स्वतंत्र समाजाची साकार संघटना ज्या संस्थांच्या द्वारें होत असते त्या संस्था कोणत्या ?

(ब) समस्यांचें उदारमतवादी समाधान ज्यांच्या द्वारें होऊं शकेल, अशा सुधारणा कोणत्या आहेत ?

उदारमतवादी या संज्ञेचा उपयोग होण्याच्या आधीं, जे उदारमतवादी होते,—मग ते स्वतःला कांहींहि म्हणवून घेवोत,—त्यांनीं समर्थन केलेल्या संस्थांच्या स्वरूपांत स्वतंत्रतेच्या आकांक्षेची स्पष्टता संपादन करून घेण्यास आणि तिला निश्चित आकार मिळवून देण्यास (अमेरिकेचा १७८८ चा घटना कायदा आणि फ्रांसचा १७९१ चा घटना कायदा यांच्या वरील लॉकचे (ट्रिटाइज) प्रबंध ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून) तीन किंवा चार पिढ्यांहून कमी कालावधि लागला नाहीं. उदारमतवाद्यांचें आणि त्यांच्या आधींच्या अग्रगामींचें मूलभूत उद्दिष्ट साध्या शब्दांत व्यक्त करतां येणें शक्य आहे:—समाजाला मान्यता देणें, कारण त्यामुळें नागरिकाला समाज, व म्हणून त्याचे घटक, यांना सुरक्षित राखण्यासाठीं आवश्यक असलेल्या परंपरेला अनुरूप अशा कमाल स्वतंत्रतेचा उपभोग घेतां येईल. उदारमतवाद्यांनीं, तहत लॉकपासून क्रोचेपर्यंत सर्वांनीं व्यक्तीची (राष्ट्र किंवा अन्य) गटाला संपूर्ण शरणागति धिःकारलेली आहे, याचें कारण ती अशक्य आहे, हें नव्हें, तर ती अपायकारक आहे, हें होय. संपूर्ण स्वतंत्रतेची अराजकवादी कल्पना त्यांनीं धिःकारली याचें कारण ती अपायकारक आहे, हें नव्हे, तर ती अशक्य आहे, हें होय. त्यांनीं कायदे आणि नियंत्रणें यांच्या आवश्यकतेला मान्यता दिलेली आहे, परंतु त्यांनीं पुढील गोष्टींचा आग्रह धरलेला आहे:—

(अ) व्यक्तीला स्वसंकल्पानुसार ज्याच्या सीमांच्या अंतर्गत कृति करतां येईल आणि ज्याची कक्षा शक्य तेवढी विस्तृत व व्याख्या सुस्पष्ट असेल असें कार्यक्षेत्र;

(ब) जबाबदार नागरिकांच्या निर्णयांवर नियमन आणि नियंत्रण आणण्याच्या बाबतींत सत्तेचा अंकितपणा;

(क) निर्णयांना कायद्यांचें स्वरूप देण्याविषयीं आणि सर्वकाल खुद्द त्या कायद्यांत फेरफार करण्याची मुभा असलेली सुनिश्चित कार्यपद्धति;

स्वतंत्रता आणि गतिमानता सहगामिनी होत्या.

प्रथमत. ग्रेट ब्रिटनमध्यें, तदनंतर इंग्लिश खाडीच्या पलीकडे आणि अटलांटिक महासागराच्या पैलतिरीं उदारमतवादाआधीच्या अग्रगामी जनांनीं (एका लहानशा परंतु गतिमान व प्रभावी गटानें) स्वतंत्र राष्ट्रकुल संस्था आणि स्वतंत्र नागरिकांनीं रचना केलेली समाजसंस्था, यांच्या व्याख्या करून ठेवल्या. युरोपांतील आणि अमेरिकेंतील उदारमतवाद्यांचा कार्यक्रम त्या संस्थांची तरफदारी करण्याचा होता. राष्ट्रांची जीवन-रचना स्वतंत्रतेच्या पायावर व्हावी, याच्यासाठीं प्रथमतः युरोपला नेपोलियनच्या लढायांमुळें पुनश्च जुलमी राज्य-पद्धतीच्या तिमिरांत गटंगळया खाव्या लागल्या, तत्पूर्वीं कांहीं अल्प प्रसंगीं, तदनंतर १८१५ पासून तों १८७५ पर्यंत दोन पिढ्यांच्या दरम्यान अटलांटिक महासागराच्या उभय किनाऱ्यांवर दुर्बोधवादी सांप्रदायिक जुलमी राज्यपद्धति आणि बोधदायक आमूलाग्र सुधारणावादी जुलमी राज्यपद्धति यांच्या विरुद्ध उदार-मतवादी झगडले. एकोणिसाव्या शतकाच्या अंतापूर्वीं तुर्कस्थानांत आणि रशियांत, हिंदुस्थान, चीन, जपान आणि भूमध्यसमुद्र व पॅसिफिक महा-सागराच्या मध्यें असलेलीं लहान लहान राष्ट्रें यांच्यांतून झपाट्यानें संख्यावाढ होत असलेल्या उदारमतवाद्यांचा कार्यक्रम तोच होता.

उदारमतवादी संस्थांनीं गृहीत धरलेल्या गोष्टी आणि त्यांच्या अंतर्भूत असलेल्या उत्कट इच्छा यांच्या आधारावरून त्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल :—

(१) **नैतिक समता** : याचा निश्चित अर्थ म्हणजे विशेषाधिकारांचें निर्मूलन, कायद्यांच्या क्षेत्रांत समता, आणि सार्वत्रिक शिक्षण व सर्व प्रकारच्या आयुष्य-क्रमांत गुणाची कदर होण्यासाठीं मुक्तद्वार, यांची सर्वांना समान संधि.

(२) **व्यक्ति-स्वातंत्र्यः** कैद्याला न्यायाधीशापुढें हजर करण्यासंबंधीचें आज्ञा-पत्र मिळविण्याच्या (हेबियस कार्पस्) हक्कासह, ज्युरीपुढें खटल्याची सुनावणी, कायद्यांच्या कार्यपद्धतीचें कांटेकोर पालन करण्यावर कटाक्ष, गुलामी, वेठ, मुदतबंदीची चाकरी इत्यादिकाचें निर्मूलन.

(३) **विचार आणि विवेक यांचें स्वातंत्र्य** : म्हणजे प्राथमिकपणें उच्चारस्वा-तंत्र्य (त्याला मुद्रणस्वातंत्र्यहि म्हणत), कारण मनुष्य हा संगतिप्रिय जीव असल्या-मुळें जितक्या प्रमाणांत त्याच्या अंतर्यामी स्वतंत्रतेचा विकास होतो, तितक्या

प्रमाणांत तो तिचा उच्चार करूं शकतो; त्याचप्रमाणें अध्यापनस्वातंत्र्य, शिक्षण-स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य इत्यादि.

(४) **राजकीय स्वतंत्रता:** खुलें मतदान व उमेदवारांची खुली निवड, सभा-समिति-संमेलनाची स्वाधीनता, नागरिकांच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींचें कायदेमंडळांत वादविवादानंतर घेण्यात येणारे निर्णय, कारभारी मंडळाची जबाबदारी, स्थानिक स्वराज्य इत्यादिकांचा समावेश असणारी.

(५) **मर्यादित किंवा घटनात्मक सरकार:** म्हणजे राजकीय सत्तेची विभागणी कायदे घडविणें आणि अंमलबजावणी अशी करणें, बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक या उभयतांच्या हक्कांच्या सीमा, न्यायदानाची स्वायत्तता, शांततेनें कायदे घडविण्यासंबंधीं सुस्पष्ट व्याख्या असलेली कार्यप्रणालि, कायद्यांचा फेर-विचार अगर ते रद्द करतां येणें.

(६) **धर्म व राज्यसत्ता यांची फारकत :** म्हणजे राज्याचे अधिकार आणि धार्मिक श्रद्धांवर आधारलेल्या संस्थांचे अधिकार (कधीं कधीं महत्त्वाचे असणारे) यांचें विभाजन.

(७) **राज्यसत्ता आणि अर्थव्यवस्था यांची फारकत :** विशेषत: उत्पादनाच्या साधनांची खासगी मालकी शक्य तितक्या अधिक विस्तृत क्षेत्रांमध्यें प्रसरण होण्यावर, तद्वतच त्यांच्या मुक्त उपयोगांवर आणि खुल्या बाजारपेठेवर भर देऊन लोकशाहीनें राजकीय दृष्ट्या पार पाडलेली भूमिका आर्थिक व्यवसायांच्या संबंधांत पाडणें यावर भर.

उदारमतवाद्यांची अशी खात्री पटलेली आहे कीं ज्या कार्यक्रमाचा गोषवारा वर दिलेला आहे, त्याच्यावर आधारलेली व्यवस्था स्थापन करणें अथवा शाबूत राखणें, याला स्वायत्तता, कामधंद्याची विपुलता, समता अगर शांतता, या प्रत्येक अन्य गोष्टीच्या आधीं अग्रक्रम द्यावा लागतो. जेथें कुठें अधिकारवादी संस्था आहेत, तेथें उदारमतवाद्यांनीं त्यांच्या नाशास्तव कार्य करीत राहावें, आणि संप्रदायवादी, राष्ट्रवादी, व झुंडवादी, यांना त्यांच्या स्वत:साठीं सज्जन शासक धुंडाळून त्याला दुर्जन शासकाच्या जागीं बसविण्याचेंच कार्य करूं द्यावें; युरोपांत जसें अनेकदां घडून आलें तसें उदारमतवाद्यांना अधिकारशाही उलथून पाडतां येणें शक्य होईल, परंतु तिच्या जागीं स्वतंत्रतेला बसविणें शक्य होणार नाहीं, मात्र तसा प्रयत्न त्यांनीं यश मिळेपर्यंत चालूच ठेवला पाहिजे. स्वतंत्र

समाजांच्या अंतर्गत उपस्थित होणाऱ्या समस्यांचें उदारमतवादी समाधान करण्यासंबंधीं इतिहासाचा दाखला एक आवश्यक नियम दर्शवितो कीं **उदारमतवाद्यांचें उद्दिष्ट असमानतांचा संकोच करण्याचें असावें.** हा नियम जातिविषयक आणि आर्थिक, शिक्षणविषयक आणि धार्मिक समस्यांना देखील लागू पडतो. ज्या भिन्नता असमानतेकडे आणि स्वाधीन संस्थांना नाशकारक होणाऱ्या विशेषाधिकारांची निपज करण्याकडे ( गेल्या दोन पिढ्या मक्तेदारी भांडवलशाहीच्या बाबतींत घडलें त्याप्रमाणें ) सहजासहजीं घेऊन जात असतात, त्यांना जन्म देणें हा स्वतंत्रतेचा स्वभावधर्म आहे. प्राचीन, मध्ययुगीन, व अर्वाचीन कालांतील स्वतंत्र राष्ट्रकुलांच्या अनुभवांनीं दर्शविल्याप्रमाणें स्वतंत्रतेनें स्वयं ज्यांना जन्मास घातलें, त्यांच्याच विरुद्ध स्वतंत्रतेचा संघर्ष एकदां कां स्वाधीन संस्था स्थिर झाल्या कीं मग सतत चालणारा लढा होत असतो.

गत पिढ्यांच्या दरम्यान उदारमतवादाचें उद्दिष्ट या दृढसंकल्पाशीं निगडीत झालें होतें, ( आणि सर्व देशांतील अनेक उदारमतवाद्यांच्या मतें तें अजूनहि निगडित आहे, ) कीं स्वतंत्रता मुख्यत्वेंकरून प्रगति, शांतता, समृद्धि, एकता, सौख्य यांच्या स्वरूपांत मांगल्य आणीत असते. या अनुमानांचें समर्थन डेस्कार्टिस, न्युटन, आणि सतराव्या शतकांतले इतर थोर तत्त्ववेत्ते आणि वैज्ञानिक यांनीं मोठ्या जोमानें व त्यापेक्षांहि अधिक यशस्वितेनें खात्री पटविण्याजोग्या पद्धतींत विश्वाच्या यंत्रबद्धपणाविषयीं जें मत मांडलें, त्याच्या व्यापक मान्यतेमधून प्राप्त होत असे. उदारमतवाद्यांना या दृढसंकल्पानें बळ चढलें, कारण त्याच्यामुळें त्यांची अशी भावना झाली कीं ते शाश्वत काळाच्या पक्षाचे आहेत. असें वाटण्याचें कारण ईश्वर आणि गूढ अनाकलनीय दैवी संकेत यांची जागा निसर्ग आणि मनुष्यप्राण्यांना जे कायदे सहज आकलन होऊं शकतील व सुज्ञपणानें पाळतां येतील, अशा कायद्यांनीं घेतली.

या दृढ संकल्पाला दुर्बळ करणारा देखील एक परिणाम घडून आला. उदारमतवाद्यांना अशाहि विरुद्ध पुराव्याला तोंड द्यावें लागलें कीं स्वतंत्रता मांगल्याप्रमाणेंच अमांगल्य, नेमस्तपणा इतकाच उद्दामपणा, एकतेप्रमाणेंच संघर्ष, यांना प्रसवूं शकते, आणि तिच्या कांहीं अभिव्यक्तींच्या प्रसंगीं तिचें साम्य ( असलेल्या स्वरूपांत तिचा तिटकारा करणारांना ) डांटेच्या "butera internal che mai non resta" बरोबर आढळून आलें. उदारमतवाद्यांमधील फक्त कांहीं

अल्पसंख्य लोकांनांच एकोणिसाव्या शतकांत असें दिसून आलें कीं स्वतंत्रता ही मांगल्य नसून मांगल्यप्राप्तिसाठीं मनुष्याला समर्थ बनवूं शकणारी अवस्था होय आणि हें मांगल्य निसर्गाच्या नियमांत मूलतः असलेल्या यांत्रिक प्रवृत्तीचा अंतिम परिपाक नसून मनुष्याचा विवेकबुद्धीचा आणि सहेतुक प्रयासांचा अंतिम परिणाम होय.

गेल्या साडेतीनशें वर्षांची कहाणी म्हणजे, कांहीं उत्तर अटलांटिक राष्ट्रांतील हिंसक आणि क्रूर धार्मिक झगडयांच्यामुळें सोसाव्या लागलेल्या व्यथांच्या मधून आधुनिक उदारमतवादानें घेतलेल्या जन्माची, त्याचा विनम्र प्रारंभापासून तहत मानवी समाजांना आकार देणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या ( कांहीं काळ ) तत्त्वांपर्यंत जो विस्तार झाला त्याची, विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत त्याच्या झालेल्या विकासी प्रगतीची बरीच व्यापक कहाणी होय. तद्वतच स्वतंत्रतेसाठीं यशस्वीपणें पुढें मुसंडी मारल्यामुळें वशीभूत मानवी शक्तींना मुक्त करतांना ज्या अनेक आणि विविध प्रवृत्ति,—आशावाद व निराशावाद, बुद्धिनिष्ठा व असमंजसपणा, श्रद्धाभाव आणि तुच्छतावाद, राष्ट्रीयत्व आणि आंतर्राष्ट्रीयत्व, वसाहतवाद आणि वसाहतविरोधीवाद, भांडवलशाही आणि झुंडशाही, फॅसिझम् आणि कम्युनिझम् इत्यादि,—जन्मास आल्या, त्यांची देखील ती कहाणी होय.

आणि तशीच ती स्वतंत्रेतेनें ज्या प्रवृत्तींच्या विकासाला मार्गदर्शन केलें होतें, त्यांच्यांतील कांहींनीं तिच्यावर लादलेल्या गंभीर ओढाताणीच्या प्रसंगांची कहाणी होय. एखाद्या स्वतंत्र समाजाला कसें संघटित करावें, याचा शोध उदारमतवाद्यांना लागलेला होता; अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमधील असंख्य क्रांत्या आणि सुधारणांची आंदोलनें यांच्यांत ते यशस्वी झाले होते; सर्वच खंडांमध्यें त्यांनीं सांप्रदायिक अधिकारशाही खिळखिळी केली होती. स्वतंत्रतेच्या खुद्द तिलाच नष्ट करतील अशा फलितांच्या बरोबर व्यवहार कसा करावा आणि उदारमतवादानें निर्माण केलेल्या राष्ट्रीयत्व आणि फॅसिझम्, मक्तेदारी भांडवलशाही आणि कम्युनिझम् अशा प्रतिउदारमतवादी शक्तींचा,—कीं ज्यांनीं १९४१ च्या सुमारास सर्व युरोपखंडाची स्वाधीनता, तीन चिमुकल्या राज्याचे अपवाद वगळल्यास, नष्ट करून टाकली होती आणि ज्या आज सर्वच खंडामध्यें आपली तटबंदी उभारून आहेत,—जोराचा हल्ला कसा परतवून लावावा, त्या शक्तीचा शोध उदारमतवाद्यांना लागला नव्हता.

# स्वतंत्रतेची भूमिका : ४

मानव आपल्या कांहीं लक्ष वर्षांच्या अस्तित्वांत, दुर्बल आणि कांहींसा ओबडधोबड बांध्याचा प्राणी असून देखील भयंकर प्रतिकूल गोष्टींना तोंड देऊन शाश्वत राहूं शकला हें तर आहेच, पण खरें सांगायचें म्हणजे त्यानें स्वतःसाठीं बऱ्याच बऱ्या गोष्टी देखील केल्या आहेत. संवेदना, स्नायूंचें सामर्थ्य, आदियुगांतल्या दैनंदिन रानटी जीवनांतील हालअपेष्टा सहन करण्याची शक्ति या बाबतींत त्याच्यांत असलेल्या उणीवांची भरपाई त्याला इतर कोणत्याहि प्राण्यापेक्षां फारच मोठ्या प्रमाणांत मिळालेल्या बुद्धिसामर्थ्याच्या योगानें वाजवीपेक्षां अधिक मापानें झाली. वस्तुस्थितीचें आकलन; तिचे संबंध, गुंतागुंती, परिणाम यांच्या कल्पनाचित्राची मनापुढें उभारणी, आणि आपल्या चातुर्याच्या योजकतेनें स्वतःला अत्यंत सुस्थितींत जिवंत राखण्याच्या मार्गावरील उपस्थित समस्यांचें समाधान करण्याचें अपार बुद्धिवैभव त्याला प्राप्त झालें होतें.

इतर मानव प्राण्यांनीं ज्यांचा आधींच अनुभव घेतला, त्या वस्तुस्थितींच्या आणि समस्यांच्या बाबतींत व्यवहार करतांना भूतकाळांत ज्यांचा खरेपणा (संकल्प, सिद्धांत, पद्धति, वगैरेंच्या स्वरूपांत) सिद्ध झाला होता अशा विधींच्या कडून मार्गदर्शन मिळविणें आणि अगणित पिढ्यांनीं आचरणांत आणलेल्या कृत्यांना महत्त्व देणें, येवढेंच बहुधा मनुष्याच्या बुद्धीला पुरेसें होत असतें. मनुष्य आणि त्यांच्या सभोंवतीं असणारी परिस्थिति यांच्यांत, तो काय अपेक्षितो किंवा हें करतो जमेस न धरतां अगदीं स्वतंत्रपणें सतत बदल होत असतात. झरे आटून जातात, जमिनी नापीक बनतात, हिवाळे अधिकाधिक शीत आणि आर्द्र, किंवा उन्हाळे अधिकाधिक तप्त आणि शुष्क बनत जातात. हिमनद्या, वाळवंटें, आणि अरण्यें पुढें सरतात आणि मागें हटतात, रोगराई पिकांना आणि पाळीव पशूंना झडपते, मानव समुदायांची अंतर्गत रचना नेहमीं तीच राहात नसते. स्त्री पुरुष जातींचीं आणि वयोमानाचीं परिमाणें परिवर्तित होतात; सौम्य शांत बालकाचा उद्दाम शिरजोर प्रौढ बनतो. कामगार काम करायला नालायक बनतो. नव्या वस्तुस्थिति अप्रतिहत उपस्थित

होत असतात आणि त्यांच्याच बरोबर नव्या समस्या उभ्या होतात. पूर्वी जें कल्याणप्रद ठरलें, तें आतांहि कल्याणप्रद होईल, असें मानून भूतकालाचेच एकमेव मार्गदर्शन कसें अपुरें ठरतें हें अगणित समाजांच्या अपयशांवरून सिद्ध झालेलें आहे.

एखादी नवी वस्तुस्थिति समजून घेण्यासाठीं आणि नव्या समस्येचे फलदायी समाधान शोधून काढण्यासाठीं बुद्धीला स्वतःच्या सारासारविचारशक्तींचा उपयोग करण्याची गरज भासते; आम्हांला जिची अव्यक्त देणगी मिळाली असते, व स्वतःला व्यक्त करण्यासाठीं जिला विशिष्ट अवस्था लागत असतात, त्या स्वतंत्रतेची गरज बुद्धीला भासते. मनुष्याची बुद्धि कोडगी आणि अभेद्य नसते, सर्व प्रकारच्या दडपणांच्या प्रसंगीं ती अत्यंत हळूवार असते, ती स्वतःच सहजीं संकोच पावते. भय जितकें कमी, इहलोकीं किंवा परलोकीं शिक्षा होण्याचा धाक दाखवून जबरीनें अंमलांत आणल्याकारणानें ज्या पूर्वसिद्ध विधींना विचक्षणा केल्यावांचून मान्यता मिळालेली असते, त्याचें दडपण जितकें कमी, तितकी मनाची तरलता आणि योग्यता नवा मार्ग हुडकून काढण्याच्या बाबतींत नवें समाधान शोधून काढण्याचे बाबतींत अधिकाधिक महत्त्वाची ठरत असते. शोधकता ही आपल्या मनाची सर्वोच्च गुणवत्ता असल्यामुळें तिची अभंग सांगड स्वतंत्रतेबरोबर घालण्यांत आली आणि तीच आमच्या जगण्याची व आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

मानवाच्या बुद्धीला माघार घ्यायला लावण्यासाठीं एखादा दंडुका उगारणें देखील पुरेसें होतें. सारासारविवेकशक्ति कायम राहात असल्या तरी त्या सुप्तावस्थेंत स्वस्थ असतात. एकदां कां दंडुका काढून घेतला, कीं मग बुद्धि पुनश्च कार्यप्रवण आणि गतिमान बनते. त्या दंडुक्यांत दडलेलें एक महत्त्वाचें मूलतत्त्व सामाजिक निर्बंध असून त्यांच्याशींच आपण व्यवहार करूं शकतों. ज्याच्यावांचून व्यक्ति जगूंच शकत नाहीं, त्या समूहाला एकत्र राखण्यासाठीं हे निर्बंध अपरिहार्यपणें आवश्यक असतात. परंतु ते दुःसह व त्रासदायक असूं शकतात, आणि मानवजातीच्या विकासकालांत पुष्कळ वेळां तसे ते झाले देखील; त्यांची मजल लांब पल्ल्यापर्यंत जाऊं शकते आणि ते मनुष्याच्या बुद्धीचें एक विशेष आणि अत्यंत महत्त्वाचें स्वरूप असलेल्या निर्माणक्षमतेचा देखील नाश करूं शकतात. राज्याच्या अभावाचें लक्षण असलेल्या अनेक, किंबहुना

बहुतेक, संस्कृति पूर्वकालीन समाजांत हें असें घडलेलें आहे. जिच्याशीं जुळवून घेतलेलें आहे अशी परिस्थिति आणि फेरबदलांच्या योगानें घडवून आणलेली नवी परिस्थिति यांच्यांत जेव्हां फारच मोठी खाई पडत असते (आणि ती एक दोन पिढ्यांत किंवा अनेक शतकांत पडूं शकते) तेव्हां स्थाणुत्वाच्या पाठोपाठ क्षय येतो, आणि क्षयापाठीं लय येतो. यशस्वीपणें जम बसविल्यावर राज्य अस्तित्वांत आलें कीं टोळ्याटोळ्यांनीं नांदणाऱ्या समाजांत सामाजिक निर्बंध जितके परिणामकारक होते, त्यापेक्षां अधिक परिणामकारक होत असतात, कारण त्यांची अंमलबजावणी आतां राज्याकडून म्हणजे संघटित जबरदस्ती आणि हिंसा यांचा उपयोग करण्याचा मूलभूत हक्क असलेल्या संस्थेकडून होऊं लागते. जसजसा राज्याला सुडौल आकार आणि सुसंघटितपणा प्राप्त होतो, तसतसें स्वतंत्रतेची समस्या आणि तिची गुरुकिल्ली असणारी बौद्धिक स्वाधीनतेची समस्या, यांना अतिशय मोठें महत्त्व प्राप्त होतें.

आणखी एक समस्या उपस्थित होते:—मनुष्य स्वतःच्या विचक्षण आणि निर्माणक्षम चतुरस्रांचा उपयोग करण्यास समर्थ होऊं शकतो; तो विचार-स्वातंत्र्य आणि उच्चार-स्वातंत्र्य यांचा उपभोग घेऊं शकतो, परंतु याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं जें त्याच्या हातून निर्माण होतें, तें नेहमींच त्याला त्याच्या शाश्वतीची हमी देत जाईल. ह्याच्या विरुद्ध मात्र बहुधा घडून आलें आहे. व्यक्तींनीं आणि समाजांनीं, आपल्या बुद्धिसामर्थ्याचा उपयोग करून जे निर्णय घेतले त्यानींच त्यांना अधःपतनाची वाट दाखवून दिली. मनुष्याच्या बुद्धीचा त्याच्या शाश्वतींत व अर्थातच प्रगतींत देखील जो वांटा आहे, त्याचा संबंध केवळ मनोव्यापाराच्या अनिर्बंधपणा पुरताच असत नाहीं, तर उचित नाहीं. उलगडा सांपडेपर्यंत चौकशीच्या आणि चुकीच्या क्लिष्ट कंटाळवाण्या प्रयोग-पद्धतींतच अनुभव घेण्याच्या व निमग्न होण्याच्या संभवनीयतेबरोबर देखील तो असतो. समाजाची अत्यंत ताठर रचना संशोधनबुद्धीचाच केवळ ऱ्हास करीत नाहीं, तर ती प्रयोग करून बघण्याच्या संभवनीयतेचा देखील ऱ्हास करीत असते. समाजाची रचना जर अत्यंत सैल असली तर व्यक्तीला असुरक्षितता आणि अस्थिरता यांच्यापायीं स्वत्वांतच आत्मसंकोच करणें भाग पडतें. मनुष्याचें मन विशेषतः निर्माणक्षम असतें आणि जेव्हां समाजाची रचना लवचिक असते, म्हणजे ती बाहेरील आघात व अंतर्गत आघात यांचा

परस्पर विरोध कह्यांत ठेवूं शकण्याइतकी मजबूत असते, आणि ती त्याचवेळीं आपल्या घटकांचीं मनें अवघडून टाकण्याइतकी व सर्वच प्रयोगानुभवांचा भाग असणाऱ्या पुढें जाण्याच्या अगर मागें हटण्याच्या क्रियांचा अवरोध करण्याइतकी ताठर नसते, तेव्हां शाश्वतीचे मार्ग शोधून काढण्याची आपली भूमिका बजावण्याच्या कामांत तें मन अत्यंत चोख असतें.

मनुष्य व्यक्तीवर ( राजकीय किंवा अन्य ) समष्टीनें लादलेलीं बळजबरीचीं नियंत्रणें हटविण्यासाठीं मार्ग दाखवून देणाऱ्या परिस्थितींत सृजनशील असतो. सृजनशील मन जेव्हां चौकशीच्या व चुकीच्या प्रयोग पद्धतींत निमग्न होण्यासाठी पुरेसा सुरक्षितपणा मिळतो, तेव्हां खरोखर फलदायी असतें. समाजांत जेव्हां दोन्ही परिस्थितीचे संच निश्चित स्पष्टीकरण झालेल्या संस्थांच्या, (जीर्णता आणि-कायद्याच्या कक्षेंतली नित्य सत्य असलेली स्वतंत्रतेची अभिव्यक्ति, असा ज्यांचा संक्षेप करतां येईल त्यांच्या) स्वरूपांत, अस्तित्वांत असतात, तेव्हां स्वतंत्र असतो.. या संस्था भिन्न भिन्न असतात खऱ्या; तरीपण त्यांच्यांतला गाभा मात्र आपण पाहिलें त्याप्रमाणें बदलत नाहीं, आणि या मुद्द्यावर उदारमतवादी आणि बिगर-उदारमतवादी यांच्यांत कधींच तडजोड होण्याची शक्यता नसते. मोकळ्या वातावरणांत निवडून आलेल्या नागरिकांच्या प्रतिनिधींच्या सभेंत वादविवादानंर बनलेलें सरकार; राजकीयसत्ता ( लोकशाही ), आर्थिक सत्ता ( संपत्तीच्या मालकीचें प्रसरण ), बौद्धिक सत्ता ( सार्वत्रिक शिक्षण) यांची समान वांटणी, निर्णय करण्याच्या आणि बदलून घेण्याच्या स्पष्ट पद्धतीला मान्यता; मतभिन्नता मार्गभ्रष्टता आणि विरोध यांच्या बाबत सहिष्णुता, यांच्यावर मर्यादा घालणें शक्य असतें, (आणि त्या नेहमीं असतीलच) परंतु त्यांना नकार मात्र असू शकत नाहीं.

# स्वतंत्रतेचे भूतकालीन घटक आणि एक नवी वस्तुस्थिति : ५

स्वतंत्रतेचे गुणविशेष हे जुलमी सत्ता, एकछत्री सत्ता, सर्वाधिकारशाही, अधिकारशाही, हुकूमशाही यांचे विरोधी म्हणून दर्शविणें हा एक नित्य सांप्रदाय होऊन बसला आहे. ह्या सर्व संज्ञाचा निर्देश राजनैतिक व्यवस्थांच्या संदर्भांत होत असतो. सुसंस्कृत समाजांतील राज्याच्या भूमिकेमुळें राजनैतिक संस्थांच्यावर भर देणें, न्याय्य असतें, ही वस्तुस्थिति बहुतेक चळवळी कसल्याहि परिवर्तनाच्या उद्देश्यानें सुरू झाल्या तरी शेवटीं त्यांची परिणति राजकीय चळवळींतच लवकर वा उशिरा झाल्यावांचून राहात नाहीं, यावरून सिद्ध होतें. तरी देखील एखाद्या गुलामी राजवटीचें यशापयश मापण्यासाठीं राजकीय परिस्थितीपेक्षां मानसिक बंधनावस्थाच प्रमाणभूत मानण्यांत येते. सर्वाधिकारशाही संपूर्णपणें प्रस्थापित होते, तेव्हां सर्वाधिकाऱ्याला पाठिंबा देणाऱ्या भव्य सशस्त्र लष्कराची आवश्यकता नसते, तर तेव्हां नागरिक आपल्या विलक्षण बुद्धीचा उपयोग अतःपार करण्याचें सोडून सर्वाधिकाऱ्याची इच्छाच आपली स्वतःची इच्छा मानण्याच्या अवस्थाप्राप्तिप्रत जाऊन पोहचलेले असतात. हें अवस्था-संपादन म्हणजे मोठ्या ताठ्यानें लादण्यांत आणलेल्या नियमांच्या आणि सिद्धांताच्या चौकटींत कार्य करण्यासाठीं मनांच्यावर सक्ति करणारा विचार-नियंत्रणाच्या तंत्राच्या उपयोगाचा परिणाम होय. हें अवस्थासंपादन यशस्वी झालें, असें तेव्हां मानतां येईल कीं जेव्हां नागरिकांचीं मनें, स्वतःची तरलता आणि संशोधनक्षमता गमावून, तदुपरांत नवे विचार आणि नवीं मूल्यें प्रतिपादन करूं शकणार नाहीं.

जर बहुतेक मानवी समाज सुसंस्कृतपणाच्या उदयकालांपासून (आणि अर्थातच त्याच्या पूर्वीं देखील), गुलामगिरींत खितपत होते, तर मग मानव-जातीला समग्रपणानें आपली शाश्वति टिकवून धरणें आणि प्रगति करणें कसें शक्य झालें ? ह्याचें कारण सरळ आहे, आतापर्यंत नेहमीं कांहीं प्रमाणांत स्वतं-त्रता मिळत आली, याचें कारण मानवाच्या मनावर संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठीं लागणाऱ्या पद्धतींचा व तंत्रांचा परिणामकारक उपयोग करूं देण्यांत

अडथळा आणणारीं साधनें यांचा अभाव हें होय.

आतांपर्यंतचा प्रमुख भाग म्हणजे जुलमी सत्तेची रानवट, मागासलेपणाबरोबर संबंधित असलेली कारभाराची अक्षमता आणि राजकीय व शिक्षणविषयक तंत्रांची अपूर्णता हा होय. कधीं कधीं ग्रीकयुगपूर्व कालांतील इजिप्त व चीन यांचा उल्लेख असा करण्यांत आलेला आहे कीं त्यांचा सुसंस्कृतपणानें एखाद्या व्यक्तीला प्रचलित चालीरीती, विचार, मूल्यें आणि संस्था, (ज्यांची प्रगति खुंटल्यामुळें परिणामीं त्यांचा ऱ्हास होऊं लागला होता,) यांच्यापासून विचलित होण्याचा संकेत दर्शविण्यासाठीं पाखंडी बनणें, 'मार्गच्युत' होणें, कांहींतरी नवें संशोधन करणें, हें अशक्यप्राय करून सोडलें होतें. तथापि ग्रीकयुगापूर्वीच्या काळांतील इजिप्तवासीयांच्या बद्दल (आणि अन्य प्राचीन संस्कृतींच्या बद्दल, त्यांनीं व्यक्तीची सृजनात्मकता तिचे सर्व आशय आणि उद्देश दडपून टाकण्याइतकी खच्ची करून टाकली होती, अशा निष्कर्षाविषयीं खात्री पटवून देऊं शकणारी भरपूर माहिती आम्हांला उपलब्ध झालेली नाहीं. चिनी लोकांविषयीं असें म्हणतां येतें कीं गेलीं कमजास्त वीस शतकें व्यक्तिगत मनाला नेहमींच आपल्या संशोधनात्मक कर्तृत्वशक्ती प्रदर्शित करणें बिकट झालें होतें. आतां हेंहि तितकेंच खरें कीं, अधिकारशाही व अनियंत्रित सत्ता आणि रूढीप्रियतेशीं अनुरूपता यांचीं जुळीं बाहुलीं अफाट विस्ताराच्या क्षेत्रांमधील सर्व भागांत सर्व लोकांच्यापर्यंत सर्वकाळ जाऊन पोंहचूं शकलीं नव्हतीं; अधूनमधून मनुष्य कांहीं अंशीं बदल घडवून आणण्याइतका सृजनशील बनण्याची संभवनीयता निर्माण होत असे. आजपर्यंत प्राचीन कालांत, वा अर्वाचीन कालांत पाश्चिमात्य समाजांत वा बिगरपाश्चिमात्य समाजांत, अधिकारवादी राजवटीच्या त्रासदायक तडाख्यापासून व्यक्ति बचावून निसटूं शकल्या, यांचें साधेंसुधें कारण म्हणजे सकल मनांच्यावर निरीक्षण आणि नियंत्रण राखतां येणें शक्य होऊं शकलें नाहीं, हें होय.

अधिकारारूढ गटांच्या मधील अंतरगंत संघर्ष हे दुसऱ्या भागाचे प्रतिनिधिरूप असून त्याचा पहिल्या भागाशी निकटचा संबंध आहे. हे संघर्ष मुख्यतः अधिकारशाहीच्या सदोष संघटनेमुळें उपस्थित होत असतात. मानवजातीच्या सुदैवानें कसलाहि फेरबदल न घडवितां पांचशें वर्षेंपर्यंत टिकणाऱ्या व्हेनिसच्या अधिकारवादी प्रजासत्ताक राज्यासारखे कांहीं अल्प स्वल्प प्रयोग यशस्वी देखील

झाले आहेत. सुसंघटित अनियंत्रित सत्तेखालीं लोकप्रिय बंडाळ्या उभारणें बिकट असतें. परंतु जेव्हां दोन तोतये एका राजमुगुटासाठीं भांडूं लागतात, दोन धर्मगुरु—दोन पोप किंवा दोन खलिफा—धर्मानुयायांची श्रद्धा विभागून टाकतात, किंवा अल्पलोकसत्ताक राज्यांतला एक वर्ग दुसऱ्या वर्गाबरोबर लढाई करूं लागतो, तेव्हां अनुरूपतेची अंमलबजावणी बिकट होऊं लागते, आणि प्रजाजनांना नव्या विचारांचा उच्चार व प्रसार करण्याच्या संभवनीयतेसह बऱ्याच अंशांत स्वतंत्रतेचा उपभोग घ्यायला मिळत असतो.

आतांपर्यंत स्वतंत्रता मिळत गेली याचें कारण केवल अधिकारवादी राजवटींची सदोषता आणि राज्यकर्त्यांच्या मधील संघर्ष, हेंच नव्हे, तर अशा राजवटींची सर्वकाल विविधता होती, हें देखील आहे. कायमची विभागणी झालेल्या युरोपला या बाबतींत, पश्चिम रोमन साम्राज्य कोलमडून पडल्यापासून, इतर संस्कृतींच्या पेक्षां अनुकूलता भोगायला मिळालेली आहे. डॉन्टेला त्याच्या फ्लॉरेन्टाईन वैऱ्यांच्या पेक्षां अधिक अत्याचारी आणि आगळेच, व म्हणूनच पोप आणि त्यांचे स्वार्थी ग्वेल्फा यांच्यावर त्याला हल्ला चढविण्याची मुभा देण्याची इच्छा असलेले, जुलुमी अधिकारी जर व्हेरोनो व रॅव्हेन्ना येथें न सांपडते, तर त्यानें कदाचित् गप्प बसणेंच पत्करलें असतें. ल्यूथरला सॅक्सनीच्या फ्रेडरिक-प्रमाणें अनियंत्रित, आणि आपल्या समानशील अनियंत्रित राज्यकर्त्यांबद्दल जरा देखील ममत्व नसणारा व त्यांचे मुलूख मिळकत करण्यासाठीं निमित्तावर टपून बसणारा असा राज्यकर्ता जर सांपडला नसता तर हस आणि सॅव्हनरोला यांच्या सारखाच त्याचा शेवट झाला असता. जर चवथा हेन्री किंवा चौदावा लुई यांच्या युरोप पादाक्रांत करण्याच्या महान् योजना मूर्तस्वरूपांत आल्या असत्या तर व्हाल्टेअरची संशोधक प्रतिभा, जशी (तेव्हां फ्रान्समध्यें हिंडणें देखील मुष्किलीचें झाल्यावर) त्याला फ्रेडरिकच्या प्रशियासारख्या बऱ्याच संस्थांनामध्यें, फ्रांसपेक्षां अधिक प्रमाणांत अनियंत्रित सत्ता तेथें असून देखील, आश्रय मिळाल्यानंतर प्रफुल्लित झाली, तशी होतीना. अगदीं अलीकडे रशियानें कित्येक जर्मनांना नाझींच्या जुलमांपसून मुक्त होण्यास मदत केली, तर फॅसिस्ट इटालीनें सोव्हियट अत्याचारांतून निसटण्यासाठीं रशियनांना साहाय्य केलें होतें.

आणखी एका चवथ्या गोष्टीनें स्वतंत्रतेच्या परिस्थितींना शाबूत ठेवण्यांत साहाय्य केलें आहे. आतांपर्यंत सर्व राज्यें प्रादेशिक राज्यें आहेत. कुणी देखील

संबंध पृथ्वीगोल व्यापलेला नाहीं. सरहद्दींच्या पलीकडे नेहमीं परकीय लोक राहात आले आहेत. कमीजास्त प्रमाणांत सुसंकृत असूनहि ते चालीरीती, विचार व संस्था यांच्या बाबतींत भिन्न होते. हजारों वर्षांच्या कालखंडापासून तों कांहीं वर्षांच्या अवधीपर्यंत, परंतु नेहमीं परकीयाचें दडपण एखादें राज्य, मग त्याची संघटना केवढीहि कर्तव्यतत्पर असली तरी, कोलमडून टाकायला सरतेशेवटीं कारणीभूत झालेली आहे, नवें राज्य ज्या जुन्या राज्याच्या जागीं येत असे, तें देखील जुन्याच्या सारखेंच नेहमींप्रमाणें अनियंत्रित होऊं लागत असे. परंतु अत्याचारी राजवटींच्या अस्तोदयाच्या दरम्यान असा कालखंड येत असे कीं तेव्हां व्यक्ती, त्यांना आवडो अथवा न आवडो, स्वतंत्र होत असत. हा कालखंड कांहीं वर्षांपुरता किंवा कित्येक पिढयांपर्यंत टिकत असे. कधीं कधीं निराशा, गोंधळ, अव्यवस्था आणि व्यथा इतक्या थराला गेल्या कीं स्वतंत्र झालेलीं माणसें जडबधिर आणि स्वतःच्या सृजनात्मक चैतन्याचा उपभोग करण्यास असमर्थ बनलीं, परंतु याच्या उलट कांहीं प्रसंगीं नवी अनियंत्रित राजवट स्थित होऊं शकण्यापूर्वीं तें चैतन्य भराऱ्या मारूं लागलें आणि त्यानें मनुष्याच्या प्रगतीला कांहींतरी नवें लेणें चढविलें. पाश्चिमात्य, हिंदी व चीनी संस्कृतींमधील कांहीं अत्यंत महत्त्वांचे सृजनात्मक कालखंड जेव्हां बाह्य दडपणानें अंतर्गत व्यवस्थेचीं शकलें केली तेव्हां, होऊन गेले.

आतांपर्यंत स्वतंत्रतेची मागणी केल्यावांचून देखील ती असूं शकत होती. आज अमेरिकांच्या, युरोप, आशिया, आफ्रिका यांच्या, बऱ्याच भागांत तेथील लोकांना स्वतंत्रतेची कदर वाटत नसली तरी, ती नांदत आहे. सदोष अनियंत्रित सत्ता, अधिकारवादी व्यवस्थांचे अंतर्गत संघर्ष; अथवा अधिकारवादी प्रवृत्तींच्या मधील भांडणतंटे, आगळया स्वरुपाची अनियंत्रित सत्ता, आणि बाह्य दडपण यांच्या मुळें असें प्रत्ययाला आलें, (आणि आजहि येतें), कीं बहुमताची जी अत्युच्च आकांक्षा असल्याचें वरवर वाटत असतें आणि अनियंत्रित सत्ता व सांप्रदायिक अनुरूपता यांनीं बाह्यात्कारीं ज्यांची हमी दिलेली असते, त्या शांततेंत आणि शांतपणांत मनुष्यानें स्थिरस्थावर होऊं नये.

ही वस्तुस्थिति आतां आधींच बदलूं लागली आहे, आणि अजूनहि अधिक आमूलाग्रपणानें बदलण्याचा संभव आहे. अधिक पुढारलेल्या राष्ट्रांत अधिकारशाहीच्या जागीं हुकूमशाही वाढत्या प्रमाणांत येत आहे. मानवी प्रयासांची

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम

सर्वच कार्यक्षेत्रें राज्याच्या नियंत्रणाखालीं आणण्यापुरतीच. हुकूमशाहीची अधिकारशाहीबरोबर मतभिन्नता असते. शाळेचा उपयोग ठराविक टणक सांच्यांतली मनें घडविण्यासाठीं करण्यांत येतो, सारासारविचारशक्तींच्या विकासार्थ नव्हे; सार्वत्रिक शिक्षण सार्वत्रिक सांप्रदायिक बनतें. वृत्तपत्रें आणि तत्सम माध्यमें शिक्षण देण्यासाठीं न वापरतां सिद्धांताची संथा देण्यासाठीं वापरणें शक्य होतें. व्यक्ति आपल्या आर्थिक उद्योगांत निमग्न असतांना तिच्यावर केंद्रीय अधिकाराचा अंकुश ठेवण्याची सुलभता कारखाने व कचेऱ्या यांत बऱ्याच मोठ्या संख्येत लोक एकत्र जमत असल्यामुळें आणि एकमेकांच्या सहवासांत येत असल्यामुळें उपलब्ध झाली आहे. त्याच केंद्रीय अधिकाराला दळणवळणाचीं व वाहतुकीचीं जलद साधनें उपलब्ध असल्यामुळें एखाद्या ठिकाणचा असंतोष अथवा विरोध इतरत्र पसरण्यापूर्वीच दडपून टाकतां येतो. भरभक्कम सढळ रकमांच्या अंदाजपत्रकामुळें नागरिकांच्यावर आणि एकमेकांवर गुप्त नजर राखण्यासाठीं अधिकाधिक हस्तक नेमणें शक्य झालेलें आहे. जेव्हां राज्य, शिक्षण आणि संपत्ति यांच्यावर एकाच अधिकाराचा अंकुश असतो, तेव्हां व्यक्तीची राजकीय स्वतंत्रता संपुष्टांत येते.

गेल्या दोनशें वर्षांच्या काळांतील बौद्धिक स्वातंत्र्याचे तेजस्वी परिणाम ठरलेलीं संशोधनें आणि शोध यांनीं मानवसमाजामधील गुंतागुंती अधिकाधिकच वाढविल्या आहेत. गुंतागुंतींनीं परस्परावलंबन निर्माण झालें आहे, आणि उलट त्याच्यामुळें व्यक्तीची स्वतः एकट्याला अलिप्त ठेवून आपल्या स्वायत्ततेची जोपासना करण्याची संभवनीयता ह्रास पावत आहे. मनुष्यजातीच्या इतिहासांत 'गेस्टापो' 'ओव्रा' आणि 'एम्वीडी' यांचे प्रमुख या नात्यानें एकट्याच व्यक्तींच्या हातीं जितकी सत्ता आलेली आहे, तितकी कधीहि आलेली नव्हती. रेडियो व ॲटम यांच्या युगांत उपलब्ध असलेल्या सोयी सवलती वेह्ये, व्हेनिसचें त्रिकुट, इनक्वीझिशन, चवथा इवान, दुसरा अब्दुल हमीद, आणि त्झु हाई यांना कधींच प्राप्त झाल्या नव्हत्या. नालायक जुलमी राज्य आतां भूतकाळांत जमा झालेली वस्तु आहे.

स्पेन्सरनें पद्धतशीर प्रतिपादन केलेला विकासक्रम आमच्या डोळयांदेखत घडत आहे. स्वावलंबी व त्या प्रमाणांत किंचित् भिन्नता असलेल्या समाजांची जागा अधिक जास्ती भिन्नता असून देखील परस्परावलंबी असलेल्या समा-

जांनीं घेतलेली आहे. केव्हां ना केव्हां तरी सर्व मानव जातीचा समावेश असलेला एक जागतिक समाज होईलच. तो आपणाला प्रगतीचें एक नवयुग आणून देईल, त्यांत परागतीचीं आणि अंतिम अवनतीचीं बीजें देखील असू शकतील. हें सर्व कांहीं त्याची संघटना कशी होईल, त्याचें तत्त्व सत्ता असेल कीं स्वतंत्रता असेल, यांच्यावर अवलंबून राहील. विशेष जुलमी राज्यपद्धति आणि बाह्य दडपणें यांना त्याच्यांतून वगळण्यांत येईल. स्वतंत्रता, जी गरज असो वा नसो, प्रगतीचा स्रोत असते, ती यापुढें आतांपर्यंत कार्यान्वित असलेल्या शक्तींचा परिणाम म्हणून राहणार नाहीं. अशी वेळ येईल तेव्हां जागतिक समाजांत त्याची स्वतःची स्वतंत्रतेची आकांक्षा आणि ज्यांच्या द्वारें ती आकांक्षा नागरिकांच्या स्वाधीन बनते त्या संस्था असण्यावरच, प्रगति आणि तिच्याच बरोबर मनुष्याची शाश्वति ही सर्वस्वी अवलंबून राहील.

# स्वतंत्रतेची आकांक्षा म्हणजे उदारमतवाद : ६

गेल्या बहुतेक दोनशें वर्षांत पश्चिमेंतील युरोपियन आणि उत्तरेकडील अमेरिकन हे पूर्वी स्वत: ते किंवा त्यांचे अन्य-संस्कृतीमधील समकालीन जितके स्वतंत्र होते त्यापेक्षां अधिक जास्त स्वतंत्र आहेत,—मनुष्यजातीला जीं संशोधनें आज पुढें नेत आहेत, त्यांच्या शोधार्थ त्यांना समर्थ बनवूं शकणाऱ्या परिस्थितींचा उपभोग घेत आहेत, इतकेंच केवळ नव्हे, तर उत्तर अटलांटिक प्रदेशांमधील राष्ट्रांनीं याच्याहिपेक्षां आगळें चांगलें करून दाखविलेलें आहे; तें म्हणजे स्वतंत्रतेच्या आकांक्षेवर भर देणें आणि ज्या संस्थांच्या द्वारें स्वतंत्रता म्हणजे एक अप्रिय योगायोग घडण्याऐवजीं, सुसंस्कृत समाजाचें कायमचें स्वरूप होईल, अशा संस्थांचा विकास करणें, होय.

हें विधान, जे सांप्रदायिकवादी, राष्ट्रवादी आणि समुदायवादी स्वतंत्रता म्हणजे स्वराज्य मानतात, व्यक्ति आणि गट यांचा घोटाळा करतात, त्यांना चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. मनुष्यजातीला बहुधा स्वराज्याची आकांक्षा काय ती माहिती झालेली आहे; त्याला अशा गटाच्या स्वायत्ततेची आणि जबाबदारपणाची उत्कट इच्छा असते कीं जेथें व्यक्तीच्या स्वायत्ततेची आणि जबाबदारपणाची उत्कटेच्छा नसते. अकराव्या कीं बाराव्या शतकांत जेव्हां शहरी युरोपियन जमातींनीं केंद्रीय सत्तेला विरोध केला, तेव्हां त्यांची दृष्टि मुख्यत: स्वराज्य सत्तेवर होती; स्वतंत्रतेवर नव्हती (तरी पण त्या बहुधा बरोबरच येत असत). फ्लेमिश किंवा इटालीमधील शहरांतील कनिष्ठ वर्गांनीं जेव्हां वरिष्ठ वर्गाचा विरोध चालविला होता, तेव्हां त्यांच्या दृष्टीपुढें स्वराज्यसत्ताच होती, तद्वतच विशेष सवलतीसाठीं गिल्ला करणारे श्रेष्ठीचे संघ (गिल्ड) आणि दर्यापार जाऊन तिकडील प्रदेशांत वसाहती करणारे धर्मनिष्ठांचे गट यांचीहि दृष्टि होती. चीनमधील कुणातरी लु-शान पासून हुंग-स्यु-चुआन पर्यंत सर्वांचीं बंडें, मुसलमान राज्यकर्त्यांविरुद्ध मराठे, जाट व शीख यांचे उठाव या सर्वांचें लक्ष्य स्वतंत्र नागरिकांचीं राष्ट्रकुलें स्थापन करण्याचें नव्हतें, तर केवळ स्वराज्यस्थापना हें होतें. एकदां स्वराज्यसत्ता किंवा स्वायत्तता हातीं आली कीं मग गटाचे पुनर्संघटन बहुधा स्वत:च्या अधिकारवादी संस्थांच्या पायावर होत असे.

याचा अर्थ असा नव्हे कीं स्वतंत्रतेच्या आकांक्षेचें मुळींच उदाहरण घडलेलें नाहीं. व्यक्तीच्या स्वायत्ततेला अनुकूलता मिळविण्यासाठीं, आपल्या जीवनांत व्यक्तीला त्याच्या किंवा तिच्या यशापयाबद्दल मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरविण्यासाठीं, ( म्हणजेच स्वतःच्या सृजनशील बुद्धीच्या उपयोगार्थ अनुकूलता प्राप्त होण्यासाठीं ) राज्याची पुनर्घटना करण्याचे बुद्धिपुरस्सर प्रयत्न निःसंशयानें घडल्याचीहि किती तरी उदाहरणें आहेत. जुलमी राज्य किंवा सांप्रदाय यांच्या विरुद्ध उठणाऱ्या सर्वच बंडवाल्यांना कांहीं स्वतःचें राज्य अगर सांप्रदाय यांच्या जागीं कुणाचें तरी राज्य किंवा सांप्रदाय आणून बसवायची इच्छा नव्हती. प्राचीन भूमध्यसागर प्रदेशांतील कांहीं नगरराज्यें ( एक रोमन प्रजासत्ताकाचा अपवाद वगळल्यास ), मध्ययुगीन युरोपांतील नगरराज्यें, कांहीं रशियन, इस्लामी, आणि हिंदी जमाती, यांचें नेतृत्व ज्यांनां सामान्यतः केवळ अल्पकालच लाभलें, त्यांच्या हालचालींना स्वतंत्रतेच्या आकांक्षेंतूनच प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळालेलीं होतीं. परंतु ज्यांना विकसनाचे प्रतिनिधिस्वरूप नमुने असे खात्रीपूर्वक म्हणतां येणार नाहीं अशीं हीं थोडीं उदाहरणें बाजूला सारलीं म्हणजे स्वतंत्रता ही बहुतांशीं हेतुपूर्वक प्रयत्न आणि निश्चित मत यांचा परिणाम नव्हती, तर मनुष्याची आकांक्षा व उत्कटेच्छा यांच्याशीं सुतराम् संबंध नसलेल्या अशा कांहीं इतर कारणांची ती परिणाम-स्वरूप होती.

गेलीं तीनशें वर्षें आधुनिक सुधारणेंत बऱ्याच अंशीं जें मूलभूत तत्त्व अनुस्यूत होतें, (आणि सुदैवानें उत्तर अटलांटिक राष्ट्रसमूहांत आजहि आहे ) आणि स्वतंत्रतेवरील मनुष्याच्या निष्ठेविषयीं ज्या कांहीं स्वप्नवत् कल्पना आहेत, त्यांच्या प्रकाशझोतामध्यें दिसणारी वस्तुस्थिति जरी कितीहि घृणास्पद असली तरी, हें आपल्याला मान्यच केलें पाहिजें कीं जुलमी राज्यसत्ता आणि सांप्रदायिकता यांच्या स्वरूपांत रूढीची छळवादी शक्ति क्रमाक्रमानें अधिक बळकट करण्याची प्रवृत्ति मानवी विकासामध्यें कित्त्यादाखल होती आणि आज देखील हुकूमशाहीच्या प्रगतीच्या पुढयांत ती आहे. या छळवादी शक्तीला छिन्न-भिन्न करण्याचें कार्य स्वतंत्रतेच्या आकांक्षेनें केलें नव्हतें, तर वेळोवेळीं तें योगायोगांच्या मालिकांमुळें, कीं ज्यांच्या पुनरावृत्तीची शक्यता आतां कमी कमी होत आहे त्याच्यामुळें, घडून आलें, आणि त्याच्या योगानें मानवी सामर्थ्यें तद्वतच, संशोधनाची

प्रवृत्ति बंधमुक्त झाली, प्रगतीच्या दिशेनें पुढचें एक पाऊल पडण्याची शक्यता घडूं शकली.

आधुनिक सुधारणेंत जो साचेबंदपणा घडून आला, त्याच्यामधून बाहेर पडण्याच्या मार्गभिन्नतेच्या प्रतिक्रियेकडे अनेक लोक आज उपेक्षेनें किंवा किमान अपेक्षेनें बघत आहेत. पाश्चिमात्त्य समाजांत देखील जी केवळ क्वचित् आणि अपवादात्मक प्रसंगीं आपणहून प्रगटली, ती स्वतंत्रतेची उत्कटेच्छा कांहीं काल संपूर्ण पश्चिमेचें नेतृत्व लाभण्याइतकी आणि अल्पकाल बहुतेक सर्व मनुष्य-जातीवर प्रभाव पडूं शकण्याइतकी सामर्थ्यशाली चळवळ बनलेली होती. तों-पर्यंत सामाजिक संघटनेची अत्यंत महत्त्वाची कर्तबगारी म्हणजे दुराचरणी राज-कर्ता पदच्युत करून त्याच्या जागीं चांगला राज्यकर्ता आणून बसविणें, येवढीच होती. ही चळवळ निरनिराळया नांवांनीं निरनिराळया काळीं निर-निराळया ठायीं परिचित झालेली आहे. अमेरिकन लोक हिला लोकशाही म्हणतात. युरोपियन लोकांना या शब्दामुळें रोब्सपियर, नेपोलियन, व लेनिन यांचीं नांवें आठवूं लागतात, आणि समष्टीच्या आकांक्षेचें प्रतिनिधित्व आपल्याकडे आहे असें मानून व्यक्तींचें निर्दालन करणारांचें स्मरण होतें, म्हणून त्यांनीं उदारमतवाद किंवा उदारमतवादी-लोकशाही हा शब्द प्रयोग वापरलेला आहे. मुख्यत: जर स्वतंत्रतेच्या ठाम प्रतिपादनावर भर द्यायचा असेल, आणि जर स्वातंत्र्याच्या दिशेनें जाणाऱ्या परंतु जुलमी राज्यसत्तेचे व सांप्रदायिकपणाचे पाश घट्ट आवळण्याचें उद्दिष्ट असणाऱ्या आकांक्षेच्या लोकप्रियतेवर जोर द्यावयाचा नसेल, तर 'उदारमतवाद' हीच संज्ञा रास्त ठरेल; आपला कित्ता जर 'मार्गभिन्नता' ठरला तर मग आप-ल्यालाभविष्यकालाबद्दल निश्चित विश्वास धरतां येईल; नाहींतर मनुष्यजातीला उत्थान पतनाच्या नित्याच्या चक्राचा फेरा अनुभवतांना एक नवी वस्तुस्थिति कळून येईल कीं जर एकदां विश्वाचें समाजपतन घडलें तर मग पुनरपि उत्थाना-ची आशाच नको

सतराव्या शतकाच्या दरम्यान स्वतंत्रतेच्या आकांक्षेनें प्रेरित झालेल्या अट-लांटिकच्या दोन्ही किनाऱ्यावरील प्रारंभींच्या मूठभर उदारमतवाद्यांचे (किंबहुना उदारमतवादाचे पूर्वगामी असणारांचें म्हणणें अधिक बरें ) उद्देश अनिवार्यपणानें संदिग्ध आणि मर्यादित होते. केवळ त्याच शतकाच्या उत्तरार्धामध्यें लोकांचा असा एक समूहमुल्यस्वेंकरून इंग्लंडमध्यें आढळून येतो कीं ज्यांना एक नवा प्रत्यय

आलेला होता. तो म्हणजे स्वतंत्र समाजाला केवळ स्वत:मुक्त जीवन जगण्याची, स्वत:च्या पायावर उभें राहण्याची आणि स्वत:च्या जीवनांचा स्वामी होण्याची आकांक्षाच आवश्यक असत नाहीं, तर त्याच वेळीं त्याच स्वतंत्रतेवर अन्य व्यक्तींचा देखील हक्क मान्य करण्यासंबंधींची इच्छा देखील त्यांच्यांत असावी लागते, हा होय,

उदारमतवादाचें यश ज्या दोन तत्त्वांबरोबर निगडित असतें, आणि जीं एकाच व्यक्तीच्या अथवा एकाच समूहाच्या ठायीं सहजासहजीं सांपडत नसतात आणि सारखींच अपरिहार्य असतात, तीं म्हणजे सार्वजनिक अथवा खासगी, राजकीय, आर्थिक, अथवा धार्मिक जुलूम, आणि त्या जुलमाला अनुकूल असणाऱ्या प्रत्येक वस्तु अगर परिस्थिति यांच्याशीं किंचितहि तडजोड न करतां लढण्याचा निर्धार, आणि ज्यांच्या मताशीं आपलें जुळत नाहीं, व जे कुणी, त्यांच्या आकांक्षा, प्रवृत्ति आणि हितसंबंध कसेहि असले तरी, स्वतंत्र संस्थांना धोका निर्माण करीत नाहीं, अशांच्या विषयीं सहिष्णुता यांच्या द्वारेंच फक्त समाजाची अशी पुनर्घटना करतां येणें शक्य होईल कीं जिच्यामुळें व्यक्तीला स्वत: समाजाचें व तद्वतच त्याच्या घटकांचें अस्तित्व कायम टिकविण्यासाठीं आवश्यक असलेल्या व्यवस्थेला अनुरूप असणाऱ्या कमाल स्वतंत्रतेचा उपभोग घेतां यावा.

मनुष्याच्या गतिमानतेची कल्पना जरी स्वयंसिद्ध मानली तरी देखील सार्वजनिक कामकाजाबद्दलची व्यवहारविषयक कार्यपद्धति आणि ज्या गुणवैशिष्ट्यांमुळें ती कार्यपद्धति शक्य झाली त्यांचें निश्चित प्रतिपादन हें मात्र उदारमतवादांत अपरिवर्तनशील असतें. प्रसंग आणि प्रश्न यांच्या अनुषंगानें वागण्यासंबंधीं कृतिवैचित्र्य असू शकतें. उदारमतवादला कांहीं मनुष्यजातीच्या मोक्षप्राप्तीचा ताम्रपट मिळालेला नाहीं, आणि स्वतंत्रतेवाचून अन्य कसल्याहि अशा ताम्रपटाची शक्यता त्याला नाकबूल आहे. जेथें बंधनें, परवाने, आणि नियम यांच्यामुळें आर्थिक विकास खुंटला होता, तेथें उदारमतवादी त्यांच्या निर्मूलनासाठीं तरफदारी करीत होते, जेव्हां मुक्त आर्थिक शक्ती बेजबाबदारपणें वागल्या आणि कामगारांच्या किंवा गिऱ्हाइकांच्या स्वतंत्रतेला धोक्यांत आणूं लागल्या तेव्हां उदारमतवादानें नियंत्रणांची तरफदारी केली होती, याची साक्ष युरोपांतला आणि लॅटिन अमेरिकेंतला जहालवाद, अमेरिकेंतल्या संयुक्त राज्यांमधला 'देवघेव' वाद यांनीं पटलेली आहे.

जेव्हां राष्ट्रें परतंत्र असतात तेव्हां उदारमतवाद हा राष्ट्रवादी असतो; जेव्हां राष्ट्रें दुसऱ्यांची स्वतंत्रता धोक्यांत आणूं पाहातात, तेव्हां उदारमतवाद आंतरराष्ट्रवादी बनतो. जेव्हां टोळयाटोळयांमधील अंतर्गत भांडणें, गुलामगिरी, नरमेध, नरमांसभक्षण इत्यादिकांचा नायनाट करण्याची समस्या उद्‌भवते, तेव्हां उदारमतवाद राज्यांच्याकडून अथवा ज्या आंतरराष्ट्रीय संघटना, अनुचित व्यवहारांना लगामी लावणें व मनस्वी जुलमाचा नायनाट करणें, यांच्या प्रीत्यर्थ संघटित झालेल्या असतात, त्यांच्याकडून बाहेरून कारभाराचा हस्तक्षेप करण्याच्या आणि मनस्वी जुलूम छिन्नभिन्न करून टाकण्याच्या पक्षाचा असतो; जेव्हां हे अनर्थपात समूळ नष्ट होतात आणि स्वतंत्र संस्था स्थापन करण्याची शक्यता दिसूं लागते, तेव्हां उदारमतवाद बसाहतविरोधी असतो. जेव्हां धर्मसंस्थांचा जुलूम सुरू होतो, तेव्हां उदारमतवाद त्याला विरोध करतो; जेथें धर्मसंस्थांवर जुलूम होतो, तेथें उदारमतवाद त्यांचा पक्ष घेत असतो. अशा तऱ्हेनें उदारमतवाद म्हणजे चिरकालीन क्रांति असते; अर्थातच अशा संस्थांच्या अंतर्गत ती चिरकालिक असते, कीं ज्यांचें कार्य क्रांतीच्या चिरकालीनत्वाची हमी देणें व मारक स्थाणुत्वाला प्रतिबन्ध करणें, हें असून त्यांच्यांत परिवर्तन घडून येऊं शकत नाहीं, आणि तें घडून येतां कामां नये.

बिकटच एकूण ? अर्थातच. कोणताहि उदारमतवादी लोकशाहीवादी समाज मोठाल्या अडचणींच्या सन्मुख उभा असतो, तेव्हां त्यांच्यावर तो फक्त प्रगल्भ विचार व प्रगल्भ आचार यांच्या योगें मात करूं शकेल; आणि उदारमतवादाला प्रगल्भपणाची आवश्यकता असते, ती उच्च पातळीवरची. जुलमी राज्यसत्ता— मग ती फॅसिस्ट असो वा कम्युनिस्ट असो, लष्करी मुखवट्याची असो कीं गतानुगतिक पद्धतीची असो—तिचें स्वरूप मनुष्यजातीच्या बाल्यावस्थेप्रमाणें असतें. त्यांच्या लक्षणांसंबंधीं असें म्हणतां येईल कीं गुलाम राष्ट्रें व गुलामगिरीचे समर्थक यांचा दर्जा फॅरोहाच्या युगांतील इजिप्तच्या लोकांइतका आहे. कदाचित् मनुष्यजातीच्या भाग्यांत बाल्यावस्थेमधून कधींहि विकास न होण्याचें असेल. अथेन्सच्या लोकांनी तसा प्रयत्न करून पाहिला आणि तो फसला; रोमच्या लोकांनीं प्रयत्न केला आणि तो सुद्धां कालांतरानें अयशस्वी झाला; एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांमधले बरेचसे उदारमतवादी प्रयत्न पहिल्या किंवा दुसऱ्या मोठ्या आणाबाणीच्या प्रसंगीं अपेशी ठरले. तरी देखील प्रगल्भता

प्राप्त करून घेणें शक्य असतें, व तिची जोपासना करतां येणें शक्य असतें, यासंबंधीं पुरावा देतां येईल; जर स्विस, डच, उत्तर अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच, व स्कॅन्डेनेव्हियन लोक स्वतंत्रपणें नांदू शकतात, तर कधीं काळीं इतर सर्व राष्ट्रांना तसें राहातां येऊं नये, याला कांहींहि कारण नाहीं. मात्र स्वतंत्र संस्थांना चिरस्थायी करण्याचा आवश्यक प्रयत्न केला पाहिजे, व नागरिकांच्या मनांत स्वतंत्रतेची जाणीव बलवत्तर केली पाहिजे.

# स्वतंत्रतेचीं फलितें : ७

मनुष्याला स्वतंत्रता उचित असते, आणि फक्त स्वतंत्रताच मनुष्यजातीला जिवंत राखण्याची हमी देऊं शकते, असें सांगून झाल्यावर वास्तविक उदारमताचा अधिकार आणि उदारमतवादी लोकशाही यांच्या समर्थनार्थ अधिक कांहीं पुस्ती जोडण्याची गरज नाहीं. दोन पिढ्यांच्याहि पूर्वी रेनाननें जें लिहून ठेवलें, ("स्वतंत्रता सत्यासमान असते, तिच्याबद्दल क्वचितच कुणाला निरपेक्ष आस्था वाटत असते." तें आज देखील दुर्दैवानें अधिक सत्य ठरतें. पुष्कळच अधिक लोक आपली दृष्टि विशाल क्षितिजावर टाकायला असमर्थ ठरलेले आहेत. शब्दाच्या प्राकृत अर्थानें ते व्यवहारकुशल आहेत, आणि त्यांच्या तात्कालिक महत्वाकांक्षाच्या जवळ जवळ समान असणाऱ्या प्रगतींवर स्वतंत्रतेचा कितपत प्रभाव पडलेला आहे, हें जाणून घेण्याची त्यांना गरज वाटत आहे.

उदारमताच्या पूर्वेतिहासाची निश्चयात्मक बाजू स्पष्ट आहे. पहिलें आणि महत्त्वाचें असें कीं आधुनिक कालांत उदारमतवाद, त्यानें जें प्रत्यक्षपणें पदरांत पाडून घेतलें त्याच्यामुळें, व त्याच्याकडून ज्या चेतनांचें विमोचन घडलें त्यांच्या योगानें, मनुष्यजातीचें क्रांतिकारक सामर्थ्य बनून चुकला आहे. त्यानें बहुधा कोणत्याहि इतर आंदोलनापेक्षां मानवी समाजांचें रंगरूप पालटून टाकलें आहे, त्या परिवर्तनाचें एखाद्याला पूर्ण मोजमाप करायचें झाल्यास त्यानें क्षणभर थबकून दोनशें वर्षापूर्वीचें जीवन आणि आजचें जीवन यांचा विचार करून पाहाणें आवश्यक आहे. उदारमतवादाचा संघर्ष सर्वत्रच,—फार काय पण जेथें आज कम्युनिझमची शिरजोरी असून तो उदारमतवादाला धुडकावून लावतो, तेथें—म्हणजे रशियन आणि चिनी राष्ट्रांमधून देखील जाणवूं लागलेला आहे. पश्चिम युरोपांत आणि उत्तर अमेरिकेंत त्यानें आज अस्तित्वांत असलेल्या उदारलोकशाही राज्यांना जन्म दिला होता; पूर्व युरोपांत, भूमध्यसागर-प्रदेशांत, आणि लॅटिन अमेरिकेंत तो अगम्य स्वरूपाच्या परंपरागत राज्यपद्धतींची शकलें पाडायला कारणीभूत झाला, आशियांत निद्रिताप्रमाणें सुस्त बनलेल्या प्राचीन संस्कारांना त्यानें गदगदा हालवून सोडलें, आणि जरी आतापर्यंत कांहीं देशांत त्याची फलश्रुति प्रामुख्यानें परंपरावादी जुलमी सत्तेकडून जहालमतवादी जुलूमशाहीकडे

वळण्यांत झाली असली, तरी इतर बऱ्याच देशांत इराणपासून लंकेपर्यंत, भारतापासून जपानपर्यंत, उदारमतवादी लोकशाहीला जीवनाचा एक नवा मार्ग बनण्याची संधि प्राप्त झाली आहे. आफ्रिकेंत सहाराच्या दक्षिणेला त्यानें संस्कारपूर्व जमातींना अधिक बऱ्या आणि अधिक पूर्ण जीवनाकडे पुढें वाटचाल करण्याची संधि दिलेली आहे. आज ज्यांना महत्त्व आहे, ते ते सगळेच,—लोकशाही, भांडवलशाही; आणि समाजवाद, राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रवाद, निधार्मिकवाद, व मानवतावाद, अशा जेथें उदारमतवादी संस्था आहेत,—त्या राष्ट्रांमध्येंच जन्म पावले होते. भल्यासाठीं असो, कीं बुऱ्यासाठीं असो, (दीर्घ कालांतरानें भल्यासाठींच असें मला वाटतें,) उदारमतवादी अल्पसंख्यांक लोकांनीं पुरविलेल्या चेतनाशक्तीमुळेंच आज मनुष्यजाति गतिमान झालेली आहे.

गुलामगिरी, भूदास प्रथा, खिदमतगारी, आणि व्यक्तिगत स्वतंत्रतेवरील अन्य निर्बंध हे सर्व कालाच्या उदयापासूनच स्वयंसिद्ध मानण्यांत आलेले होते, आणि आज देखील जगाच्या पाठीवरील विविधि भागांत ते स्वयंसिद्ध मानण्यांत येतात. औद्योगिक भूदासप्रथेनें, व्यक्तिगत कामगाराला त्याच्या कामाशीं शृंखलाबद्ध केल्यामुळें औद्योगीकरणाला एक प्रमुख धोका निर्माण झालेला आहे; ही प्रथा भांडवलदारी समाजांमधून अव्हेरण्यांत आली याला कारण ज्याच्या अंतर्गत भांडवलशाही विकास पावली, तें स्वातंत्र्य होय; समष्टिवादी पद्धतीच्या झपाट्यानें वाढत जाणाऱ्या अधिकारशाही समाजांचें ती एक आवश्यक स्वरूप होऊन बसलेली आहे. ज्या रशियन व चिनी शेतकऱ्यांना आपल्या राज्यकर्त्यांच्या आज्ञा मान्य करण्याची इच्छा नव्हती, त्यांच्या करण्यांत आलेल्या कत्तली भूदासप्रथा कायदेशीर ठरविते; याच भूदासप्रथेविरुद्ध १९५३ मध्यें व्होर्कुटा कामगार छावण्यांच्या मधील कामगार व पूर्व बर्लिन मधील कामगार बंडें करून उठले होते, आणि १९५६ मध्यें पोझनान कामगारांनीं उठाव केला होता. जेव्हां आणि जेथें उदारमतवाद पुरेसा भरभक्कम बलिष्ठ होतो, तेव्हां आणि तेथून गुलामगिरी, भूदासप्रथा व खिदमतगारी अदृश्य होतात. उदारमतवादी चळवळींच्या दडपणांमुळेंच रशियांत १८६१ सालीं आणि अमेरिकेंत १८६३ सालीं गुलामगिरी प्रथेपासून विमोचन घडून आलें होतें. आपल्याला जरी अगोदरच विसर पडलेला असला तरी आधुनिक मानवाच्या साध्य महत्कृत्यांच्या पैकीं एक म्हणजे गुलामगिरी प्रथेचें उच्चाटन हें असून तें झालें त्याला परंपरागतवादाची, राष्ट्रवादाची, किंवा कम्युनिझमची

प्रेरणा कारणीभूत झाली नव्हती, तर उदारमतवादाची झालेली होती. आफ्रिका आणि पश्चिम आशियामधील गुलामगिरीची प्रथा संपूर्णतया निर्मूलन करण्यासाठीं तीव्र आंदोलन व प्रत्यक्ष कृति करण्यांत, लंडनमध्यें १७८० सालीं गुलामगिरी प्रथेला विरोध करण्यासाठीं संस्था स्थापन करण्यापासून तों १९०० सालीं गुलामांच्या मोठ्या व्यापाऱ्यांतला शेवटला व्यापारी राबाह याच्या मृत्यूपर्यंत एकशेंवीस वर्षें घालवावीं लागलीं. जेथें अजूनहि गुलामगिरीची प्रथा चालू आहे अशा अरबी द्वीपकल्पांतील अगदीं अलीकडील राज्यासारख्या देशांचा मुख्य त्राता राष्ट्रवादच आहे.

रेनाननें लिहिलें,—"मनोविकास हा जीवनाचें एक उद्दिष्ट असतो; आणि मनोविकासासाठीं आद्य अट म्हणजे त्याला स्वतंत्रता असावी लागते." मनाला बाह्य स्वतंत्रतेची म्हणजे नियंत्रणांच्या अभावाची आवश्यकता असते; तसेंच त्याला आंतरिक स्वतंत्रतेची सुद्धां म्हणजे दुराग्रही मतांच्या अभावाची आवश्यकता असते. ज्या सर्व उदारमतवाद्यांनीं इतर कोणत्याहि विषयांपेक्षां मनाच्या स्वातंत्र्यासंबंधीं बहुतकरून अधिक लिहिलेलें आहे, त्यांच्या चित्तांत आधींच त्या दोहोंना अग्रस्थान मिळालेलें होतें. सांप्रदायिक दुराग्रही मतांपासून मनाची मुक्तता करणें, शोधबोधाच्या स्वातंत्र्यावर आणि सारासार विवेकबुद्धीच्या उपयोगावर निश्चितपणें भर देणें, या बौद्धिक सुधारणेच्या पायाभूत गोष्टी असून, त्या सुधारणेमुळेंच, मुख्यत: वैज्ञानिक प्रगतीच्या स्वरूपांत, गेल्या तीनशें वर्षांच्या अमदानींत मनुष्याच्या जीवनांत आमूलाग्र क्रांति घडून आलेली आहे. निसर्गाच्या शक्तींच्यावर प्रभुत्व मिळवून देण्याच्या कामीं मनुष्याला साहाय्य करण्यांत उदारमतवाद्यांच्या विचारप्रणालीचा जितका अधिक हिस्सा आहे, तितका कोणत्याहि अन्य स्वरूपाच्या विचारांचा नसेल. प्रथमत: शास्त्रीय शोध लागले, आणि नंतर त्यांची तांत्रिक संशोधनाच्या स्वरूपांत योजना झाली. अधिकारवादी विचारसरणीच्या सरणांवर मुडद्यांप्रमाणें मनें पडून राहिलीं असतीं तर शोध आणि संशोधनें यांना कधींहि ठावठिकाणा मिळू शकला नसता. विज्ञानाच्या प्रगतीचें बहुतेक सारें श्रेय ज्यांना देतां येईल, त्या पश्चिम युरोपांतील आणि उत्तर अमेरिकेंतील लोकांच्या मनांसमान चिनी व इराणी लोकांचीं मनें आहेत; अगदीं कांहीं शतकांच्या पूर्वींच त्यांच्या संस्कृतींचा दर्जा पाश्चिमात्य संस्कृतीच्या मानानें उच्च होता; ज्या वैचारिक स्वातंत्र्याच्या अंतर्गत आधुनिक विज्ञान विकसित

झालें, आणि उदारमतवादाच्या अधिकाराची जें गुरुकिल्ली आहे, त्याचें अस्तित्व रूढीवादी चीन किंवा इराण या दोहोंतहि नव्हतें. व्हाल्टेअरच्या मतें जे मनुष्याच्या अत्याचारी कृत्यांना मुख्यत: कारणीभूत होतात ते असमंजसपणाचे विचार दूर सारण्याच्या बाबतींत अजून जरी आपल्याला लांबचा पल्ला गांठायचा आहे, तरी देखील प्रगति करण्यांत आली हें मात्र नि:संशय आहे.

उदार लोकशाही राज्यांतील शिक्षणाचें आवश्यक विशेष लक्षण म्हणजे त्याचें उद्दिष्ट मनांवर सिद्धांताची पकड बसवायचें नसतें, तर व्यक्तीच्या तर्क-शक्तीचा विकास करण्याचें असतें. आधुनिक युगांत "नव" शिक्षणाच्या कल्पनेचें पद्धतशीर प्रतिपादन करण्यासाठीं महान् तत्त्वचिंतकांची एक परंपरा पुढें आली होती. मांटेन त्या परंपरेंतला पहिला असून या कामगिरीमुळें आणि त्याच्या नेमस्तपणामुळें उदारमतवादाच्या पूर्वगामी लोकांत त्याची गणना करावी लागेल; विसाव्या शतकांतला त्यांचा प्रमुख समर्थक ड्युए होऊन गेला आहे.

पुष्कळ जण अजून देखील "नव" शिक्षणाची एक विलक्षण आणि भयसूचक कल्पना सुचवितात. मध्ययुगीन युरोपांत व पूर्वरोमन साम्राज्यांत, मध्य पूर्वेतील आणि सुदूर पूर्वमधील सुधारणांत जशा पाठशाला होत्या, तशा साधनांच्या द्वारें व्यक्तीला गटाबरोबर संपूर्णतया एकरूप करणें आणि कुणालाहि अश्रद्धाळू भिन्न मार्गावलंबी अथवा विरोधक होण्यास प्रतिबंध करणें, याची कल्पना त्यांना अभिप्रेत आहे. कम्युनिस्ट, तद्वतच रूढीवादी व राष्ट्रवादी समाजरचना यांच्यामध्यें शिक्षणाचें उद्दिष्ट मनांना संवयीचे दास करण्याचें असतें, त्यांच्या बंधविमोचनाचें नसतें. अर्थातच मनावर सिद्धांताचें वर्चस्व लादणें, हें उच्च सांस्कृतिक पातळीवरून कांहीं विसंगत नसतें. चिनी मांत्रिक, ख्रिस्ती महंत आणि इस्लामी उलेमा यांची विद्वत्ता कधीं कधीं भयप्रद ठरली होती; परंतु विद्वत्ता म्हणजे सृजनक्षमता नव्हे. तत्कालीन उदारमतवादी लोकशाहीप्रधान राष्ट्रांत "नव" शिक्षण म्हणजेच व्यक्तिगत मनांना उपभोगायला मिळालेलें स्वातंत्र्य, हें साहित्य आणि कलांचा तद्वतच तत्त्वज्ञान आणि विज्ञान ह्यांच्या असामान्य उत्कर्षाचें उगमस्थान बनलेलें आहे.

अमेरिकेंत–आजच्या सर्वांत मोठ्या उदारमतवादी लोकशाहीप्रधान राष्ट्रांत–शिक्षणानें एक अनन्य साधारण विशेषता प्राप्त करून घेतलेली आहे; सर्व जनतेची सांस्कृतिक पातळी समानपणें वरच्या थराला नेण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न तेथें

करण्यांत आलेला असून, त्याच्या योगानें अन्य उदारमतवादी लोकशाहीप्रधान राष्ट्रांना उदाहरणार्थ कॅनडा, ब्रिटन, स्कॅन्डीनेव्हिया, स्वित्झर्लंड यांना आदर्श मिळालेला आहे आणि तीं त्याचा कित्ता गिरवूं देखील लागलीं आहेत. निकटच्या भूतकाळांत सर्व दर्जांच्या शिक्षणाचा आणि आज बहुतेक सर्व देशांमधून प्राथमिक शिक्षणापुढील सर्व दर्जांच्या शिक्षणाचा हेतु शेलक्या लोकांचा "वरिष्ठगट" निर्माण करण्याचा आहे. इतर गटांच्या वर वर्चस्व ठेवतां आल्याकारणानें हा 'वरिष्ठगट' स्वतंत्रतेच्या विकासाला अवश्यमेव विघ्नस्वरूप होत असतो. राष्ट्रवादी इजिप्त किंवा रूढीवादी पेरु यांच्याप्रमाणेंच कम्युनिस्ट रशियांत **'वरिष्ठगटा'**ची कल्पना शिक्षणावर वर्चस्व गाजवीत असते; भावी राज्यकर्त्यांना खास विद्यालयांतून शिक्षण मिळत असते. जेथें ही **'वरिष्ठगटा'**ची कल्पना असत नाहीं, तेथें राज्य करण्यासाठीं खास गट तयार करण्यांत येत नाहीं.

स्वतंत्रता म्हणजे समता नव्हे, परंतु ती समतेचें एक महत्त्वाचें मूलतत्त्व गृहीत धरून चालते; तें म्हणजे सर्व माणसें आपल्या पायावर उभीं राहूं शकतात आणि स्वनिर्णयांच्या आधारें कृती करूं शकतात, कारण त्यांना योग्य प्रमाणांत युक्तिवादाचें सामर्थ्य आणि सारासार विवेकशक्ति यांची देणगी मिळालेली असते, हें होय. उदारमतवाद्याला सर्वसाधारण प्रौढांतून स्त्रीपुरुष भेद, वंश, पंथ, सांपत्तिक किंवा अन्य दर्जा यांच्या कारणांसाठीं कुणीहि गौण नसतात,—या गृहीतांवरून कायद्याच्या समक्ष संपूर्ण समता असणें आणि कित्येकांना संपूर्ण हक्कांचा उपभोग मिळणें व कित्येकांना त्यांच्यापासून वंचित ठेवणें, असा जो भेदाभेद नागरिकांमध्यें निरनिराळया वर्गांच्या रूपांत करण्यांत येतो त्याचा लोप करणें, यांच्या विषयींचा उदारमतवाद्याचा आग्रह निष्पन्न होत आहे. शिक्षण, अनुभव आणि मनाचा उपयोग करण्याची इच्छा यांच्यांत भिन्नता असते, परंतु संभवतः मतभेद क्षुल्लक असतात, व त्यांच्याकडे दुर्लक्ष करतां येणें शक्य असतें. बहुतेक मनुष्य प्राण्यांना—ज्या सर्वांना इतरांच्यापेक्षां आपण श्रेष्ठ असल्याची भावना असते त्यांना—ही नैतिक समतेची कल्पना मनापासून त्याज्य वाटते, दुष्टपणाची देखील वाटत असेल, परंतु आपण जर मनुष्यप्राण्यांची मूलभूत समता नाकारतों म्हटलें तर मग आपल्याला अधिक चांगल्या लोकांचा शोध करून त्यांच्या हुकमतीखालीं स्वतःला राखणें हेंच केवळ शक्य होईल.

बहुतेक समतावाद्यांना नैतिक समतेविषयीं आस्था वाटत नाहीं. त्यांना

मुख्यत: समान दर्जासंबंधीं कळकळ वाटत असते, उदारमतवादी संस्थांची चुणूक दर्शविणारें जें कांहीं असेल, त्या सर्वांच्या विरुद्ध सामान्यत: ते—( मार्क्स-वादी आणि मार्क्समतानुसारी लेनिनपंथी समष्टिवादी ) भरभक्कम आक्षेप घेत असतात. तरी देखील भूतकालीन आणि वर्तमानकालीन उदारमतवादी लोक-समाजांनीं उपलब्ध करून दिलेला पुरावा निर्णायक आहे; उदारमतवादाचा लवलेश नसणाऱ्या समाजापेक्षां त्यांच्यांत अधिक श्रेष्ठ प्रतीची समता लाभूं शकली आहे. स्वतंत्रता नि:संशय विसदृशतेकडे नेत असते; परंतु गेल्या दहा पिढ्यांच्या अनुभवाची ग्वाही अशी आहे कीं व्यक्तिगत आणि सामुदायिक व्यवहारांत स्वतंत्रतेनें जितका मोठा भाग घेतला होता, तितक्याच मोठ्या प्रमाणांत भिन्नत्वांच्या प्रवृत्ति समान पातळीवर दिसत आहेत,

महत्वाकांक्षा, हितसंबंध, कार्य यांच्यांतील भिन्नता जसजशी अधिगुणित होते, तसतशी दर्जाची भिन्नता ऱ्हास पावूं लागते. सनातनी व जहाल, आस्तिक व नास्तिक, मालक व मजूर यांच्यांत स्वतंत्रतेमुळें भिन्नता निर्माण होण्याची शक्यता आहे, परंतु स्वतंत्र लोक समाजामध्यें एका गटापुढें दुसरा गट दर्जानें गौण असूं शकत नाहीं, दर्जानें समान असे ते सर्वच असतात. बऱ्याच काला-वधीपर्यंत युरोपांतले सर्वांत अत्यंत स्वतंत्र राष्ट्र स्वित्झर्लंड हें होतें, तें तसेंच अत्यंत समतावादी देखील होतें. हॉलंड किंवा फ्रान्स यांच्यांत रुमानिया किंवा चीन यांच्यापेक्षां, कॅनडा किंवा अमेरिका यांच्यांत मध्यपूर्वेतील कोणत्याहि राष्ट्रवादी अथवा परंपरावादी देशापेक्षां कमी असमानता आहे.

समष्टिवादी आर्थिक परिभाषेंत समतेचा विचार करतात, तसें करणें महत्त्वाचें आहे, परंतु त्याहिपेक्षां अधिक महत्वाची आणि प्राप्त करून घ्यायला अधिक बिकट अशी, मनुष्य जातीचे दोन अर्धे अर्धे भाग असणाऱ्या स्त्री-पुरुषांमधली समता होय. समकालीनांच्या वर महान् भीषण रक्तपाती क्रांत्यांचा—युरोपांत लक्षावधि लोकांचें रक्त सांडणाऱ्या फॅसिस्ट क्रांतीचा आणि रशिया व चीनमधील कोटी लोकांची कत्तल उडविणाऱ्या कम्युनिस्ट क्रांतीचा—मोठाच प्रभाव पडलेला आहे. त्यांच्यापेक्षां अधिक जहाल परंतु शांततापूर्ण क्रांत्या उदारमतवादी लोकशाहीवादी समाजांत घडून आलेल्या आहेत; त्यांतली एक अत्यंत मोठी क्रांति म्हणजे सर्व सुधारणावादी समाजांत स्त्रियांचा जो गौण दर्जा होता, त्याच्यापासून त्यांचा उद्धार करण्यांत आला, ही होय.

गौण दर्जा म्हणणें देखील अर्धवट सत्य ठरेल; मालमत्तेपेक्षां त्यांना अधिक मोल नव्हतें; त्यांना पुरुषांच्या जगांत कसलेहि हक्क नव्हते; त्यांना आपलें स्वतःचें जीवन किंवा संपत्ति नव्हती; त्यांची संतति पित्याची संतति मानण्यांत येई. व्यभिचार किंवा अन्य दोष हे पुरुषाचे असल्यास त्यांची क्षमा होई, स्त्रीचे असल्यास त्यांबद्दल कडक शिक्षा होई. दुहेरी निकष गृहीत धरलेला होता. आज देखील जगाच्या बहुतेक भागांत धरण्यांत येत असतो. आजच्या स्वयंमन्य प्रगतिवादी स्त्रियांना जरी उदारमतवादी लोकशाहीबद्दल तुच्छता आणि अप्रियता वाटत असली, तरी त्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं त्यांचा उद्धार समष्टिवादाच्या प्रभावाखालीं असलेल्या राष्ट्रांनीं (किंवा परंपरावादी अथवा राष्ट्रवादी समाजांनीं) केलेला नव्हता; उदारमतवादी लोकशाहीनें आणलेल्या स्वातंत्र्यामुळें जे समान हक्क मिळवून घेतां आले; ते ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच क्रांत्यांचे अनुगामी होते; जर इंग्लंडमध्यें मुद्रणस्वातंत्र्य नसतें तर मेरी वॉलस्टोन्सक्रफ्टचें 'व्हिंडीकेशन' (समर्थन) कधीहि प्रसिद्ध होऊं शकलें नसतें; स्त्रियांच्या समतेचे कैवारी, हॉलबर्ग आणि हॉल्बॅक यांची उदारमतवादी घटिका सोडून दिल्यास, कॉन्डार सेट आणि मिल्ल हेच होऊन गेले आहेत. उदारमतवादाच्या आघातांच्यामुळेंच स्त्रियांना न्यायविषयक समता मिळाली, गेल्या चाळीस वर्षांत स्त्रियांना मताधिकार प्राप्त झाला, मुस्लीम महिलांच्या मुखावरील बुरखा दूर करण्यांत आला, आणि सती, जनानखाने, लोखंडी पट्ट्यांनीं स्त्रीचीं पाउलें जखडण्याची चिनी चाल आणि तान्ह्या मुलींचे बळी यांचा शेवट होऊं शकला. आजपर्यंत स्त्रियांच्या गौणत्वाची निशाणी असलेल्या दुहेरी निकषांचा लोप करण्यांत आतां स्कॅन्डेनेव्हिया, स्वित्झर्लंन्ड, कॅनडा व अमेरिका यांच्यांतील उदारलोकशाही सत्ता आघाडीवर आहेत.

आर्थिक क्षेत्रांमध्यें ज्या प्रमाणांत स्वतंत्र संस्था कार्यक्षम होऊं शकल्या, त्या प्रमाणांत समानता निर्माण करण्याचा क्रम अस्तित्वांत आलेला आहे. कोणत्याहि अधिकारवादी देशांपेक्षां उत्तर अमेरिकेंत आणि युरोपांत उदारमतवादाची दृढ परंपरा असणाऱ्या लोकसत्तांच्या मध्यें कमी आर्थिक असमानता आहे. ग्रेट ब्रिटन आणि अमेरिकेंतील संयुक्त राज्यें यांच्यात जें कांहीं घडत आहे, त्यावरून असें दाखवून देतां येईल कीं उत्पन्नांच्या कमाल आणि किमान पातळ्यांच्या मधील अंतर कमी कमी होऊं लागायला दोन तरी पिढ्या लोटल्या असाव्यात. फ्रान्सच्या

तिसऱ्या व चौथ्या प्रजासत्ताक राज्यांच्या अमदानींत लोकांच्या विविध गटांमधील उत्पन्नाच्या अंतराचा टप्पा प्राचीन फ्रांसमधील राजवटीपेक्षां कमी आहे. सर्वच उदारमतवादी लोकशाही राष्ट्रांतून फिनलँड प्रमाणेंच ऑस्ट्रेलियांत देखील आर्थिक मनोऱ्यांची उंची अशा क्रमानें घटविणें चालू आहे कीं ज्याच्यामुळें खालच्या उत्पन्नाची पातळी वर चढविण्यांत येत असून वरच्या उत्पन्नांची पातळी खालीं ओढण्यांत येत आहे. उदारमतवादी लोकशाही नसलेल्या देशांच्या आर्थिक व्यवस्था त्यांच्या रचनेंत कितीहि विविधता असली तरी, अजूनहि थोड्यांना विशेष हक्क आणि पुष्कळांचें रक्तशोषण यांच्याशींच एकरूप बनलेल्या आहेत. समष्टिवादी, संघवादी, नवव्यापारवादी, मक्तेदारी भांडवलवादी अर्थव्यवस्थांना देखील हें सारखेंच लागू पडतें. स्कँडेव्हिनेयांतील, आणि इंग्रजी भाषा बोलणाऱ्या व फ्रेंच-भाषा बोलणाऱ्या राष्ट्रांमधील खालच्या दर्जाचा वर्ग फारच अल्प असून तो नष्ट होण्याच्या पंथावर आहे, (कांहीं बाबतींत तो केव्हांच नष्ट झालेला आहे); बऱ्याच भूमध्यप्रदेशांतील राष्ट्रांत आणि आशिया, पूर्व युरोप, व लॅटिन अमेरिका यांमधील राष्ट्रांतील लोकसंख्येंतला बहुजन समाज खालच्या दर्जाचा वर्ग असून तो वाढतच आहे. बहुजन समाजांच्या असंतोषाला वेशीवर टांगण्यांत आणि त्यांच्या समस्यांचें योग्य तें समाधान करून देण्यांत उदारमतवादी लोकशाही-मूलक राजकीय संस्था मोठी महत्त्वाची अनुकूल परिस्थिति बनलेल्या आहेत.

ज्या राष्ट्रांनीं कांहीं काळ स्वातंत्र्यमूलक संस्थांचा उपभोग घेतला आहे, त्या सर्व राष्ट्रांत अशा स्वातंत्र्यमूलक संस्था प्रचलित होण्यापूर्वी जी श्रेष्ठकनिष्ठ अधिकार क्रमाची रचना होती, ती आतां तितकी शिल्लक उरलेली नाहीं. जेथें उदारमतवादी मूल्यें आणि महत्वाकांक्षा प्रामुख्य पावलेल्या आहेत, (मग ज्याच्या द्वारें त्या व्यक्त होतात, त्या पक्षाचें अगर आंदोलनाचें नांव कोणतेंहि असो, ) तेथें इतरांपेक्षां अत्यंत कमी प्रमाणांत वर्गभिन्नता नजरेस पडत असतात. जेथें कुठें उजव्या किंवा डाव्या गटाची "नवी व्यवस्था" असते, किंवा परंपरावादी अधिकारवाद जीवनावर नवा भाडोत्रीपणा लादत असतो, तेथें वर्गभिन्नता वाढू लागते. सोव्हियत युनियन किंवा चीन येथील कामकरी आणि शेतकरी वर्गांना कारभारी, अंमलदार आणि निरीक्षक मंडळापासून अलग राखण्यासाठीं जेवढें अंतर ठेवण्यांत आलें तें त्याच गटांना स्वीडन किंवा न्युझीलँड, अमेरिकेचीं संयुक्त राज्यें किंवा ग्रेट ब्रिटन यांच्यामध्यें ठेवण्यांत आलेल्या अंतरांपेक्षां विचारांत

घेण्याजोगें अत्यंत महत्तर आहे. इजिप्त किंवा सयाम यांच्यामधील श्रीमंत व गरीब यांच्यांत असणारें अंतर कॅनडा किंवा स्वित्झर्लंड यांच्यामधील श्रीमंतगरिबांत सांपडूं शकणार नाहीं.

राष्ट्रांत असलेली एकवाक्यता म्हणजे स्वतंत्रता नव्हे. बंधुवत् प्रेम आणि एकता यांच्या दृष्टीनें जे विचार करीत असतात त्यांचा पक्षकलह आणि पक्षांधता पाहून भीतीनें अंत:करणपूर्वक थरकांप होत असतो. अनुभवानें असें दिसून येतें कीं संपूर्ण एक वाक्यतेची गुरुकिल्ली स्वतंत्रता असते हें ज्या उदारमत-वादाच्या पुष्कळ पूर्वगाम्यांना वाटत होतें, त्यांना त्या यांत्रिक कल्पनेबद्दल आपणांस अवश्यमेव दोष द्यावाच लागेल. तथापि निसर्गाच्या नियमाच्या अनुप-स्थितींत देखील तिच्या स्पष्ट अभिव्यक्तीच्या इच्छेची शक्यता असते आणि स्वतंत्र समाजांमध्यें लोक अंतर्गत एकवाक्यतेसाठीं झटूं देखील शकतात. अनेकदां त्यांनीं तसें यशस्वीपणानें करून दाखविलें आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें नऊ पिढ्यांपासून सर्व अंतर्गत बिकट प्रसंग बलाचा आश्रय न घेतां समाधानानें मिटत आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या प्रजासत्ताकांनीं ज्या पेंच प्रसंगांवर मात केली होती, त्यांच्या पायीं आधींच्या शतकांत युद्धें व क्रांत्या घडल्या असत्या. अमेरिकन लोकांनीं राज्यसंघांत स्वतंत्र राज्यांच्या जोडीला गुलाम राज्यांचा समावेश न करतां जर केवळ स्वतंत्र राज्यांचाच संघ बनविला असता तर त्यांच्यांत यादवी युद्ध होतें ना.

बोल्शेव्हिक क्रांति झाल्यावर अजून ३९ वर्षांनीं देखील जेथें तुरुंग आणि स्थानबद्धांच्या छावण्या आहेत, जेथें राज्यकर्त्यांच्या बरोबर न पटणाऱ्यांना उच्चारस्वातंत्र्य आणि सभास्वातंत्र्य नाकारण्यांत येतें, ती सोव्हियत युनियन-मधील एकवाक्यता केवळ बनावट आहे या व्यतिरिक्त अन्य कोण काय बोलूं शकणार ? तद्वतच ज्या चीनमध्यें कम्युनिझमची सरशी होण्यासाठीं, बऱ्याच निरीक्षकांच्या मतें, दोन कोटी प्राणांचें बलिदान झालें, तेथील एकवाक्यतेबद्दल काय बोलावें ? कम्युनिस्ट राज्यांच्या प्रमाणेंच फॅसिस्ट राजवटींच्या मध्यें मुसक्या, तुरुंगाधिकारी, आणि फांशीं देणारे मांग यांना फुरसद नसल्याकारणानें त्यांच्याबद्दलहि बोलणें व्यर्थच नाहीं कां ? एखाद्या स्वतंत्र देशांतील मतभेदांचें आणि बिकट प्रसंगाचें प्रदर्शन बघून ज्यांना वीट आला असेल, त्यांनीं गुलाम राष्ट्रांमधून जेव्हां बाह्य दडपणांच्यामुळें किंवा अंतर्गत संघर्षांच्या योगें एकतन्त्री राजवटीचें दडपण झुगारून दिलें जातें तेव्हां झालेला रक्तपाती क्रांत्यांचा विचार

 १०२७५

करून पाहावा. किंवा त्यांना एकतंत्री सत्तेच्या विजयासोबत आलेली स्मशान शांतता,—कीं जीमुळें कुणीहि अतःपर स्वेच्छेनें विचार अथवा कृति करण्यायोग्य राहूंच शकत नाहीं.—तीच संमत वाटत आहे ? "वासीत सुव्यवस्था राज्य करते," असें एका रशियन राज्यकर्त्यानें म्हटल्याचें ऐकिवांत आहे; तीच सुव्यवस्था १७ जून १९५३ नंतर पूर्व बर्लिन मध्यें आणि २८ जून १९५६ नंतर पोझनान मध्यें राज्य करूं लागली आहे म्हणायची.

राष्ट्रांमधील शांततेचा पर्यायी शब्द म्हणजे स्वतंत्रता नव्हे. युद्ध हा मनुष्यजातीला शाप मिळालेला आहे, आणि तो हजारों वर्षें चालत आलेला आहे. शांततेच्या नांवानें, अन्य राष्ट्राच्या धोरणासंबंधीं रास्त मतभेद नेहमीं व्यक्त करण्यास राष्ट्रांना प्रतिबंध घालण्याच्या दंडेलीलाच शांततेबरोबर एकरूप मानून, अनेकांनीं लोकशाहीच्या स्वातंत्र्याला बदनाम करीत हिटलर आणि स्टालिन यांचें स्वागत रक्षणकर्ते म्हणून केलें होतें. तथापि पूर्वेतिहास अत्यंत स्पष्ट आहे; पहिलें जागतिक युद्ध आस्ट्रिया, रशिया आणि जर्मनी यांच्या अधिकारवादी सत्ताधीशांच्या निर्णयांमुळें पेटलें; दुसरें जागतिक युद्ध सुरू होण्यास जर्मनी आणि रशिया यांच्या हुकूमशहांमधील तो कुप्रसिद्ध करार कारण झाला.

आज ज्या देशांत मूठभर व्यक्तींच्या हातीं लक्षावधि अथवा कोट्यावधि प्रजाजनांवर संपूर्ण अधिकार गाजविण्याची सत्ता आहे, त्यांच्याकडून युद्धाच्या धमक्या देण्यांत येत आहेत. स्वतंत्रता जरी शांततेसमान नसली, तरीहि जेथें स्वतंत्रता असते तेथें शांततेप्रीत्यर्थ कार्य करणें शक्य असतें; जेव्हां ग्रेट ब्रिटन बोअर किंवा आयरिश लोकांविरुद्ध लढत होतें, तेव्हां ब्रिटिश नागरिकांना आपला आवाज ऐकविण्याची शक्यता लाभूं शकली; त्यांचा आवाज इतक्या यशस्वी पद्धतीनें कानीं गेला कीं बोअर आणि आयरिश या उभयतांना प्रथम स्वराज्य व नंतर स्वातंत्र्य मिळूं शकलें. काहीं अमेरिकनांना जेव्हां "व्यक्त नियती" ची प्रेरणा चिथावणी देऊं लागली तेव्हां इतरांनीं त्यांना कह्यांत ठेवून घेतलें. उदारमनस्क अमेरिकनांच्या प्रयत्नांमुळेंच, स्वतःच्या सामर्थ्याच्या आधारावर नव्हे, सर्वच करिबियन व मध्य अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्यांना आपलें स्वातंत्र्य राखतां आलें. परंतु जेव्हां सोव्हियत राज्यकर्त्यांनीं फिनलंड विरुद्ध युद्ध पुकारण्याचा आणि पोलंड, बाल्टिक राष्ट्रें, रूमानिया यांच्यावर चढाई करण्याचा निर्णय घेतला, तेव्हां तें गुन्हेगारीचें कृत्य थांबविण्याबाबत कुणी एक ब्र देखील काढूं

चकला नाहीं.

दक्षिण कोरियांतील ज्या लोकांना उत्तर कोरियांतील लोकांविरुद्ध युद्ध हवें होतें त्यांना आवरून धरणें दक्षिण कोरियांतील लोकांना स्वतंत्रतेमुळें शक्य झालें; परंतु उत्तर कोरियामधील राज्यकर्त्यांना १९५० मध्यें युद्ध सुरू करण्यास प्रतिबंध करायला तेथें स्वतंत्रता नव्हती, त्यामुळें भयंकर क्लेश व कष्ट त्यांच्या लक्षावधि देशबांधवांना भोगावे लागले. जेव्हां लढायला कुणीहि उरणार नाहीं, आणि सर्व कांहीं हुकूमशाहीच्या अधिसत्तेखालीं येईल तेव्हांच केवळ हुकूमशाही युद्ध पुकारणें थांबवील. संपूर्ण शांततावाद्यांना हेंच हवें आहे काय? आशिया व युरोपमधील ज्या तटस्थवाद्यांना वाशिंग्टन किंवा पॅरिस यांच्या धोरणांत शांततेला धमकी दिसून येते, ते बहुधा निष्कपटी असावेत. परंतु त्यांनीं वस्तुस्थिति नीट पडताळून घ्यावी; ज्या राष्ट्रांमध्यें राजकीय धोरणांत लोकांना भाग घेतां येतो, त्या राष्ट्रांकडून धमकी येत नाहीं; आणि येणेंहि शक्य नाहीं; ज्या राष्ट्रांत अगदीं थोड्या लोकांच्या हातांत अत्यंत जास्त सत्ता असते, त्यांच्या कडूनच ही धमकी येत असते.

स्वतंत्रता म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य नव्हे. तथापि गेल्या दोनशें वर्षांतील घटनांच्याकडे पाहातां असें दिसून येतें कीं राष्ट्रीय स्वातंत्र्य असणाऱ्या राज्यांची स्थापना करण्याचा राष्ट्रीय आंदोलनांचा प्राथमिक उद्देश जेथें स्वतंत्रतेमुळें राष्ट्रीय जाणीवेची घडण आणि अभिव्यक्ति यांच्यासाठीं पुरेसा वाव मिळाला, तेथेंच सुफलित झाला. जे माथेफिरू राष्ट्रवादी उदारमतवादी लोकशाहीचा व तिनें समर्थन केलेल्या मूल्यांचा, इतर सर्व गोष्टींच्यापेक्षां जास्त तिरस्कार करतात, आणि जोंपर्यंत प्रबल सत्ताधारी अधिकारवादी होते, तोंपर्यंत एकाहि गुलाम राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवतां आलें नाहीं, या वस्तुस्थितीकडे जे दुर्लक्ष करतात, त्यांना हें चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. कांहीं थोडीं उदाहरणें दिलीं तरी पुर होईल; पश्चिम युरोपांत उदारमतवाद हीच प्रमुख शक्ति होती, त्यामुळें तेथें स्वतंत्र लहान राष्ट्रें असण्याचें तत्व विजयी झालें, मध्य आणि पूर्व युरोपांत जेथें जेथें अधिकारवादी सत्तेनें उदारमतवादी लोकशाहीवर विजय मिळविला तेथें ते थेंतें तत्त्व अपयशी ठरलें; युरोपच्या उदारमतवादी अवस्थाकालांत १८२१ ते १९२१ च्या कालखंडांत वीस एक राष्ट्रीय राज्यांनीं संघटित होऊन आपलें स्वातंत्र्य मिळविलें होतें. सांप्रदायिकवाद आणि कम्युनिझम यांची वाढ होत

असतांना १९२१ पासून स्वातंत्र्याची हानि होऊं लागलेली आहे.

उत्तर अमेरिकेंतल्या तेरा वसाहतींमधील नागरिक आपल्या स्वातंत्र्यासाठीं चळवळी उभारूं शकले, परंतु अधिकारशाही स्पेनच्या राज्यसत्तेखालीं असलेल्या व्हाइसरॉयांच्या व कॅप्टनांच्या ताब्यांत असलेल्या सात संस्थानांत तशा प्रकारचें कांहींच होऊं शकलें नाही; स्पेनवर १८०८ मध्यें आलेल्या परचक्रामुळें आणि परिणामत: स्पेनचें सरकार भग्न झाल्यामुळें त्या संस्थानांवर स्वातंत्र्य बळजबरीनें लादण्यात आलें. अधिकारशाहीप्रधान ऑटोमन साम्राज्यामध्यें अरब हे शांत प्रजाजन होते . जेव्हां युरोपांतल्या उदारमतवादी लोकशाहीप्रधान प्रजासत्ताकांनीं सुलतान-खलिफा याची जागा घेतली, तेव्हां राष्ट्रवादी प्रगट झाले, आणि आतांपर्यंत अरबी-भाषा-भाषी दहा राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळवितां येण्याइतकें अग्रेसर झालें. ज्याच्या प्रभावानें १८४० ते १९०९ च्या कालखंडांत अगणित कायदे करण्यांत आल्याचें दिसून आलेलें आहे तो उदारमतवाद आणि त्याचा वारसा मिळविलेला श्रमवाद यांच्याच प्रभावानें मुख्यत: ब्रिटिश साम्राज्याचें रूपांतर नऊ सार्वभौम राष्ट्रांच्या समाईक राष्ट्रकुलांत झालेलें असून त्याला आणखी कांहीं सभासद लवकरच येऊन मिळणार आहेत;. अमेरिकेंत ‘ रिपब्लिकन ’ आणि ‘ डेमोक्रेट ’ या दोन्ही पक्षांचा उदारमतवाद कोणत्याहि प्रकारची हिंसा घडल्यावांचून फिलिपाइन्सचें स्वातंत्र्य आणि प्युर्टोरिओचें स्वराज्य देण्यांत मार्गदर्शक बनला. गुलाम राष्ट्रांचें विमोचन करणारा राष्ट्रवाद ( आणि कामगारांचा उद्धार करणारा समाजवाद ) उदारमतवादी साधनांच्या द्वारेच विकसित झालेला होता. जेथें जीवन अधिकारवादी चाकोरीत तसेंच राहिलें आहे, तेथें राष्ट्रीय अथवा सामाजिक उद्धाराची आशा व्यर्थ आहे.

मानवी प्रयत्नाच्या सर्व क्षेत्रांत झपाट्याचा विस्तार झाल्याकारणानें उदार-मतवादानें साम्राज्यवादाची झालरच हिरावून घेतली होती, त्याच्या पाठोपाठ उत्तर अटलांटिक राष्ट्रांत उदारमतवादी क्रांत्या झाल्या. त्यानें वसाहतवादी पिळवणूकीच्या ऐवजीं विश्वस्तपणाची कल्पना स्थानापन्न केली. आणि अशा रीतीनें आशिया व आफ्रिका यांच्यामधील निदान विसापेक्षां अधिक राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळवून देण्यास अग्रेसर झालेल्या घटनांत भाग घेतला; लवकरच इतर राष्ट्रें स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहेत. ग्रेट ब्रिटन, अमेरिकेचा संयुक्त

राज्यसंघ, हॉलंड, फ्रान्स यांच्यामध्यें जर साम्राज्यवाद आणि वसाहतवाद यांना लगामीं- धरण्याइतका उदारमतवाद पुरेसा मजबूत झाला नसता, किंवा कोरियांत जपान्यांनीं, मध्य आशियांत व काकेशसमध्यें रशियनांनीं आणि चिन्यांनीं आपल्या लगतच्या प्रदेशांवर केलेल्या भीषण अत्याचारांचा कित्ता जर ग्रेट ब्रिटन, अमेरिकेचा संयुक्त राज्यसंघ, हॉलंड आणि फ्रान्स यांनीं गिरवला असता तर, हिंदुस्थानांत गांधी किंवा नेहरु, फिलिपाइन्समध्यें क्युझान किंवा ओस्मेना, जावामध्यें सुकार्नो किंवा टयुनिसियामध्यें बोर्घिबा यांचा उदय होऊं शकला नसता.

वसाहतवादाच्या विरुद्ध खूपच ओरड करण्यांत येत आहे; आणि समाधानाची गोष्ट ही कीं वसाहतींच्या जागा स्वतंत्र राष्ट्रांनीं घेतल्याचें उदारमतवाद्यांना 'याची देहीं याची डोळां' बघायला मिळत आहे. तथापि, वसाहतवादाच्या विरुद्ध सार्वत्रिक उठाव झालेला आहे, असें धरून चालणें चुकीचें होईल. जेथें उदार-मतवादी लोकशाही राष्ट्रांचा प्रभाव पडलेला आहे, त्या प्रदेशांत फक्त अंशत: उठाव होत आहे. ज्या मुलखांतून अधिकारवादाच्या हातीं कर्तुमकर्तुम् सत्ता आहे तेथें ( तिबेट किंवा पोलंड यांच्यांतील नुकत्याच झालेल्या उठावाप्रमाणें लहान-सहान थोड्या चकमकी अपवादात्मक मानल्यास ) मुळींच उठाव झालेले नाहींत. डचांच्या अंमलाखालीं १९४० मध्यें जितके जावानी, सुदानी, व मलायी लोक होते, तितकेच कोरियन, तिवानी, आणि मांचुरियन लोक जपानच्या अंमलाखालीं होते. इंडोनेशियांत स्वातंत्र्याची चळवळ जोरानें चालत होती, कोरिया, तैवान आणि मांचुरिया येथें तिचा मागमूसदेखील नव्हता. फ्रान्स व ब्रिटन यांच्या सागरांपलीकडील मुलखांत जितके लोक आज राहात आहेत, तितक्याच राष्ट्रीय अल्पसंख्यांक सभासदांची गणना सोव्हियत युनियन-मध्यें आहे, अल्जेरिया व सायप्रस येथील लोक बंड करूं शकतात, परंतु युक्रेनी, जार्जियन आणि उझबेक लोक बंड करूं शकत नाहीत.

संख्याबलाच्या आणि सांस्कृतिक दृष्टीनें कॅथालिक आयरिश लोकांचे ब्रिटिशां-बरोबर जे संबंध होते, तेच च्युआंग आणि मुस्लीम विधुर यांचे चिनी लोकांच्या बरोबर आहेत; आयरिश लोकांनी बंड केलें होतें, च्युआंग आणि विधुर स्तब्ध, शांत बसलेले आहेत. डच, फ्रेंच व ब्रिटिश यांच्या सागरापलीकडील मुलखांतून दडपशाही झाली होती; हॉलंड, फ्रान्स व ग्रेट ब्रिटनमधील स्वातंत्र्यमूलक

संस्थांच्यामुळें तेथें संपूर्ण मुस्कटदाबीची दंडेली होऊं शकली नाही, इंडोनेशियांत पुरेसें उच्चारस्वातंत्र्य होतें, आणि अल्जेरिया व आयर्लंडमधील लोकांना राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करायला, आणि चळवळ करण्यासाठी कृति सिद्ध व्हायला पुरेसें स्वातंत्र्य होतें.

सोव्हियत युनियन आणि चीन यांच्या मधील राष्ट्रीय अल्पसंख्यांकांमध्यें स्वातंत्र्यासाठीं चळवळ होत नाहीं. जपान्यांच्या पारतंत्र्यामधील राष्ट्रांतून सोव्हियत, चिनी व १९४५ पूर्व जपानी सरकारांच्या अत्याचारांमुळें कोणतीच चळवळ होऊं शकली नव्हती. ( जेव्हां पहिल्या जागतिक युद्धाच्या शेवटीं संधि मिळाली तेव्हां युक्रेनी, जार्जियन, उझबेकी, मंगोली, तिबेटी व विचुर लोकांनी आपलें स्वातंत्र्य संपादन केलें आणि रशियनांनीं व चिनी लोकांनी आपली सत्ता पुन्हां प्रस्थापित करीपर्यंत तें टिकविलें. दुसऱ्या विश्वयुद्धाच्या शेवटीं जेव्हां प्रसंग आला तेव्हां कोरियन, तिवानी आणि मांचुरियन लोकांनीं जपानी सत्ता धुडकावून लावली. ) पूर्वीच्या अंकित वसाहतीच्या प्रदेशांमधील राष्ट्रवादी उदारमतवादी लोकशाहीप्रधान देशांविपयीच्या आपल्या तिरस्काराच्या भरांत इतके प्रक्षुब्ध होत असले तरी त्यांनीं वाढत्या कम्युनिस्ट वसाहतवादाकडे दुर्लक्ष करतां कामा नये— तो नजीकच्या भविष्यकाळांत त्यांना गिळंकृत करण्यास कमी करणार नाही. प्रत्येक राष्ट्राला स्वतःच्या स्वातंत्र्याचा आणि मनुष्यजातीच्या विकासाला स्वतःचा वांटा देण्याचा हक्क असतो; चमत्कार असा कीं या हक्काची हमी राष्ट्रवाद देत नाहीं तर उदारमतवाद देत असतो.

स्वतंत्रता म्हणजे फार मोठ्या गटांच्या अंतर्गत असणारी स्वराज्यसत्ता नव्हे. परंतु उदारमतवादी लोकशाहीप्रधान राज्यांत अनेक वर्ग, धर्मपंथ, हितसंबंधीं गट, स्थानिक जमाती यांना आपल्या स्वतःच्या जीवनाचें मार्गदर्शन, आणि स्वतःच्या महत्वाकांक्षांच्या प्रगतीसाठीं कार्य करणें शक्य होऊं शकलें आहे. पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिका यांच्यामधील स्वतंत्र राष्ट्रांत मध्यमवर्ग आणि कामगार, प्रॉटेस्टंट, कॅथालिक, यहुदी, आणि स्वतंत्र प्रज्ञेचे पाखण्डी, मालक, शेतकरी, धंदेवाईक लोक, कारखान्यांतले कामगार व कचेऱ्यांतले नोकरचाकर, खेडीं आणि लहानमोठीं शहरें यांना स्वतःच्या मनाप्रमाणें कार्य करण्याचा, स्वतःचे हितसंबंध आणि स्वतःच्या महत्त्वाकांक्षा यांच्या संरक्षणाची खबरदारी घेण्याची तरतूद करण्याचा हक्क आहे. सोव्हियत युनियनमधील एखाद्या राज्यांत येमेन-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........

मध्यें किंवा डामिनिक प्रजासत्ताकांत जेव्हां अशा गटांना कसल्याहि संघटनात्मक अस्तित्वाची मोकळीक देण्यांत येते तेव्हां त्यांचें स्वरूप बेजबाबदार केंद्रीय सत्तेनें दिलेल्या आज्ञांची अंमलबजावणी करण्यासाठीं असलेल्या राज्यकारभाराच्या शाखा येवढ्यापुरतेंच केवळ असतें. अर्थातच जेव्हां स्वराज्यसत्ता नसते, तेव्हां जबाबदारीपण असत नाही,—हें कांहींसें बऱ्याच लोकांना किंबहुना बहुतेक लोकांना पटण्याजोगें आहे. आणि जेथें स्वराज्यसत्ता नसते, तेथें जीवनाचा सुद्धां कोंडमारा होत असतो, त्यांत जीं कांहीं सर्व महत्कृत्यें होतात, त्यांची संपादणूक केवळ राजकर्त्यांनींच केलेली असते.

स्वराज्यासाठी किंवा राजकीय स्वातंत्र्यासाठीं होणारीं सर्व आंदोलनें दडपून टाकण्याइतक्या बलाढ्य अधिकारवादी केंद्रीय सत्तेची स्थापना करणे, सर्वशक्तिमान सत्ताधारी राष्ट्रांच्यामध्यें अखिल लोकांचा समावेश करून घेऊन त्यांच्यावर एकरूपता लादणें म्हणजेच 'पॅक्स रोमाना' ( **रोममेकं शरणं व्रजेत्** ) किंवा 'पॅक्स सिनिका' (**चीनमेकं शरणं व्रजेत्**) होय. उदारमतवादी लोकशाहीच्या सिद्धांताच्या पायावर उभारलेल्या संघटनेच्या अंतर्गत स्वतंत्र राष्ट्रांचें शांततापूर्ण सहजीवन म्हणजे "पॅक्स ह्युमाना" ( **मानव्यं शरणं व्रजेत्** ) होय. राष्ट्रां-राष्ट्रांमध्यें मानव्याचे (पॅक्स ह्युमाना) संबंध प्रस्थापित करण्यासाठीं उदारमतवादी लोकशाहीप्रधान देशांनींच सर्व प्रकारें पुढाकार घेतलेला आहे, याचा ज्यांना कुणाला विसर पडला असेल, त्यांना त्याचें येथें स्मरण करून देणें उचित होईल. राष्ट्रसंघाची स्थापना व्हावयास इतर कुणांच्याहिपेक्षां अधिक जबाबदार एक अमेरिकन उदारमतवादी महापुरुष होता; संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेला दुसऱ्या एका उदारमतवादी अमेरिकन महापुरुषाची चिकाटी, दूरदृष्टि आणि हिंमत कारणीभूत झाली.

उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रें जोंपर्यंत अधिकारशाहीप्रधान राष्ट्रांना दाबांत ठेवूं शकलीं तोंपर्यंत राष्ट्रसंघ कार्यप्रवण राहूं शकला पण जेव्हां फॅसिस्ट सत्तांच्या माथेफिरू राष्ट्रवादानें कम्युनिझमबरोबर हातमिळवणी केली, तेव्हां राष्ट्रसंघ कोसळून पडला. ज्या प्रमाणांत उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रें बलाढ्य आहेत, त्या प्रमाणांत संयुक्त राष्ट्रसंघ कार्यान्वित होत आहे. युद्धें आणि साम्राज्यवाद यांच्या जागीं ( पॅक्स ह्युमाना ) मानव्याचें प्रतिष्ठान व्हावयासाठीं अजून खूप दूरचा पल्ला गांठायचा आहे; आज त्याला प्रतिरोध

करणाऱ्या प्रमुखशक्तीचें प्रतिनिधित्व अधिकारशाहीप्रधान राष्ट्रांना प्रोत्साहन देणारी हिंसेची प्रवृत्ति करीत असते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या यशाची मदार आद्यत: आणि अग्रत: सकल खंडांमधून एकसत्ताक राज्यें उलथून पाडून त्यांच्या जागीं उदारमतवादी लोकसत्ताक राज्यें स्थापन करण्याबाबत उदारमतवाद्यांच्या कर्तृत्वांवर अवलंबून आहे.

स्वतंत्रता म्हणजे समृद्धि नव्हे. परंतु तथापि व्यापक स्वतंत्रता असलेलीं ग्रीक नगरराज्यें अत्यंत समृद्ध देखील होतीं, तद्वतच गुलाम राष्ट्रांमधील अनियंत्रित जुलमी सत्ता—मग ती पहिले दोन रोमन अॅन्टनी, चिनी सुंग, तुर्क तिसरा सलीम, रशियन दुसरा अॅलेक्झांडर या कुणाचीहि होती तरी,—विस्कळित आणि शिथिल होऊं लागतांच बहुधा आर्थिक संपन्नपणाची वृद्धि झाली; फ्रेंच आणि रशियन क्रांत्याच्या कालांत 'डिरेक्टरी' (फ्रेंच क्रांतीचे संचालक) आणि 'बोल्शेविक' (रशियन क्रांतिकारक) या दोघांनाहि असें आढळून आलें होतें कीं आपल्या देशांना आत्यंतिक दारिद्र्याच्या पकडींतून सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे कांहीं काळ नियंत्रणें शिथिल करणें आणि आपल्या निष्ठुर धोरणांत नरमपणा स्वीकारणें होय; गेल्या दहा शतकांत पश्चिमेंतील समृद्धीच्या परमावधीचें केंद्र भूमध्यसागर प्रदेशांतील दर्यावर्दी प्रजासत्ताकांकडून टस्कन आणि लोम्बार्ड नगरांच्याकडे व मग फ्लेमिश नगरांच्याकडे, व नंतर हॉलंडकडून ग्रेट ब्रिटनकडे व उत्तर अमेरिकेकडे गेलें, जणू काय समृद्धि स्वतंत्रतेच्या मार्गावरून पाठोपाठच जात होती; हें सगळेंच निव्वळ कांहीं योगायोगानें घडलेलें नाहीं.

तत्कालीन जगांतलें अत्यंत अधिक स्वतंत्र राष्ट्र असलेल्या ग्रेट ब्रिटनमध्यें मुख्यत: विज्ञानशास्त्रांतील संशोधनें, तंत्रशास्त्रविषयक सुधारणा आणि उत्पादनाच्या नव्या पद्धतींचा परिचय यांना स्थान मिळालें, आणि लवकरच जुलमी सत्तेच्या पकडींतून सुटलेला फ्रान्स आणि तदनंतर उत्तर अमेरिकेंत राष्ट्र हीं त्याचा मागोवा घेऊं लागली, हा तर खात्रीनेंच एखादा योगायोग नव्हे. जर्मनीनें आपल्या १८७० ते १९३३ च्या अल्प कालखंडामधील अंतर्गत सापेक्ष स्वतंत्रतेच्या दशेंत बरेच शोध लावले. रशियासंबंधीं म्हणायचें म्हणजे त्यानें झारच्या किंवा हुकूमशहांच्या अमदानींत स्वतंत्र राष्ट्रांच्या सृजनात्मक कल्पकतेनें जे शोध लावले त्यांची नक्कल करण्यापलीकडे आणखी अधिक तें काय केलें ?

सार्वजनिक बांधकाम आणि आर्थिक विस्तार यांच्या क्षेत्रांत झालेल्या महत्कृत्यांचें साहचर्य प्राचीन व अर्वाचीन जुलमी राजकर्त्यांच्या बरोबर जोडण्यांत येतें, परंतु आपण थोड्याशा वर्षांचा विचार करण्याऐवजीं जर एक किंवा दोन पिढ्या विचारांत घेतल्या तर आपल्याला गुलाम राज्यांमधील परिस्थितिपेक्षां स्वतंत्र राष्ट्रांतली आर्थिक परिस्थिति अतिशय मोठ्या प्रमाणांत सुधारलेली आढळून येते. समृद्धीची आवश्यकता स्वतंत्रतेच्या प्राप्तीसाठीं असते, असा अनेकांचा विश्वास आहे; खोटा आहे तो. स्वतंत्रतेला ज्या आकांक्षेची आवश्यकता असते, तिचा समृद्धीशीं सुतराम् संबंध नसतो; स्वतंत्रतेच्या मागोमाग समृद्धि येत राहील.

स्वतंत्रता म्हणजे सुरक्षितता नव्हे. अगदीं सीझरपासून माओ आणि त्रुजिल्लोपर्यंत सर्वांच्या युक्तिवादांचा कळस "आम्हीं तुमच्या सुरक्षिततेची हमी देतों" असाच चालत आलेला आहे. युद्धोत्तर काळांतील सापेक्ष असुरक्षितपणाच्या भीतीनें घाबरून गेलेल्या ज्या चाळीस लक्ष इटालियनांनीं १९२४ मध्यें मुसोलिनीला मतें दिलीं, त्यांना हुकूमशाही सुरक्षिततेच्या व्यापाची कल्पना करायला जेव्हां अवसर मिळाला तेव्हां त्यांच्या हुकूमशहानें त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना नको असणाऱ्या युद्धांची आपत्ति लादलेली होती, तेव्हां त्यांच्या देशाला रणक्षेत्रांचें स्वरुप आलेलें होतें, आणि सिसिलीपासून आल्प्सपर्यंतच्या सर्व निसर्गसुंदर प्रदेशांत भग्न खिंडारें आणि प्रेतांचे खच पडलेले होते व भर प्रजासत्ताकाच्या साक्षेप असुरक्षितपणा पासून बचावण्यासाठीं १९३२ आणि १९३३ मध्यें हिटलरला ज्या जर्मनांनी मतें दिलीं, त्यांना ( जे जिवंत राहिले त्यांना ) हुकूमशाही सुरक्षिततेची व्याप्ति दोषास्पद वाटूं शकली, तेव्हां स्टॅलिनग्राड आणि पिरनीझ यांच्या पर्यंत लक्षावधि लोक मरत होते आणि त्यांच्या शहरांच्या वर बॉम्बचा वर्षाव होत होता.

अमेरिकेंत जेव्हां एक कोटि बेकारांनीं कामधाम देण्याच्या कट्ट्यांच्यावर (एक्स्चेंजेस) एकच गर्दी केली तेव्हां कांहीं सद्‌भावशील आणि संभ्रमशील अमेरिकन बुद्धिवादी लोकांनीं सोव्हियत युनियनकडे आपली दृष्टि वळवली होती; ती विकट परिस्थिति होती, परंतु खरीखुरी अधिक विकट असुरक्षितता तेव्हां सोव्हियत युनियनपेक्षां अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतून होती काय ? अमेरिकेंत निदान बेकारांना मदत तरी देण्यांत आली होती परंतु त्याच वर्षी सोव्हियत

यूनियनमध्यें पन्नास लक्ष शेतकऱ्यांना त्यांच्या घरादारांपासून जबरीनें पशुवत् पारखें करण्यांत येऊन उत्तरेकडील बिगारी कैदखान्यांत मरायला पाठविण्यांत आले, आणि सर्व वर्गाचे सहस्रावधि लोक आपला कांहींहि मागोवा न ठेवतां गडप झाले याचें कारण तेथील अल्पलोकसत्तावाद्यांना त्यांची भीति वाटत होती, हें नव्हतें काय ? सर्कशीमधल्या एखाद्या जनावराला चांगलें काम केल्याबद्दल जसें बक्षिस मिळतें आणि तें करण्यास तें चुकलें म्हणजे जशी त्याला शिक्षा मिळते आणि धन्याला त्याची पुढें उपयुक्तता वाटली नाहीं म्हणजे जसा त्याचा नाश करण्यांत येतो, त्याच्यापेक्षां दुसरी कोणती सुरक्षितता सोव्हियत युनियनमध्यें आहे ? लाल चीनमध्यें देखील अल्पलोकसत्ताक राज्यकर्त्यांच्या बरोबर मतभेद असण्याव्यतिरिक्त अन्य कोणतीहि गुन्हेगारी न केलेल्या ८००००० लोकांवर सहा महिन्याच्या अवधींत खटले भरून त्यांना तुरुंगांत डांबल्याचें अधिकृत अहवाल जेथें सांगतो, तेथें कसली सुरक्षितता असूं शकेल ?

दुर्भाग्य असें कीं सुरक्षितता विरुद्ध स्वतंत्रता, या खोट्या प्रतिसिद्धांतानें खूप अधिक लक्ष वेधून घेतलेलें आहे. विशेषतः भूतकाळांत मूर्खपणाचा प्रचार करून उदारमतवादाचा तिरस्कार करण्याचा उपदेश करणाऱ्या मार्क्सवादी, बॅकुनिनियन व फेबियन समाजवाद्यांना व इतरांना एकदां उदारमतवाद दुर्बल बनला म्हणजे समाजवाद संपुष्टांत येतो, हाच बोध फक्त झाला याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे. सुरक्षितता म्हणजे अनियंत्रित सत्तेचा उपयोग करण्याच्या विरुद्ध हमी देणें अनियंत्रित सत्तेच्या विरुद्ध हमी देणें म्हणजेच स्वतंत्रता, स्वातंत्र्यप्रधान संस्था, आणि मानवी हक्क होत. स्वतंत्रता नसेल तर हमी नाहीं, सुरक्षितता नाहीं. हें अत्यंत साधेंसीधें आहे, आणि हें संपूर्ण सुरक्षितता नव्हती म्हणून उदारमतवादाच्या विरुद्ध उठलेल्या बुद्धिवाद्यांनीं अत्यंत भयंकरपणानें विपरीत भासविलेलें आहे. मृत्यूच काय ती संपूर्ण सुरक्षितता देऊं शकेल; जी कांहीं सापेक्ष सुरक्षितता आपण संपादन करूं शकतों, ती आपल्याला जुलमी सत्तेकडून नव्हे, तर उदारमतवादी लोकशाही सत्तेकडूनच मिळूं शकेल.

अखेरचें सांगावयाचें म्हणजे स्वतंत्रता ही कांहीं प्रगति नव्हे, परंतु प्रगति हें मात्र स्वतंत्रतेचें फलित होय. कारण तिला आवश्यक असणारी संशोधकता स्वतंत्र मानांची देणगी असणाऱ्या स्वतंत्र नागरिकांकडूनच फक्त प्रगट होऊं शकत असते. गुलाम समाजांतल्या बीजापोटीं निपजलेल्या फळांचा हंगाम ऑगस्टस, नेपोलियन,

स्टालिन अशांची हुकूमशाही आपल्या पदरीं पाडून घेऊं शकते. प्रगतिसाठीं हुकूमशाहीची गरज असते, असें म्हटलेलें आहे. ज्या हुकूमशहांच्या मनांची व चारित्र्याची जडणघडण जेव्हां कांहीं अंशींतरी स्वतंत्रता होतीं, अशा कालखंडांत बनलेली होती त्यांनीं प्रगतीला आपल्या वांट्यांचा हातभार लावल्याचें प्रसिद्ध आहे. परंतु त्यांच्या मागून सत्तारूढ होणारांनीं नव्हे. जुलमी सत्ता ही अशी राज्यपद्धति असते कीं तिचा शेवट राज्यकर्ते आणि प्रजाजन या दोघांनाहि सारख्या गुलामगिरीत जखडून होत असतो, पूर्व रोमन आणि चिनी साम्राज्यांचे सम्राट, मध्ययुगीन पोप आणि खलिफा, हे देखील आपल्या अधिकारशाही पद्धतींचीं बंधनें, नियंत्रणें व विधी संस्कार यांच्यामुळें जखडून गेलेले होते. त्यांचें कसेंबसें चालूं होतें, परंतु त्यांच्यावर बाह्यशक्तीचा एक आघात झाल्याविना त्यांच्यांत परिवर्तन होऊं शकलें नाहीं. परिवर्तन नव्हतें म्हणूनंच प्रगति देखील नव्हती.

# कम्युनिस्टांचा स्वतंत्रतेला नकार : ८

उदारमतवादाच्या विरोधकांच्यामध्यें तरतम भेद पाडण्यासाठीं—जे उदारमतवादी चैतन्यानें प्रेरित होतात व स्वतंत्र समाजांतील बहुतेक सर्व मूलभूत संस्थांना मान्यता देतात ते आणि जे सिद्धांत किंवा व्यवहार किंवा दोन्हीं बाबतींत उदारमतवादाची प्रवृत्ति संपूर्णतया नाकारतात ते अशी त्यांची विल्हेवारी लावावी लागेल. पहिल्या विल्ह्यांत पुराणमतवाद (काँझर्वेटिझम), आणि सामाजिक लोकसत्तावाद (अथवा श्रमवाद) यांचा समावेश होतो. इंग्रजी भाषाभापी राष्ट्रांचा पुराणमतवाद हा उदारमतवादाचें बऱ्हंशीं उत्पत्तिकारण झालेला आहे; स्वतंत्रतेच्या परिणामांनीं जे भयभीत झालेले होते, जे कुणी परिवर्तनाचा क्रम रोखूं इच्छित होते, स्वातंत्र्यमूलक संस्थांना शाश्वत राखण्यासाठीं समतेवर भर देणें अनिवार्य असतें या वस्तुस्थितीला तोंड देण्याची ज्यांची इच्छा नव्हती, त्या सर्व माजी उदारमतवाद्यांचे गट एकामागून एक पुराणमतवादांत समाविष्ट होऊं लागले. अमेरिकेच्या संयुक्त राज्यांमधील दक्षिणेंतले जे लोकसत्तावादी (डेमाक्रॅट्स) लोक वांशिक समतेला मान्यता देण्याचें नाकारतात, ते काँझरवेटिव्ह होत, आयरिश होमरूलची मागणी धिःकारणारे ब्रिटिश उदारमतवादी काँझरवेटिव बनले होते, अमेरिकेच्या संयुक्त राज्यांतील ओल्ड गार्ड रिपब्लिकन्स (पुरातन संरक्षक प्रजाराज्यवादी) आणि ब्रिटिश टोरी (पुराणमतवादी) यांना मालमत्ता ही विशेप लोकांची सवलत राहावी, हें अभिप्रेत असल्यामुळें ते काँझरवेटिव होत. कॅथोलिक पंथीयांच्या समतेविपयीं भीतिग्रस्त असणारे कॅलव्हिनपंथीय डच आणि पाखंडवादी पंथाची भीति वाटत असलेले वेल्जममधील कॅथोलिक हे काँझरवेटिव होत, तद्वतच जे फ्रेंच लोक फ्रान्स आणि त्याच्या दर्यापार वसाहती यांच्यामधील समता अव्हेरतात, ते काँझरवेटिव होत.

उदारमतवादी राष्ट्रांत स्वतंत्रतेच्या विकासाला काँझरवेटिव कोलदांडा होतात, परंतु त्याचें स्वरूप तितकेसें गंभीर नसतें. (कधीं कधीं परिवर्तनाचा क्रम मंदगति करण्याचें त्यांचें कार्य उपयुक्त देखील ठरत असते.) समाजवादाच्या मुख्य प्रवाहापासून जेव्हां सोशल डेमोक्रॅटस् वेगळे फुटून निघतात, तेव्हां त्यांनी उदारमतवादाचा राजकीय कार्यक्रम स्वीकारलेला असतो. उदारमतवादी

आणि सोशल डेमोक्रॅटस् यांच्यांत दूरत्व आणणारे अंतर पन्नास वर्षांपूर्वी खूपच मोठें होतें. आज तें बरेंच कमी झालेलें आहे (आणि एखाद्या पिढींत तें संपूर्णपणें लोपून जाईल). उदारमतवाद्यांनीं आर्थिक व सामाजिक बाबतींत कायद्यांनीं सुधारणा करण्याच्या आवश्यकतेला मान्यता दिलेली असून, सोशल डेमोक्रॅटांनी मालमत्तेवरील खासगी मालकी नष्ट करण्याच्या आणि राज्यानें अर्थव्यवस्था संपूर्णपणें आपल्या ताब्यांत घेण्याच्या कल्पनेचा त्याग केलेला आहे (किंवा ते करीत आहे).

अमेरिकेचीं संयुक्त राज्यें आणि कॅनडा यांच्यासारख्या देशांमधून सुधारणाप्रवण उदारमतवादानें सामाजिक लोकसत्तावादाला पचवून टाकलें (आणि समाजवादाच्या विकासाला प्रतिबंध केला.) ग्रेट ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, स्कॅन्डेव्हियन देश इत्यादिकांच्यामध्यें श्रमवाद आपला मूळचा समाजवाद अधिकाधिक दूर सारीत आहे, युरोपांतील व आशियामधील लोकसत्तांमधून उदारमतवादी आणि सोशल डेमोक्रॅट यांच्यांतलें सहकार्य अधिकाधिक वाढत आहे. इटालीपासून इंडोनेशियापर्यंत सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हे आज नित्यशः उदारमतवादी प्रवृत्तीचे कैवारी बनत असतात.

परंपरावादी, राष्ट्रवादी आणि साम्यवादी (कम्युनिस्ट) हे संपूर्णपणें उदारमतवादाचा इन्कार करीत असतात. परंपरावादाच्या अधिकारवादी प्रवृत्तीबद्दल कुणीहि शंकाकुशंका उपस्थित करूं शकणार नाहीं, परंपरावादी जेव्हां अधिकारपदावर असतात, तेव्हां काय घडूं शकते, हें स्पष्ट दर्शविण्यासाठीं पेताँ आणि मॅसादेध यांचीं नांवें पुरेत, लॅटिन अमेरिका, युरोप, मध्यपूर्व, दूरपूर्व यांच्यामधील देशांत काय घडत आहे, किंवा नजीकच्या भूतकाळांत काय घडलें यांच्यावर नजर टाकली तरी पुरे; सर्वदा सत्य व स्वतंत्रतेवर भर देण्यांत येत असतो आणि सत्याचा शोध कधींच संपणारा नसतो, ही परंपरावादाच्या मधली विसंगति फक्त बघून घ्यावी. राष्ट्रवादानें सर्वच खंडामध्यें युद्धें, यादवी युद्धें, आणि कत्तली, लक्षावधीचें शिरकाण, कोटयावधींना दास्यबंधन, इत्यादि शोकांतिकांचें जें सूत्रधारत्व केलें त्या इतक्या ताज्या आहेत कीं राष्ट्रवाद (जेथें परंपरावाद शांत व सौम्य असाच नेहमीं असतो तेथें हिंसक आणि निर्दय स्वरूपाचा राष्ट्रवाद) आणि स्वतंत्रता यांच्यामधल्या त्याच्यापेक्षांहि अधिक मोठ्या विसंगतीची आठवण कुणालाहि व्हावी. कम्युनिझमच्या संबंधीं दुर्दैवानें गोंधळ उडालेला दिसत आहे; १९५६

मधील घटना, रशियाच्या सोव्हियत राज्यसंघाची विसावी पक्षपरिषद, स्टालिन-वादाचें विलीनीकरण, सामुदायिक नेतृत्वासाठीं आवाहन, यांच्यामुळें गोंधळांत भरच पडली आहे. जरी स्टॅलिन आणि क्रुश्चेव्ह–बुल्गानिन–झुकाव्ह या त्रिमूर्तींत असणारा फरक ( कदाचित तो नसेलहि ), वाईट धनी आणि चांगला(?) धनी यांच्यामधल्या फरकाप्रमाणें असला तरी, धनी हे नेहमीं धनीच असतात याचा बऱ्याच जणांना विसर पडलेला दिसतो. जेव्हां निरोच्या जागीं वेस्पॅसियानस आला, किंवा शहा सुलेमानच्या गादीवर शहा हुसेन आला, तेव्हां अनियंत्रित सत्तेच्या जागीं कांहीं स्वतंत्रता आली नव्हती.

अधिकृतरीत्या कम्युनिस्ट स्वतःच्या नियंत्रणाखालीं जीं राज्यें आहेत, त्यांत स्वतंत्रतेचें अस्तित्व असल्याचें समर्थन करतात. त्यांचें समर्थन इतकें हास्यास्पद आहे कीं तें जरा देखील विचारांत घेण्याजोगें नाहीं. तेथें कुठेंहि उच्चारस्वातंत्र्य आणि संमेलनस्वातंत्र्य नाहीं. कोणत्याहि नागरिकाला सार्वजनिक अधिकाऱ्यां-च्या वर नियंत्रण आणतां येईल अशी कारभाराची कोणतीहि पद्धति तेथें नाहीं. तेथें चर्चा कधींच नसतात, फक्त एकपात्री नाटयछटा असतात. पॉलिटब्युरोच्या नोकरशाहीची लहान अल्पलोकसत्ता केवळ राज्यकारभारावरच नियंत्रण ठेवीत नाहीं, तर अर्थव्यवस्था व शिक्षण यांच्यावर देखील ठेवीत असते, धार्मिक, बौद्धिक आणि फुरसतीच्या काळांतील उद्योगांवर ही त्यांचें नियमन असतें. हें सर्व आपण लोकांच्या वतीनें करीत आहोंत, असें तें म्हणत असतात, आपल्या-ला काय पाहिजे, हें लोकांनीं व्यक्त करण्यासाठीं त्यांना अधिकार देऊं शकणाऱ्या मोकळया वातावरणामधील नियंत्रणरहित निवडणूकी तेथें नाहींत. कम्युनिस्ट म्हणतात कीं ते आपल्या प्रजाजनांना सुखी करीत असतात: शक्य आहे, कधीं-कधीं गुलाम देखील स्वतंत्र मनुष्यांच्यापेक्षां अधिक सुखी प्राणी झालेले आहेत. स्वतंत्रता म्हणजे सौख्य नव्हे.

कम्युनिस्ट खासगीरीत्या असें मान्य करतात की त्यांच्या नियंत्रणाखालील देशांत ( फारच अल्प किंवा ) मुळींच स्वतंत्रता असत नाहीं. ते असें सुद्धां म्हण-तात,—आणि संभवतः अनेकाची तशी श्रद्धाहि आहे,—कीं कम्युनिझमचे सगळे अंतर्गत वैरी नष्ट होऊन गेल्यानंतर आणि बाहेरील शत्रूंच्या धमक्यांचें नांव-निशाण किंचितहि न उरलें म्हणजे स्वतंत्रता प्रचारांत येईल. कम्युनिस्ट राजवट आपली अंतर्गत रचना बदलून उदारमतवादीकरणाची कार्यपद्धति अंगीकारूं शकेल

कीं नाहीं, किंवा अधिकारवादाशीं ती इतक्या मर्यादेपर्यंत शृंखलाबद्ध झालेली आहे कीं सर्व कम्युनिस्ट राज्यें पोलिसराज्येंच बनलीं पाहिजेत, हें समजून घेणें महत्त्वाचें आहे.

कम्युनिस्ट आणि कम्युनिस्टेतर बुद्धिवादी नेहमीं असें समर्थन करीत असतात, कीं अधिकारवाद हा भांडवलशाहीच्या व साम्राज्यशाहीच्या दडपणाचा परिणाम असून एक तात्पुरतें अवस्थांतर आहे; कम्युनिस्ट राजवटींचें सुदृढीकरणाबरोबर आणि अंतर्गत विरोध व बाह्य आक्रमण हीं कमजोर झालीं म्हणजे स्वतंत्रतेचें युग अवतरेल आणि मार्क्सनें पूर्व लक्षित केलेला राज्यसत्तेचा ऱ्हास प्रत्यक्ष वस्तुस्थिति बनेल. तात्त्विक दृष्ट्या पुष्कळच गोष्टी शक्यप्राय वाटत असतात. तथापि ऐतिहासिक पुराव्याचा आधारें असें दिसून येतें कीं कम्युनिझमच्या भवितव्यासंबंधींचा हा आशावादी विचार कांहीं मूलभूत गोष्टींच्या विषयीं विशेषत: (अ) समुदायवादाचें वैशिष्ट्य व स्वरूप, (ब) कम्युनिस्टांचा ध्येयवाद, आणि (क) कम्युनिझमनें अस्तित्वांत आणलेल्या राजकीय संस्थांचा प्रभाव, यांच्या संबंधीं असलेल्या विपरीत कल्पनांच्या वर आधारलेला असावा.

अनुभवानें असें दिसून येतें कीं आर्थिक जोखमदारीचीं कामें योग्य रीतीनें चालू राहण्यासाठीं शिस्त आणि अधिकार यांची गरज असते. भांडवलशाही समाजांमध्यें लक्षावधि किंवा कोट्यावधि कामें वेगळाल्या प्रकारचीं असतात. त्यांच्या बहुगुणितपणामुळें—त्यांच्यांत कारखाने, शेती व्यापार आणि पत, यांच्या परस्पर विरोधी हितसंबंधांमुळें, तद्वत् मालक आणि मजूर, कारभारी आणि कामगार, यांच्यांतसुद्धा तसाच दुजाभाव आल्याकारणानें,—म्हणजे दुसऱ्या शब्दांत सांगायचें झाल्यास स्वतंत्र समाजांच्या विशिष्ट लक्षणांना अनुसरून सत्तेचें जें विभाजन होतें, त्याच्यामुळें अधिकार आणि शिस्त यांची कडक अंमलबजावणी मर्यादित झालेली आहे.

समुदायवादी समाजरचनेंत संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचा समावेश करून घेणारी एक प्रचंड संस्था (कार्पोरेशन) असते. त्या संस्थेच्या अवाढव्य आकारामुळेंच एका गुंतागुंतीच्या व ताठर अधिकारवादी आणि कडक शिस्त असणाऱ्या रचनापद्धतीची आवश्यकता उत्पन्न होत असते; अर्थव्यवस्थेच्या ह्या अथवा त्या शाखेनें उत्पादकांच्या या किंवा त्या गटानें घेतलेल्या स्वयंनिर्णयानुसार तेथें योजनांचे कांहीं तुकडे पाडतां येणें शक्य नसतें; तेथें सत्तेचें विभाजन नसतें. अशा

परिस्थितींत संपूर्ण अधिकार व संपूर्ण शिस्त यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिष्ठानांच्या आधारावर अर्थव्यवस्था कशी चालू राहूं शकेल, हें समजणें कठीण आहे. आणि अर्थव्यवस्था व राज्यव्यवस्था ह्या जर एकांतच अंतर्भूत असतील तर ती एकच संस्था आपल्या आर्थिक व्यवहारांत अधिकारवादी पद्धतीनें आणि आपल्या राजकीय व्यवहारांत स्वातंत्र्यवादी पद्धतीनें कशी काय वागूं शकणार ? समुदायवादी राष्ट्र हें जर राजकीय बाबतीत स्वतंत्र असेल तर, मंदगतित्व, धरसोड, मतभेद, परस्परविरोधी शक्तींचा तटस्थपणा, या लोकशाही पद्धतीच्या विशिष्ट लक्षणांच्या योगानें अर्थव्यवस्थेंत खळ पडण्याचा नेहमींच संभव असतो. अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता जर कायम राखायची असेल तर, सोव्हियत युनियन, चीन आणि अल्बेनियापासून तहत उत्तर व्हियतनामपर्यंत सगळीं तथाकथित "लोकशाही जनताराज्यें" यांच्यामध्यें जसा करण्यांत आलें, तसा लोकशाही कार्यपद्धतींचा लोप व्हायलाच पाहिजे.

सुधारणांच्या प्रारंभकालापासून असंख्य समुदायवादी समाज अस्तित्वांत आलेले आहेत. एकालादेखील स्वातंत्र्यप्रधान संस्थांचा उपभोग घेतां आलेला नाहीं. समुदायवादाचें राजकीय स्वरूप सोडून दिलें तरी तो व्यक्तिगत स्वयंशासनाची अभिव्यक्ति करण्यासाठीं उपयोगी होत नसतो. खासगी संपत्तीच्या अभावामुळें व्यक्तीला जें कांही साधावयाची इच्छा असते, तें फक्त राज्याच्या अधिकारपत्रानेंच साध्य होऊं शकतें. राज्यानें कागदाचा पुरवठा केल्याशिवाय एकहि मासिक पत्रिका छापतां येणें शक्य नसतें; कोणत्याहि संस्थेला राज्यानें इमारत दिल्यावांचून मुख्य कार्यालय ठेवतां येणें शक्य होत नाहीं; राज्यानें जागा दिल्याशिवाय कोणतीहि सभा भरवितां येणें शक्य होऊं शकत नाहीं. चमत्कार घडूं शकतात; परंतु चमत्कारांवर ( विशेषत: आर्थिक आणि राजकीय चमत्कारांवर ) ते घडल्यानंतरच, आधी नव्हे,—विश्वास ठेवणें अधिक शहाणपणाचें असतें.

सोव्हियत युनियन, चीन, आणि लोकशाही जनता राज्यें यांच्यामध्यें जुलमी सत्ता व समुदायवाद हे सहगामी बनलेले आहेत, त्याचप्रमाणें कम्युनिस्ट त्यांच्या ताब्यांत असलेल्या राज्यांत राजकीय दृष्ट्या जें कांही साध्य करण्यांत आलें, त्याच्याविषयीं समाधान पावलेले आहेत, आणि त्यांना पोलिसराज्य हें स्वतंत्रतेसमानच वाटत असते, याचीहि दखल मध्यंतरी घेतलेली बरी; स्टालिन

म्हणाला होता, कीं, " आतां दडपशाही घरांत अनावश्यक आहे, कारण पिळवणूक दडपून टाकल्यावर आणि पिळवणूक करणारे बेपत्ता झाल्यावर दडपशाही करायलाच कुणी उरत नाहीं." त्या गोष्टी अजून बदललेल्या नाहींत, उलट वाढतच आहेत, पण बुल्गानिन व क्रुश्चेव्ह पुनरुक्ति करतातच कीं, " आतां दडपशाही मुळींच नाहीं."

स्वातंत्र्यानें विभिन्नता आणि विभाजन येत असतात. स्वतंत्र समाजांत काँझरवेटिव ( सनातनी ) आणि जहाल, आस्तिक आणि नास्तिक, कठीण कावाडकष्ट करणारे आणि न करणारे, असे भेद असतात. उदारलोकशाहींत मतभेद आणि विरोध यांच्या कायदेशीरपणाला मान्यता देण्याच्या मार्गानें एका अशा कार्यपद्धतीचा समावेश केलेला असतो कीं ज्याच्या योगानें हे विविध गट कमीअधिक प्रमाणांत शांततेनें सहजीवन व्यतीत करूं शकतात. कम्युनिस्ट मनाला विभिन्नता किंवा कायदेशीर विरोध यांच्या कल्पनाच समजूं शकत नाहीं. कम्युनिस्टांच्या दृष्टीनें जें कांहीं भिन्न असेल तें चुकीचें किंवा दुष्टपणाचें असतें, आणि कम्युनिस्ट कल्पनांचें जें प्रातिनिधिक स्वरूपांचें सत्य असतें, त्याच्या बरोबरीनें त्याला समान पातळीवर ते प्रतिष्ठा देऊं शकत नाहींत. कम्युनिस्ट जर सहिष्णु असते, तर त्यांची सहिष्णुता, ज्या ओटोमन तुर्कांनीं "काफर लोकांना" मानवांपेक्षां नीच कोटींत—दुर्दशेंत—जगूं दिलें होतें, त्याच स्वरूपाची झाली असती. कम्युनिस्ट असें समर्थन करतात कीं वास्तविक स्वरूपाच्या समाजवादी समाजरचनेंत मतभेद आणि 'मार्गभिन्नता' यांच्या समस्या उपस्थित होऊंच शकणार नाहीत, याचें कारण तेथील सर्व नागरिक आर्थिक दृष्ट्या समान असल्यामुळें एकदिलाचे असतील. ते ह्या गोष्टीचा विचारच करीत नाहीत कीं उत्पन्नाची पातळी समान असली तरी कार्यें मात्र भिन्नभिन्नच असतील, आणि एखाद्या गटाच्या सर्वच घटकांवर समान पद्धतीची प्रतिक्रिया होऊं शकेल, याची ग्वाही अजून तरी मिळालेली नाहीं, ( स्वतंत्र समाजांमध्यें संपत्तीच्या मालकांत वेगळेपणा आहे, शेतकऱ्यांमध्यें वेगळेपणा आहे, कामगारांत वेगळेपणा आहे. )

लेनिन आणि त्याचे सहकारी यांचे मूळ हेतू कोणत्याहि प्रकारचे असोत, त्यांनीं रशियाची पुनर्घटना एक पक्षीय हुकूमशाही पद्धतीच्या पायावर करणें पुढें चालूं ठेवलें. गेल्या थोड्या वर्षात ज्या देशांमधून कम्युनिस्टांनीं राज्यसत्ता बळकावलेली आहे, तेथें त्यांनीं ( मूळांतल्या रशियन पद्धतीच्या पेक्षां वेगळ्या अशा अल्पलोकसत्ताक धर्तीवर ) हुकूमशाही राज्यपद्धति संघटित केलेली आहे. एकदां संस्था

अस्तित्वांत आणली कीं मग तिचा नायनाट करणें कठीण असतें. बहुधा संस्था अशा एका तर्कपद्धतीनें विकास पावण्यास प्रवृत्त होत असतात कीं जिचा संबंध त्यांच्यांत अंतर्हित असलेल्या कल्पनांच्या बरोबर फारच थोडा असतो, अथवा अजिबात नसतो. स्वेच्छेनें संपुष्टांत आलेल्या हुकूमशाही सत्तांचीं उदाहरणें क्वचितच सांपडतील. सामान्यत: अंतर्गत कलह आणि आणि बाह्य आघात यांचा परिणाम त्या नष्ट होण्यांत होतो; दोहोंतून एकाचा जरी अभाव असला तरी हुकूमशाही शतकानुशतकें टिकूं शकेल. कम्युनिस्ट विचारसरणींत जर व्यक्तीची स्वायत्तता, सरकारवर नागरिकांचें नियंत्रण, विरोधाचा कायदेशीरपणा यांचा अंतर्भाव केला तर बदल घडून येण्याचा संभव अंधुकसा तरी उरेल. परंतु ह्याच कल्पनांच्या विरुद्ध कम्युनिस्टांनीं खूपच तीव्र आक्षेप घेतलेले आहेत. या कल्पनांच्या बद्दल तिरस्कार वाटल्यामुळें जें कांहीं तोपर्यंत समाजवादाचा प्रमुख ओघ म्हणून होतें, त्या सर्वांपासून स्वत:ला तोडून टाकण्यास ते प्रवृत्त झाले.

असें मनोराज्यहि करणें शक्य आहे कीं, सर्व विरोध आणि मतभेद लयाला गेले म्हणजे राज्यसत्तेला असलेले छळ करण्याचे अधिकार वापरणें कम्युनिष्ट नष्ट करतील. परंतु वापर फक्त नष्ट होईल, अधिकार नव्हे; नागरिकांवर कम्युनिस्टांची इच्छा संपूर्णपणें बळजबरीनें लादण्यासाठीं साधनभूत असलेले अधिकार ते कधीं काळीं सोडून देतील, याचा फारच कमी संभव वाटत आहे. त्यांनीं जर असें केलें तर मग ते कम्युनिस्टच राहाणार नाहींत, परंतु ज्यांचा आज तीव्रतर त्वेषानें ते तिरस्कार करीत असतात, त्यांच्या सारखेच ते लोक-सत्ताक समाजवादी बनले असते.

त्यांच्या आंदोलनाच्या संघटनेंत ज्याप्रमाणें कोणतेंहि ' उदारमतवादीकरण ' अशक्य आहे, तद्वतच राज्यसत्तेचा " क्रमश: लोप " अशक्य आहे. याचें साधें कारण असें आहे कीं राजकीय आणि बौद्धिक सत्तेच्या दडपणांत जरादेखील सैलपणा आला तर त्यामुळें मतभेद, ' मार्गभ्रष्टता ' आणि विरोध, ज्याची कल्पना देखील कम्युनिस्टांना वावडी वाटत असते, असा कायदेशीरपणा अस्तित्वांत येईल. कम्युनिस्ट समाजरचना जर कांहीं काळ टिकून राहिली तर असाहि संभव आहे कीं ते समाज स्वत:चें चिरकालिक अस्तित्व टिकविणाऱ्या अल्प-लोकसत्ताक राज्यसंघटनांत ( म्हणजे पॉलिटब्युरो किंवा तत्सम संस्थांत ) विकसित होतील आणि राजकीय अरेरावी, बौद्धिक हटवादीपणा, व आर्थिक वतनदारी जबरीनें अंमलांत आणतील.

# उदारमतवादी लोकशाहीचें केंद्रीयतत्त्व, पद्धति : १

उदारमतवादी लोकशाहीपुढें आतां यानंतर मनुष्यजातीला परंपरावादी अधिकारशाहीच्या चिरनिद्रेंतून जागें करण्याची समस्या प्रमुखत: उरलेली नाहीं, परंतु मानवी उद्योगांची मुक्तता झाल्यामुळें जन्मास आलेल्या नव्या अकरणात्मक ( अधिकारवादी ) शक्तींना रोखून धरण्याची समस्या तिच्यापुढें निर्माण झालेली आहे. या शक्तींना रोखून धरण्यासाठीं स्वतंत्रतेची कल्पना आणि उदारमतवादी विचारांचें व कार्यक्रमांचें पुन:प्रतिपादन दोनशेंवर्षांपूर्वी उपलब्ध नसलेल्या पुराव्यांच्या अनुषंगानें करणें आवश्यक झालेलें आहे. हा पुरावा बहुतांशानें फ्रेंच '**फिलासफेज**' ( समतादर्शी ) आणि त्यांचे स्पेनपासून रशियापर्यंतचे स्तुतिपाठक, तसेंच जर्मन '**ऑफक्लायरुंग**' चें ( सर्वाभूतीं परमेश्वर ) प्रतिनिधित्व करणारे फ्रॅन्कलीन व जेफर्सन आणि त्यांचा अमेरिकन मित्रपरिवार, यांना श्रद्धेच्या ताम्रपटासमान वाटणारी, मानवी स्वभावांतली सत्प्रवृत्ति आणि निसर्गसिद्ध सुसंवादित्व यांच्या संबंधीच्या संभ्रमांपेक्षां कमी आनंदायक आहे.

असा पूर्वेतिहास असूनहि, त्या मानानें आज फारच थोडे लोक उदारमतवादी लोकशाहीचा पक्ष घेण्यास आणि मनुष्य व समाज यांच्याबद्दलच्या उदारमतावादी दृष्टिकोणाला मान्यता येण्यास प्रवृत्त होतात. बहुतेक लोकांना स्वतंत्रतेची अकरणात्मक—(विभाजन, संघर्ष, मंदगतित्व, दडपून ठेवण्यांत आलेली क्षुब्धता, असौख्य, )—बाजूच फक्त माहीत आहे. स्वतंत्रतेविषयीं समान तिरस्कार असणाऱ्या विविध प्रकारच्या "नवव्यवस्था" च्या समर्थकांना आतां सर्वत्र स्वत:साठीं मोकळे रान झाल्यासारखें वाटत आहे असें दिसतें. ( गेल्या सहा वर्षांत उदारमतवादी लोकशाहीनें विजयांपेक्षां पराभवच अधिक खाल्लेले आहेत; अधिकारशाहीचा प्रसार होत आहे, आणि तथाकथित " स्वतंत्र " राष्ट्रांपैकीं अनेक राष्ट्रें केवळ परंपरावादी किंवा आमूलाग्र सुधारणावादी हुकूमशहांच्या ढांचेच्या अंमलाखालील स्वतंत्र देश होत. ) हें असें कां घडतें, यांच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे उदारमतवादी लोकशाहीचें संपूर्ण स्वरूपांत दर्शन घडविण्याच्या आवश्यकतेकडे क्वचितच लक्ष देण्यांत आलेलें आहे.

स्वतंत्रतेच्या पायावर रचलेली राज्य-पद्धति समजून घेण्यासाठीं लोकांना लोकसभेतील वादपटुता, व्यक्तिमत्त्व, बुद्धिप्रामाण्य, सदसद्विवेक बुद्धीचें स्वातंत्र्य, उत्पादनाच्या साधनांवर खासगी मालकी, इत्यादि कांहीं विशिष्ट वस्तुस्थितींचें फक्त ज्ञान असण्याची गरज आहे. असें धरून चालणें चुकीचें आहे. या वस्तुस्थितींचा संबंध जेव्हां अशा **विचारांच्या** बरोबर प्रस्थापित होत असतो, की जे त्या सर्व वस्तुस्थितींचा समावेश आपल्यांत करून घेऊं शकतात, कीं ज्यांचें वर्णन संयुक्तिक संज्ञानी करता येणें शक्य असतें, कीं ज्याचें समर्थन भरीव पुराव्यांच्या आधारें करतां येतें, की सरतेशेवटीं आपल्या वास्तव्याच्या इहलोकांत जें कांहीं घडत असतें, त्याचें समाधानकारक स्पष्टीकरण ज्याच्याकडून आपणास प्राप्त होत असते, तेव्हांच फक्त त्या वस्तुस्थिती आकलनीय होत असतात.

आर्थिक व लष्करी गटांचें कार्य आणि प्रभाव कशाहि प्रकारचा असला तरी आज मानवी व्यवहारांत प्रेरक तत्त्वाचें प्रतिनिधित्व बुद्धिवादी करीत असतात. आणि एखादें आंदोलन यशस्वी होण्यासाठीं आवश्यक असणारें प्रतिपादन मानसिक व्यवहारांची परिणति असून, तिची स्पष्टता व सामर्थ्य यांचा संबंध ती साध्य करतांना होणाऱ्या गर्भित परिणामाशीं चांगल्या प्रकारें प्रस्थापित झालेला असतो, ही वस्तुस्थिति वारंवार विसरून गेलेली असते. बुद्धिवादी लोक बहुधा स्वत: प्रत्यक्ष कृति करीत नसतात, परंतु त्यांनीं पुरविलेल्या कल्पनांच्यामुळें कर्त्या लोकांना दिग्दर्शन मिळत असतें. बहुजनसमाजामधील व्यक्तीची मानसिक पातळी अजून यौवनाप्रत न पोंहचलेल्या बालकांच्या मानसिक पातळीपेक्षां अधिक उन्नत नसते, हें खरें देखील असेल, परंतु ती व्यक्ति देखील बुद्धिवाद्यानें तिला दर्शविलेल्या दिशेनें जाईल.

ख्रिस्ती धर्माचें यश संत पॉल यांच्या विना संपादन होऊं शकलें असतें, परंतु अर्धशिक्षित आणि निरक्षर शेतकरी यांनीं झ्विगली, ल्युथर व कॅलव्हिन जर झाले नसते तर आपला धर्म कधींहि बदलला नसता. चँगलिंग, कुमारजीव आणि हुएत्संग यांनी चीन करितां जें केलें तेंच ह्यांनीं युरोपियनांसाठीं केलेलें आहे. लॉक, स्मिथ, बेन्थॅम हेजर होऊन गेले नसते तर ब्रिटिश राष्ट्राच्या एका वृद्धिंगत होत असलेल्या लोकविभागानें उदारमतवादाचा स्वीकार कधींच केला नसता. रुसोविना फ्रेंच जॅकोबाइन नामोहरम झाले असते, लॅस्साल आणि

आणि मार्क्स यांच्यावांचून जर्मन समाजवादी, सन-यात-सेन विना चिनी सुधारणावादी, आणि गांधी विना हिंदी राष्ट्रवादी, यांचा पाडच लागला नसता. अन्वांतर गोष्टी तुल्यबल असल्या तर, एखाद्या आंदोलनाचें बळ त्याचें प्रतिपादन, कल्पना, तत्त्वज्ञान, किंवा जें कांहीं इतर म्हणतां येईल तें, ह्यांच्या सामर्थ्याशीं निगडित झालेलें असतें. कॅथोलिक पंथीयांत कांहीं अनेक संत अंब्रोसि, संत ग्रेगरी आणि संत थामस नाहींत, परंतु एखाद्या कॅथोलिकाला जर तो शिक्षित असेल तर प्रत्यक्षपणें, जर अशिक्षित असेल तर अप्रत्यक्षपणें हे स्फूर्तिदाते महापुरुष आपले मार्गदर्शक असल्याचें दिसून येतें. कम्युनिस्टांत कांहीं पुष्कळ लेनिन नाहींत, परंतु एखाद्या कम्युनिस्टाला लेनिनमध्यें त्याच्या शंकांचें उत्तर, आणि त्याच्या कृतींना मार्गदर्शन दिसत असतें.

एक काळ असा होता कीं स्वतंत्रतेविषयीं जगांतले बहुतेक लोक उदासीन किंवा विरुद्ध असल्यामुळें, तेव्हां विजयप्राप्तीसाठीं लागणारें सामर्थ्य पुरविणाऱ्या उदारमतवादी कल्पनेची जाणीव पुरेशा लोकांना झालेली होती. गत तीन शतकांमधील उदारमतवादी क्रांत्या आणि सुधारणा यांच्या पाठीशीं स्पष्टपणें प्रतिपादन केलेली व स्पष्टपणें समजून घेतलेली एक **कल्पना** होती. ती कल्पना उदारमतवादी लोकसत्ताक राज्याच्या स्वरूपांत प्रत्यक्ष व्यवहारांत परिवर्तित करण्यासाठीं संस्थांची उभारणी करण्यांत आलेली होती. या संस्थांच्या आधारें राष्ट्रांचा विकास होऊन त्यांनीं, इतर आधुनिक राष्ट्रांनीं जितकें साध्य करून घेतलें, त्याच्यापेक्षां अधिक प्रगति साध्य करून घेतली. आजची वास्तविकता ही शंभर, दोनशें, तीनशें वर्षापूर्वीच्या वास्तविकतांपेक्षां वेगळी आहे. उदारमतवादाला प्रेरक अशी **कल्पना** गतकाळांत होती, तीच आज देखील आहे, परंतु तेव्हां जेफर्सन, मिरॅब्यु, किंवा हम्बोल्डट् यांना जें प्रतिपादन समाधानकारक वाटलें होतें, तें आतां अस्पष्ट किंवा असमाधानकारक वाटतें.

असें वारंवार कानीं पडत असतें कीं उदारमतवादी कल्पना स्पष्टीकरणाच्या दृष्टीनें अत्यंत गुंतागुंतीची व अनेकांगी अशी आहे; असें सुद्धां म्हणण्यांत येते कीं ती एक कल्पना नसून परस्पर असंबद्ध तत्त्वांची मारून मुटकून बनवलेली पद्धति आहे. स्वतंत्रतेचा सयुक्तिक शब्दांत अर्थ लावण्याच्या बिकट कार्याला तोंड देण्याच्या बाबतींत उदारमतवादी नेहमीच आळस करीत असतात; ती जीवनपथ होत आलेली आहे. आणि आजहि आहे. उदारमतवादी लोकशाही ही एक पद्धति

आहे; ती पद्धति असल्याकारणानें, तिचें परिभ्रमण जिच्याभोंवती होत असते, अशी एखादी कल्पना किंवा अत्यंत घनिष्टपणानें परस्परसंबद्ध अशा कित्येक कल्पना असाव्यात. खरोखरच इतर सर्व पद्धतीच्यापेक्षां एका वस्तुस्थितीपेक्षां सर्वस्वी भिन्न असणाऱ्या या पद्धतीचें आकलन होणें इतकें सोपें नाहीं, ती वस्तु-स्थिति म्हणजे तिचें केंद्रीय तत्त्व साध्य हें नसून साधन आहे; ती परहितनिष्ठा व अहंमन्यता, अस्मिता आणि दृढैक्यभाव, यांच्यासारख्या उघडपणें विरोधी वस्तूंच्या सहजीवनाला मान्यता देते, अद्वैतापेक्षां अनेकत्वाचें ती समर्थन करते, तिला धाक दाखविणाऱ्या शक्तींना ती पायबंद घालूं पाहते, त्यांचा नाश करूं इच्छीत नाहीं. उदारमतवादी लोकशाही समजून घेण्यासाठीं सोव्हियत किंवा टिटोवादी कम्युनिझम, राष्ट्रवाद, इस्लामी किंवा ख्रिस्ती सांप्रदायिकता, यांच्या त्या मानानें साध्या सरळ पद्धतींच्यापेक्षां खात्रीनें अधिक श्रेष्ठ प्रयासांची गरज असते.

इतर सर्व आंदोलनांत जें कांहीं घडत असतें,—( ह्याला उदारमतवादाचा सखोल प्रभाव पडलेल्या लोकसत्ताक समाजवादासारखे असलेले अपवाद वगळल्यास ), त्यांच्या विपरीत जनता किंवा कार्यक्रम यांच्या पूर्णतेविषयींचा दावा उदारमतवादी कधींच मांडीत नसतात. त्याशिवाय त्यांचा बहुतेक इतरे-जनांशीं दोन मुख्य बाबींच्या संबंधीं मतभेद आहे ;—(१) प्रत्येक मनुष्यकृत वस्तूची अपूर्णता आणि मर्यादाबंधन यांची जाणीव असल्यामुळें ते आपल्या कल्पना आणि कार्यक्रम यांचा फेरविचार करायला सतत तयार आहेत. (२) **त्यांचा संबंध मुख्यतः त्या साधनांविषयीं असतो**, कीं ज्याच्या द्वारें किमान हालअपेष्टा आणि खडतरपणा सहन करून सततपणानें परिवर्तनाचा क्रम चालत राहूं शकेल. मार्क्सवादी गतिमानता समाजवादाचा अंतिम विजय झाला कीं लय पावेल असें गृहीत धरण्यांत येतें; परतु उदारमतवादी गतिमानता अनंत अखंडित अशी आहे.

आज अमेरिकन राष्ट्र, ज्याच्यावर प्रत्येक गोष्ट अवलंबून आहे, असें उदार-मतवादी समाजाचें केंद्रीय तत्त्व काय असतें, याचें उत्कृष्ट उदाहरण घालून देत आहे. ( याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं आज अमेरिकन राष्ट्रापेक्षां दुसरे अधिक उदारमतवादी समाज नाहींत, अथवा होऊन गेलेले नाहीत; युरोपमधील वायव्ये-कडील दहाबारा राष्ट्रांच्यापेक्षां अधिक अनुदारमतवादित्व अमेरिकेच्या संयुक्त राज्यसंघात आज आहे; याच्या उलट एल्. हार्टझ् यांनी आपल्या " **दि लिबरल**

**ट्रॅडिशन इन अमेरिका** " ( अमेरिकेंतील उदारमतवादी परंपरा ) या पुस्तकात स्पष्टपणें दर्शविल्याप्रमाणें कमीतकमी गेल्या सातआठ पिढ्यांपासून अमेरिकन राष्ट्राला वळण लावण्याच्या कामांत उदारमतवाद ही प्रमुख शक्ति होऊन गेलेली आहे, आणि दक्षिणेंतील वंशवादी, मॅकार्थीवादी, व्यापारी व कामगार नेते अधिकारशाहीकडे झुकूं लागले तरी, उदारमतवादी लोकशाही ही सुधारणा करण्याच्या बाबतीत इतर कोणत्याहि देशांपेक्षां अधिक जोमदार आणि कार्यक्षम आहे. )

" **अमेरिकन कॉंझरवेटिझम्** "—( अमेरिकेंमधील स्थितिनिष्ठता ) या पुस्तकाच्या लेखकानें म्हटल्याप्रमाणें, अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत " अमूर्त गूढ तत्त्वें अर्धधार्मिक श्रद्धा, आणि आर्थिक हेतूदर्शन यांच्या भिन्नभिन्न थाटामाटाच्या रचनां "च्या पलीकडे एखाद्यानें दृष्टि टाकल्यास त्याला भूतकालाचा वर्तमान कालाबरोबर व लोकसंख्येच्या एका विभागाचा दुसऱ्या विभागाबरोबर दुवा जोडणारी एकता दिसून येऊं शकते. ही एकता गतिमान राष्ट्राच्या विकासाला आणि अनेक रूपांतरांना अर्थप्रदान करीत असते, व अलीकडच्या दशकांमधील शांततामय सहजीवनाचें; मग तें सहजीवन दक्षिणेच्या आंतील प्रदेशांत गोरे आणि निग्रो यांचें असो कीं चर्चमध्यें जाणारे धार्मिक आणि नास्तिक पाखंडी यांचे, उद्योगपति आणि कामगार यांचें, राष्ट्रवादी आणि आंतरराष्ट्रवादी यांचें, ओल्डगार्ड रिपब्लिकन्स आणि न्युडीलवाले यांचे असो, व तें कधीं कधीं बऱ्याच मानसिक ताणाच्या परिस्थितींत असो; तरी, त्याचें ती स्पष्टीकरण देत असते.

अमेरिकन राष्ट्र बऱ्याच अंशीं उदारमतवादी स्वप्नाला—विभिन्नगट एकत्र नांदूनहि प्रत्येक गट आपापल्या मार्गानें जाण्याच्या परंतु त्या सर्वांचा आपल्यांत समावेश करून व त्यांना नेमस्त बनवून घेणाऱ्या कार्यपद्धतीचा सर्वसामान्य स्वीकार करण्याच्या स्वप्नाला—साकार करण्याच्या मार्गावर असल्याचें दिसून येतें. **अमेरिकन जीवनांतली मूलभूत एकता ही साध्य नव्हे, परंतु साधनपद्धति होय,** तिच्यापुढें सगळीं साध्यें गौण आहेत. या साधनानें आजपर्यंत अमेरिकन पद्धतीच्या लवचिकपणाबद्दल हमी दिलेली आहे, आणि युरोपांतील कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत एकोणिसाव्या शतकांत अधिक विपुलतेनें असणाऱ्या समाजवादी मंडळांपासून तर वेगवेगळ्या युगांतील व निरनिराळ्या देशांतील धार्मिक अनुभवांच्या समन्वय करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सांप्रदायां-

पर्यंन अगणित प्रयोग करून पाहाण्याची शक्यता मिळवून दिली.

अनेक लेखकांनी या साधनपद्धतीचें विवरण केलेलें आहे. "आमच्याजवळ देऊं करण्यासारखें काय आहे ?" एल्मर डेव्हिसनें **बट वुइ वेअर बॉर्न फ्री** (परंतु आम्ही स्वतंत्र जन्मलेलों होतों) या पुस्तकांत म्हटलें आहे, "केवळ साधन पद्धति," अमेरिकन संस्थांची गुरुकिल्ली कोणती ? 'लोकसंमत सरकार," असें उत्तर स्टिव्हन्सननें "**कॉल टु ग्रेटनेस**" (श्रेष्ठत्वाला आवाहन) मध्यें देऊन टाकलें आहे. राजधानी प्रमाणेंच महाविद्यालयांच्या सभागृहांतून, कार्पोरेशनच्या कार्यालयामधून आणि धर्ममंदिरांच्या मठांतून कार्य करण्याची एक साधनपद्धति असते. लोक टेबलाभोंवतीं बसतात, व चर्चा करतात; ज्यांनी त्यांना पसंत केलें, त्यांचें ते प्रतिनिधित्व करतात; जेव्हां एखादी समस्या उपस्थित होते, तेव्हां ते तिचें विश्लेषण करतात, विविध निरसनांच्या मंडना-खंडनांची तुलना करीत असतात. ते असें म्हणत नाहींत की, "हेंच तेवढें निरसन." तर ते म्हणतात की, "आपण हें निरसन प्रयोगांत आणूं या." तसें करतांना असें धरूनच चालतात की जर तें कार्यक्षम ठरलें नाहीं तर दुसऱ्या एखाद्याचा प्रयोग करून बघतां येईल. निधार्मिक व्यवहारांच्या बाबतीत कोणतेंहि अधिकार प्रामाण्य नसतें व असलें तरी अत्यल्प असतें. पाश्चात्य विचारांवर एक हजार वर्षे प्लेटोच्या विचाराचा वरचष्मा आणि पांचशें वर्षें ऑरिस्टाटलच्या विचारांचा वरचष्मा '**वेदवाक्यवत्**' होता, तद्वतच निष्ठावंत ग्रंथपूजक (मग तो ग्रंथ कोणताहि असो) त्या ग्रंथाला '**अपौरुषेय**' मानत होते, अमेरिकेच्या संयुक्त-राज्यसंघांत जसा वरील गोष्टीचा अभाव आहे, तसाच हेगेलचा तर्कवाद किंवा मार्क्सचा विरोध विकासवाद, यांच्यावर त्यांना गूढ देवता मानून, त्यांचें आंधळें अनुसरण, किंवा बुद्धीच्या ऐवजीं सहजस्फूर्त आणि भावनात्मक अतार्किक गोष्टी-वरील अंधविश्वास यांचा देखील अभाव आहे.

ब्रिटिशांच्या पावलांवर पाऊल टाकून अमेरिकन लोकांनी व्यवहार्य गोष्टींत एखादी कार्यपद्धति निश्चित करण्यावर, (त्यांच्या स्वतःच्या बाबतींत राज्यघटनेवर,) महत्त्वाचा भर दिलेला आहे. तरी पण कुणीहि राज्यघटनेपासून सुरुवात करूं नये. अमेरिकन लोक ज्या प्रमाणांत अजूनहि, शब्दाच्या उचित अर्थानें, **साधनपद्धति** मान्य करतात, त्या प्रमाणांत आज स्वतःराज्यघटना कार्यान्वित होत आहे, तिची मानसिक कार्यपद्धति बिनचूक असल्याची मान्यता १७७४ च्या 'कॉंटिनेंटल

कॉंग्रेस' आणि १७८७ च्या 'कॉंस्टिटयुशनल कन्व्हेंशन' या परिषदांतील बहुतेक सदस्यांनीं दिलेली आहे. १९५६ सालच्या अमेरिकन राष्ट्राचें सार्थ वर्णन करावयाचें झाल्यास, बौद्धिक क्रांतीचा संदर्भ सांगितल्याशिवाय तें शक्य होणार नाही. या क्रांतीचे सर्वश्रेष्ठ कैवारी बेकन, गॅलिलियो, आणि न्यूटन, मिल्ल, पियर्स आणि वुन्ड्ट्—जे मृत आहेत त्यांचाच फक्त उल्लेख केल्यास—हे होते. हें बंड त्या बुद्धिगम्य आणि बुद्धीला अगम्य अशा हटवादी विचारसरणींच्या विरुद्ध होतें, कीं ज्यांच्याकडून बहुधा सद्भावानें कां होईना, परंतु माथेफिरूपणाची, म्हणजेच हिंसेची व क्रौर्याची जोपासना होत असते. ती क्रांति होती, कारण साधनापद्धति ज्यांच्यापुढें गौण होऊं शकल्या असत्या, अशा ध्येयांच्यावर भर देण्याच्या ऐवजीं, त्यांना आवश्यकतेवांचून दडपणाखालीं न ठेवतां, साधनपद्धति पुढें गौण होते. असें करतांना त्या **ध्येयांची** धार बोथट करण्यांत आली, त्यामुळें त्यांच्याकडून होणारी माथेफिरूपणाची, क्रौर्याची व हिंसेची निपज थांबल्यावर त्या एकत्र राहूंच शकल्या नाहींत. ही साधनपद्धति तार्किक, शास्त्रीय, संयुक्त या भिन्न नांवांनीं परिचित झालेली आहे. तिनें विचारांच्या विविध चौकटींची निर्मिती केलेली आहे. कारण ती स्वतंत्र चौकसबुद्धीच्या भोंवती प्रदक्षणा घालीत असते, ती विचार स्वातंत्र्यापासून,—जें सर्वच स्वतंत्रतांचा पाया असते त्याच्यापासून—ढळूं शकत नाहीं, ती सततपणें स्वयंसिद्ध तत्त्वें आणि निष्कर्ष यांच्या विपर्यीच्या सहिष्णुतेपासून ती विभक्त राहूं शकत नाहीं

कांही दिवसांपूर्वी 'प्रुव्हेज" नांवाच्या एका फ्रेंच मासिकांत तुर्कस्तानमधल्या एका पत्रप्रतिनिधीने नजीक पूर्वेतील राष्ट्रांचें आधुनिकीकरणाबद्दलचे आपले विचार व्यक्त केले होते. त्याच्या दृष्टीने प्राथमिकपणे तो प्रश्न तंत्रकुशलतेचा, आणि जुन्या कल्पनांच्या व मूल्यांच्या पायावर उभारलेल्या संस्थांच्या चौकटीच्या अंतर्गत राहणीचें अधिक उच्च जीवनमान व अधिक मोठी कार्यक्षमता यांचा नसून, तो "निरीक्षण, तुलना व समीक्षा" यांच्या पायावर उभारलेल्या वास्तविकपणाकडे जाणाऱ्या वेगळया मार्गाचा आहे. त्याची मनःप्रवृत्ति कांही जेफर्सनपेक्षां निराळी दिसून येत नाहीं. जेफर्सनला असें ठामपणाने वाटत होतें कीं, "व्यवहारज्ञानाला योग्य न्याय देण्यांत आला तर परिस्थितींमध्ये फारसा बिघाड होणार नाही." सुजाणपणाच्या कोंदणांत बसवलेलें हें व्यवहारज्ञान म्हणजे एखाद्याच्या समंजस बुद्धिसामर्थ्याचा हेकेखोर वृत्तीच्या विरहित केलेला

उपयोग होय. या व्यवहारज्ञानानेंच मागील पिढ्यांतील अमेरिकन लोकांना कडक-धर्माचरणी प्युरिटनांच्या दुरभिमानांपासून प्रार्थनासमाजी कांग्रिगेशन संघटनावादाच्या आणि अन्य मंज्ञाक विशाल मनस्कपणापर्यंत प्रवास करण्यास साहाय्य केले आहे, त्यानेंच अजूनपर्यंत तरी धार्मिक अथवा इतर माथेफिरूपणाचीं वारंवार होणारीं आवर्तनें नेहमींच रोखून धरलेलीं आहेत, आणि हेगेलचा व समाजवादाचा सैद्धांतिक दुराग्रहीपणा सामर्थ्यहीन करून, त्यांना रॉइसच्या ध्येयवादाच्या आणि नॉर्मन थामसच्या मानवतावादाच्या स्वरूपांत सौम्य करून टाकलें आहे.

अमेरिकेतील बुद्धिवादी वारंवार आवडीनें म्हणत असतात, "अमेरिकन स्वभावाचें वैशिष्ट्य प्रयोगात्मकता हें आहे....जुनें जग सनातन सत्याला चिकटून राहाण्याकडेंच झुकलेलें आहे." जुन्या जगांतून जर उत्तर अटलांटिक राष्ट्रांना वगळलें, तर तें बरोबर आहे. प्रयोगात्मक स्वभाववैशिष्ट्य (याला कुणीं शास्त्रीय अनुभवज्ञानवाद म्हणतात) हें, ज्याकालीं पूर्णतांच्या (ध्येयांच्या) परस्पर संघर्षाच्या अनिश्चित निष्पत्तीमुळें निश्चित तात्त्विक पद्धतीनीं जखडून ठेवलेलीं कांहीं थोडीं मनें बंधमुक्त झालीं, तेव्हांच्या युरोपांतील सृजनात्मकतेची अभिव्यक्ति होतें. हें प्रयोगात्मक स्वभाववैशिष्ट्य राष्ट्रकुलांतील बहुतेक सर्व राष्ट्रांच्यावर, आणि युरोपांतील डझनभर तरी उदारमतवादी लोकसत्तांच्यावर आपला फार मोठा प्रभाव पाडीत आहे, आणि परिणामी त्यांच्यामध्यें स्वतंत्र संस्थांची उभारणी भरभक्कमपणें झालेली आहे. तथापि, येवढें मात्र खरें कीं या प्रयोगात्मक स्वभाव-वैशिष्ट्याला अमेरिकन राष्ट्रांत युरोपांमधील कोणत्याहि अधिक मोठ्या राष्टांपेक्षां किंवा आशियांतील कोणत्याहि राष्ट्रांपेक्षां अधिक कल्पक मनोभूमि गवसलेली आहे. अमेरिकन मनांच्यावर अर्थातच त्याच्याच एकमेव आंदोलनांचा अधिकार चालत नसतो, परंतु राष्ट्रीय विचारसरणींत प्रतिष्ठेचें स्थान मिळविण्याइतका पुरेसा विस्तृत प्रसार त्याचा झालेला आहे. अमेरिकेच्या संयुक्त राज्यसंघांत किंवा इतरत्र, ज्या प्रमाणांत स्वतंत्र संस्था प्रबल किंवा दुर्बल होतील, त्या प्रमाणांत प्रयोगात्मक स्वभाव वैशिष्ट्याची प्रगति किंवा परागति होईल.

चिनी आणि रशियन लोकांना, बहुतेक स्पॅनियर्ड, डॉमिनिक किंवा अफगाण लोकांना उदारमतवाद समजणें अतिदुष्कर आहे. त्यांच्या देशांत साध्यवस्तूंना, साधन पद्धतींना नव्हे, हेतूंना, मार्गांना नव्हे, महत्त्व देण्याची संवय लोकांना जडलेली आहे. त्या साध्य वस्तू किंवा ते हेतू सत्याशीं एकरूप केलेले असतात,

( हें सत्य मार्क्सनें शोधून काढलेलें किंवा बायबल आणि कुराण यांनीं उघड केलेलें असतें. ) मनुष्यप्राण्यांनीं ज्या इतर असंख्य सत्यांना मान्यता दिलेली आहे, आणि ज्यांच्याकडून मतभेद, पाखंडीपणा, व मार्गभिन्नता यांना कायदेशीरपणा प्राप्त होतो, त्यांच्या बरोबरीच्या दर्जाला हें सत्य नेऊन बसविणाऱ्या साधनपद्धतींना किंवा मार्गांना कांहीं अर्थच उरत नसतो. त्याहिपेक्षां वाईट म्हणजे त्या दुष्ट-प्रवृत्ती असतात. बरीचशी मनुष्यजात अजून देखील, ज्या राष्ट्रांतून आमूलाग्र-पणें राजकीय आणि सामाजिक क्रान्त्या झाल्या तेथें देखील, मतविषयक दुराग्रहां-च्या विरुद्ध बौद्धिक क्रांतीपासून अस्पृष्ट राहिली आहे. त्यांच्या लेखीं स्वतंत्रता ही निरर्थक असते आणि प्रत्यक्ष व्यवहारांत कनफ्युशसच्या सुष्टस्वामीच्या सिद्धांता-पलीकडे त्यांची झेंप जाऊं शकत नाहीं; स्वामिशून्य समाजासंबंधीं ते कल्पनाच करूं शकत नाहींत.

उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रांतील लोकांनासुद्धां स्वतंत्रतेचा अर्थ समजून घेणें नेहमीं बिकट होत असतें. त्यांच्या बाबतींत तो अर्थ समजून घेणें म्हणजे स्वत:लाच समजून घेण्यासारखें आहे. ( या दृष्टिकोणांतून अमेरिकन लोक वायव्य युरोपांतल्या लोकांपेक्षां बहुधा मागासलेले आहेत. ) एखाद्या साध्य वस्तुसाठीं ठामपणानें कार्य करीत राहाणें हें, तिच्यामुळें जेव्हां साधन-पद्धतीला धोका निर्माण होतो, तेव्हां तिचा त्याग करावा लागण्यापेक्षां अधिक सोपें असतें. बऱ्याच देशांमध्यें लोकांना कशासाठीं काम करायचें असतें, स्वर्गांत मोक्षप्राप्ति, पृथ्वीवर मुक्तिसाधन, एखादें राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक साध्य, याची माहिती असते किंवा सांगण्यांत येते, त्यांच्या मतें सर्वच नसले तरी बहुतेक मार्ग,—जे साध्य वस्तूला सन्निध आणू शकतील असे, न्याय्य संगत असतात आणि हें समजण्यासारखें आहे. उदारमतवाद असें मान्य करतो कीं सर्वच साध्यें जोंपर्यंत साधनपद्धतीला धोका निर्माण करीत नाहींत, म्हणजेच जोंपर्यंत ते नेमस्त आणि मर्यादित असतात, तोंपर्यंत त्यांना चालवून घेण्याच्या लायक मानावींत. उदारमतवादी हा इतरांसाठीं कार्य करूं शकतो, स्वत:साठीं करूं शकतो, किंवा मुळींच करात नाहीं; तो अलिप्ततावादी किंवा आंतरराष्ट्रीय-वादी असू शकतो; त्याच्या व्यवस्थेखालीं असलेल्या उत्पादनांच्या साधनाचा उपयोग तो स्वत:च्या विनियोगाची वृद्धि करण्यासाठीं, भांडवलदारी व्यापार-उद्योगांत भाग घेण्यासाठीं, सहकारी तत्त्वावर एखादा धंदा चालविण्यासाठी

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५५२५
क्रमांक ...



किंवा सामुदायिकपणानें एखादा उद्योग उभारण्यासाठीं करूं शकतो, (इंग्लंड किंवा अमेरिका, स्वीडन किंवा फिनलंड यांच्यामधील लोकांना त्यांची इच्छा असल्यास सामुदायिक राहणीबद्दल कोणी प्रतिबंध करूं शकत नाहीं, बरेचसे—उदा०—धार्मिक पंथांचे अनुयायी, तसे राहातात देखील; ) तो भाविकपणानें मंदिरामध्यें जाणारा देवभक्त किंवा निश्चित विश्वासाचा अज्ञेयवादी बनूं शकतो; तो संकटप्रसंगीं स्वखुषीनें लष्करांत दाखल होऊं शकतो किंवा युद्ध वर्ज्य मानणारें एखादें शांतिदल उभारूं शकतो. तो कोणत्याहि उद्दिष्टामागें जावो, जोंपर्यंत तो समाज संघटनेमधील पूर्वोल्लेखित आवश्यक नियमांचा स्वीकार करतो आणि व्यक्तिगत स्वत्त्वाची प्रतिष्ठा नेमस्तपणा व सहिष्णुता यांच्या योगें सांभाळत असतो, तोंपर्यंत तो उदारमतवादी आहे.

हें स्पष्टच आहे कीं उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रें बहुधा वेगवेगळया बऱ्याच गटांत विभागलेलीं आहेत. तीं सगळीं एकत्र—विशेषत: संकटाच्या प्रसंगीं,— मागें अनेक वेळां जशीं आलीं होतीं, तशीं कशीं येऊं शकतील ? उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रांचे नागरिक आपल्या साधनपद्धतीच्या संरक्षणाच्या आवश्यकतेमुळें एकत्र बांधलेले आहेत, ती साधनपद्धतीच केवळ एकटी स्वतंत्रतेला अनुरूप आहे, असा त्यांना विश्वास वाटत असतो. ते आणखी एका वस्तुस्थितीमुळें देखील एकत्र बांधलेले आहेत. सामुदायिकतेला तोंड देण्याच्या समस्यांचे बहुतेक प्रसंगीं स्वतंत्रतेला सामर्थ्यशाली बनवूं शकतील असे उलगडे अत्यल्प असतात किंबहुना उलगडा केवळ एकच असतो. स्वतंत्रतेविषयींची आस्था जर प्रामाणिक असली तर त्याच उलगडयांसंबंधीं लवकर किंवा उशिरां बहुमत मान्यतेचा निर्णय घेतल्यावांचून राहाणार नाहीं. आजच्या महत्त्वाच्या समस्यांचा—वंशवाद, वसाहतवाद, वतनदारी हक्क इत्यादिकांचा—उदारमतवादी उलगडा फक्त एकच आहे. तो म्हणजे विशिष्ट हक्क नष्ट करण्याचा होय.

वर जें कांहीं कथन केलेलें आहे, त्याच्या आधारावर उदारमतवादी लोकशाहीपद्धतीचें अनन्यविशेषलक्षण समजून घेणें फार सोपें आहे. तिचा मुख्य जोर साधनपद्धतीवर असल्यामुळें, इतर सकलांच्या पेक्षां ती भिन्न असते. ती इतर सकलांच्या पेक्षां भिन्न असण्यास आणखी देखील एक कारण आहे. ती परिस्थितीच्या विविधतेला थारा देत असते. त्या विविधतेचा टप्पा ज्या प्रमाणांत वाढत असतो, त्या प्रमाणांत अखंडपणाची जागा नेमस्तपणा आणि दुराग्रहीपणांची जागा सुजाणपणा घेत असतो. तेरावा ग्रेगरी आणि पोबे डोनोस्त्सेव यांची आत्यंतिक सांप्रदायिकता उदारमतवादी लोकशाहीला विसंगत होती, बिडाल्ट

किंवा डिगॅस्पेरी यांची नेमस्त सांप्रदायिकता तशी नव्हती, मार्क्स आणि हिन्डमन यांचा समाजवाद उदारमतवादी लोकशाहीला विसंगत होता; स्पॉक किंवा नेहरू यांचा तसा नाहीं. नासेरचा राष्ट्रवाद उदारलोकशाहीला विसंगत आहे, वोगिवाचा तसा नाहीं, अशी आपण आशा करूं या .

प्रागतिक लोकांच्या मनांतली उदारमतवादी लोकशाही म्हणजे भिन्नता व एकता यांची सांगड होय; मानवी व्यवहाराच्या संचालनांमधून हिंसा व बळजवरी यांचें उच्चाटन करण्यासाठीं मानवी मनानें योजलेली ती कमाल तडजोड होती. तिनें सर्व इतर नव्या जुन्या ध्येयवादातील अद्वैतवादाच्या विरुद्ध संख्यावादाला महत्त्व दिलें होतें. लॉक याला अशी एक व्यवस्था हवी होती कीं जिच्या योगें ग्रेट ब्रिटन मधील पिढ्यानुपिढ्या वितुष्ट असलेल्या धार्मिक व राजकीय गटांना परस्परांवर जोरजुलुम केल्याशिवाय गुण्यागोविंदानें सहवास करतां येणें शक्यप्राय व्हावें. मॅडिसनचा राजकीय सांघिकवाद हा यॅान्की व्यापारी आणि व्हर्जिनियातील मळेवाले, न्यूइंग्लंडमधील कॉंग्रिगेशनवादी संघवादी आणि पेन्सिल्व्हियामधील क्वेकर पंथी (मित्रसमाजी) यांच्या सारख्या भिन्न-भिन्न गटांच्या शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करीत होता. ग्रेट ब्रिटनसाठीं १६८८ च्या क्रांतीमधून उत्स्फूर्त पावलेल्या संस्थांनीं जें कार्य केलें, तसें कार्य फ्रान्ससाठीं करूं शकणाऱ्या संस्था मिराब्यूला हव्या होत्या. डॉल्हमन, गॅगेर्न, आणि काम्पेन्हासन यांच्या लेखीं उदारमतवाद ( ही संज्ञा ते उपयोगांत आणीत होते ) म्हणजे जर्मन कॅथोलिक आणि जर्मन प्रॉटेस्टंट पंथीय लोकसत्ता आणि राजसत्ता, उद्योग धंदे व शेती, यांचें शांततामय सहजीवन होतें. केमाल पाशाला ओटोमन राज्यांत मुसलमान आणि ख्रिस्ती, अरब आणि तुर्क, भटक्या जाती, खेडूत व शहरवासी, यांचें सहजीवन म्हणजे उदारमतवाद वाटत होता.

सर्वत्र क्रांत्या घडवून आणण्याइतका बलशाली असलेला उदारमतवाद फक्त कांहीं थोड्या राष्ट्रांच्या जीवनांतील प्रभावी तत्त्व ( किंवा निदान अत्यंत महत्त्वाचें तत्व तरी ) बनलेला आहे. तथापि त्याचें यश जरी कितीहि मर्यादित असलें, तरी तें केवळ एक मनोराज्य नव्हे, इतकें सिद्ध करण्यापुरतें तें भरीव आहे. उदारमतवादी संख्याबलाच्या दृष्टीनें जरी कितीहि अल्प असले तरी त्यांच्याजवळ सखोल ठाम निश्चयाचें बळ आहे आणि अधिकारवाद्यांच्या कैवाऱ्यांना त्यांच्याच दारीं सामना देण्याचा संकल्प असल्यावर जें पन्नास लक्ष स्वीस आणि एक कोटि ऑस्ट्रेलियन लोकांना शक्य झालें आहे, तेंच सर्व खंडांतील सगळ्या राष्ट्रांना शक्य व्हायलाच पाहिजे.

# उदारमतवादी लोकशाहीचा मार्ग : १० :

आजचे कम्युनिस्ट कालच्या फॅसिस्टांप्रमाणें, आणि परंपरावादी व राष्ट्रवादी यांच्याप्रमाणें, उदारमतवादी लोकशाहीचा तिरस्कार करीत असतात : "स्वतंत्रता आणि प्रगति, मनुष्य जातीचें भवितव्य आणि मानवांची नियति, नेमस्तपणा आणि सोशिकपणा यांच्यावरील सर्वसाधारण शिळया कढीला ऊत आणणाऱ्या शाब्दिक चर्वितचर्वणाचा काय उपयोग ? तात्काळ ज्यांचा उलगडा झाला पाहिजे अशा कितीतरी प्रत्यक्ष समस्यांचें दडपण आमच्या भोंवतीं सर्व बाजूनीं आहे. उदारमतवादी राष्ट्रांत, आणि त्यांच्या नियंत्रणाखालील किंवा यांच्या भक्कम प्रभावाखालीं असलेल्या मुलूखांत सर्वत्र असंतोष, असुरक्षितता आणि अस्थिरता यांचें वातावरण आहे. सूर्यातळीं आपल्याला देखील स्थान मिळावें अशा मागणीची आरोळी ठोकणारीं गुलाम राष्ट्रें व जाती आहेत. असे कांहीं अल्पसंख्याक आहेत कीं ज्यांच्याविरुद्ध पक्षपाताचें वर्तन होत असतें. पिळवणूक, बेकारी, आणि नासधूस यांचें थैमान चाललेलें आहे. इकडे लक्षावधि लोकांच्या हालअपेष्टा चाललेल्या असतांना आणि शांततेला धोका निर्माण झालेला असतांना, तिकडे मेघडंबरीतून आकाशविहार करीत स्वतंत्रतेच्या लाभांचें प्रवचन सांगणारांचा वास्तविकतेबरोबर जरा देखील संपर्क असत नाहीं."

आपण उदारमतवादी लोकसत्ताक देशांत राहाणारांनीं स्वतःशीं प्रांजळ बनायलाच हवें. उदारमतवाद्यांनीं आणि गेल्या शतकांतील उदारमतवादी लोकशाहीच्या पदाक्रमांमुळें ज्यांना लाभ घडला त्यांनीं विशेषतः उत्तर अटलांटिक राष्ट्रांतील व्यापारी जमातीनीं जर सभोंवतीं जें घडत होतें त्यांच्याकडे अधिक लक्ष दिलें असतें, तर आज मनुष्यजातीच्या एक तृतियांश भागावर असलेला कम्युनिस्ट साम्राज्याचा विळखा आणि अन्यत्र अधिकारवादी राष्ट्रवाद आणि परंपरावाद यांचा वाढता जोर यांना तोंड देण्याचा प्रसंग संभवतः आपल्यावर आला देखील नसता आपल्याला बघायला लोचनें आणि विचार करण्यासाठीं मनें दिलेलीं आहेत; त्या दोहोंपैकीं कशाचाहि उपयोग, ज्यांच्या हातीं जीर्ण कुंठित संस्कृतींना स्वतंत्रतेनें छिन्न-भिन्न केल्यापासून मानवीशक्तींच्या बंधमुक्ततेची सोबत करणाऱ्या दुःखव्यथांचें सांत्वन करण्याचा अधिकार होता, (आणि आज

देखील कांहीं राष्ट्रांतून आहे ) त्यांनीं केलेला नाहीं. समस्या अस्तित्वांत आहेतच, आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें व एरंडेलाला मद्य आणि कडू कोयनेलाला साखर मानून घेण्यासारखी आत्मवंचना करणें, पोरकटपणाचें आहे. पिळवणूक, उपासमार आणि अशाश्वति या होत्या आणि आजहि आहेत. अर्थातच त्यांचें प्रमाण पाश्चिमात्य मानवसुधारणा आपल्या उदारमतवादी अवस्थेमध्यें, परंतु एक महत्त्वाचा फरक राखून (न्याय मध्यस्त) मानवी सुधारणा बनली, त्याच्या आधीं-पेक्षां कमी आहे. परतंत्र समाजांत दुष्ट गोष्टींचें सापेक्षपणें फारसें महत्त्व वाटत नसतें, कारण (अ) ज्यांना दुःख कष्ट भोगावे लागतें त्यांना सामना देण्यासाठीं बाहेर येणें व स्वतःची कत्तल करून घेणें आणि तसें करण्याची फारच थोडयांची हिंमत असते) याशिवाय अन्य कांहीहि करतां येणें शक्य नसतें, (ब) आणि कारण लोक सामान्यतः ज्याला आवश्यक दुष्ट गोष्टी मानीत असतात त्यांच्याशीं जुळवून घेतात व स्वतः त्यांच्या पुढें शरणागति पत्करतात. स्वतंत्रतेच्या अवस्थांमध्यें त्यावर पृष्ठभागीं येतात, लोकांना त्यांची जाणीव असते, आणि त्यांचा बंदोबस्त करण्यांत येतोच.

पन्नास वर्षापूर्वी बहुतेक सर्व राष्ट्रांना आणि लोकांना ज्याच्या प्रभावाची अनुभूति येऊं शकली होती, त्या उदारमतवादानें मनुष्याला मार्गदर्शन करणाऱ्या सुज्ञपणाची आणि स्वतःच्या जीवनांची रचना करण्यांत व समाजला संघटित करण्यांत नागरिकांच्या सक्रीय भागीदारीची स्वयंसिद्ध भूमिका घेतलेली होती. सर्वच तऱ्हेच्या अगणित समस्या होत्या, आणि सुमारें एक शतकापूर्वी, त्यांचें निराकरण करण्याच्या बाबतींत उदामतवादीच अग्रेसर होते. बलप्रयोग करणें जेव्हां आवश्यक वाटलें तेव्हां त्यांनीं बलप्रयोग केले होते. इंगलंडमधल्या व्हिग पक्षानें १६८८ मध्यें, लिंकनच्या रिपब्लिकन पक्षानें १८६१ मध्यें आणि थायर्सवगॅम्वेट्टा यांच्या फ्रेंच अनुयायांनीं १८७१ मध्यें तसे बलप्रयोग केले देखील होते. भूमध्य-सागरांतील आणि चिनी समुद्रांतील चांचेगिरीची आपत्ति समूळ नष्ट करण्या-साठीं, आणि आफ्रिका व मध्यपूर्व यांच्यामधील गुलामगिरीच्या प्रथेचा अंत करण्या-साठीं बलप्रयोग करण्यांत आले होते. देशांमागून देशांत असंख्य क्रान्त्यांच्या द्वारें स्वातंत्र्यमूलक संस्था अशाच रीतीनें स्थापन केल्या होत्या किंवा तसे प्रयत्न केले होते. उदारमतवाद्यांनीं राजकीय व आर्थिक पद्धती, विद्यालयें, न्यायाधीश मंडळें धर्मसंस्था यांच्यांत सुधारणा घडवून आणल्या. त्यानी सुधारणांच्या साठीं जिहाद

पुकारल्या, आणि त्यांनीं झुंज दिली.

तदनंतर अनेक राष्ट्रांमध्यें जडता ही उदारमतवाद्यांच्या प्रवृत्तीची गुरुकिल्ली बनली. विशाल प्रवाहाचा एक ओहोळ बनला. कित्येकांचें त्यांनीं जें कांहीं प्राप्त करून घेतलें, त्यांच्यामुळें समाधान झालें, आणि जी स्वतंत्रता त्यांना स्वत:साठी हवीशी झालेली होती, तिच्यांत इतरांना वाटेकरी होऊं देण्याची त्यांची मुळींदेखील इच्छा नव्हती. बंधमुक्तीमुळें मानवी उत्साहांच्या ज्या शक्ति अस्तित्वांत आलेल्या होत्या, त्यांच्या विषयीं आणि परतंत्र बहुजनसमाज व परतंत्र लोक यांच्या वाढत्या बंडखोरीमुळें ते भयाकुल झालेले होते; त्याचप्रमाणें मानवी प्रगतींच्या यंत्रवत् दृष्टिकोणांमुळें स्वतंत्रता निरर्थक बनलेली होती, त्याच्या विषारी मोहनीनें इतर उदारमतवादी भारून गेलेले होते. वास्तविक पाहातां ते स्थितिनिष्ठ बनलेले होते, ब्रिटनमध्यें उदारमतवाद्यांचे लोंढ्यामागून लोंढे टोरी पक्षाला येऊन मिळाल्यानें तसें घडून आलें होतें; अमेरिकेंतील बहुतेक रिपब्लिकनांच्या बाबतींत आणि युरोपमध्यें जे गेलीं पन्नास वर्षें केवळ नाममात्र उदारमतवादी उरलेले होते, त्यांच्या बाबतींत घडून आलेलें होतें. उदारमतवाद्यांच्या बाबतींत तुर्कस्तान व अर्जेंटिना, इजिप्त व जपान या एकमेकांपासून खूप अंतर असणाऱ्या देशांत असेंच घडून आलें. इटालींत १९२२ मध्यें, जपानमध्यें १९३२ सालीं, जर्मनींत १९३३ मध्यें, फ्रान्समध्यें १९४० सालांत, अर्जेंटिनांत १९४३ मध्यें जेव्हां कठिण प्रसंग उद्भवले, तेव्हां त्यांच्याजवळ जो कांहीं अल्पस्वल्प उदारमतवाद शिल्लक उरलेला होता, त्याचा स्वतंत्रतेच्या अधिकारवादी आणि एकतंत्रवादी वैऱ्यांच्या उजव्या गटांशीं हात मिळवणी करून त्यांनी विश्वासघात केला होता.

समाजवाद्यांनीं सुधारणांच्या चळवळी ताब्यांत घेतल्या. मानवसमाजांच्या बंधमुक्तीमुळें निर्माण झालेल्या समस्यांची त्यांना पूर्ण जाणीव होती, परंतु जी स्वतंत्रतेची जाणीव त्यांच्यापैकीं कांहीं जणांना आतां अधिक अलीकडे व्यथितपणानें झालेली आहे आणि जी उदारमतवादाची नजरेंत भरणारी विशिष्ट खूण आहे, त्या स्वतंत्रतेच्या जाणीवेचा त्यांच्याकडे अभाव होता. उदारमतवादामुळें लाभलेल्या मर्यादित फायद्यांविषयीं तिरस्कार उत्पन्न करणारा प्रचार केला, व्यक्तिगत स्वयंशासनाचा हक्क त्यांनीं अमान्य केला, आणि लोकांना मार्गदर्शनाची, पोषणाची, आश्रयाची कायमची आवश्यकता आहे, अशी आपली

समजूत त्यांनीं करून घेतली. त्यांनीं सामुदायवादाचा उदोउदो केला आणि श्रमजीवी लोकांच्या स्वतंत्रतेच्या अभावावर बोट ठेवल्यानंतर सगळया नागरिकांना श्रमजीवी बनविण्यासाठीं त्यांनीं प्रारंभ केला. त्यांनीं पूर्णतः समतोल आणि पूर्णतः स्थिर अशा समजाबद्दल, एखादा कनवाळू पिता आपल्या संततीचें हित ज्या दक्षतेनें पाळील, अशा कनवाळू राज्याचें ( मावाप सरकारचें ) स्वप्न उराशीं बाळगलेलें होतें. त्यांनीं व्यक्तीला यंत्राच्या चाकाच्या दांत्याइतकें स्थान ( महत्त्व ) दिलें. आकांक्षा, जाणीव, आणि बुद्धि यांच्यावर यंत्राची सत्ता असते, दांत्यांची नव्हे. समाजवाद्यांच्या रचनापद्धतींत स्वतंत्रतेला कसें महत्त्वशून्य लेखण्यांत येत होतें याची शॉनें केलेली टवाळी या संबंधींची निदर्शक होती. ते बहुजनसमाजांत यशस्वी झाले होते. कां ? कारण त्यांच्याजवळ वाढत्या स्वातंत्र्यानें घातलेल्या पेंचाचें व समस्यांचें एक उत्तर होतें. त्यांचीं मनें जरी प्रमादी बनलेलीं होतीं, तरी त्यांचीं अंतःकरणें योग्य ठिकाणावरच होतीं. त्यांनीं उदारमतवादाला दुर्बल बनविलें. पंचवीस तीस वर्षांपूर्वी अनेक देशांत ते मोक्याच्या जागीं होते. जेथें त्यांना अपयश आलें, तेथें त्यांच्या अनुयायांनीं कम्युनिस्टांच्या वळचणींचा आश्रय घेतला, आणि उदारमतवाद्यांनीं ज्या समस्यांच्याकडे दुर्लक्ष्य केलें होतें, त्यांचा उलगडा करण्याचें अभिवचन कम्युनिस्टांनीं देऊन परतफेड केली.

अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत आणि कॅनडांत उदारमतवाद्यांनीं (संयुक्तराज्यात मुख्यत्वेंकरून उत्तरेकडील डेमोक्रॅट्स व पूर्वेकडील रिपब्लिकन यांच्यांत आढळणाऱ्या ) स्थितिनिष्ठतेपासून स्वतःला अलिप्त राखलें आणि वेळींच आपली जडता झुगारून देऊन आपल्याला कमजोर बनवूं पाहाणाऱ्या समाजवादाच्या विकासाला ते आळा घालूं शकले. कित्येक युरोपियन राष्ट्रांतून आणि राष्ट्रकुलांमधील देशांतून पुरेशा उदारमतवाद्यांनी मजूर आणि सोशल डेमोक्रॅटिक पक्षांतील केवळ सिद्धांतवादी नसणाऱ्या समाजवाद्यांबरोबर हात मिळवणी केल्यानें त्यांच्या विचारसरणीवर जरी परिणाम झाला नसला तरी पण त्यांच्या धोरणांच्यावर नक्कीच झालेला आहे. स्वतंत्रता आणि लोकसत्ता यांच्या समस्यांचा प्रतिक्षेप करतांना, पूर्व आणि पश्चिम युरोपांमधील समाजवादी प्रयोगांचें मूल्य जोखतांना, अनेक, संभवतः बहुतेक सगळेच सोशल डेमॉक्रॅटस् हे समाजवादापासून दूर सरकले आणि वाटचाल करीत उदारमतवादाकडे

येऊन पोंहचले, त्यांना •उदारमतवादी लोकशाहीची जागा भरून काढण्यासाठीं समाजवादी लोकशाही, तिला कशाची तरी जोड दिल्याशिवाय, अत:पर पात्र आहे असें वाटत नाहीं, त्याचें लक्ष्य उदारमतवादाला सुसंपन्न करण्याचें आहे, त्याचा नाश करणें नव्हे. समाजवादी लोकशाहीवाद्यांनीं आपली वाटचाल सुरूं ठेवलेली असतांनाच, स्वत: शोधून काढलें आहे कीं ज्या सुधारकी उत्साहानें एके काळीं क्रांतिकारक उदारमतवादी प्रेरित झाले होते, त्यानेंच केवळ उदारमतवादी लोकशाहीला सामर्थ्यशाली करतां येणें शक्य आहे.

आजच्या समस्या या दोन किंवा तीन शतकांपूर्वीच्या समस्यांच्या समान नाहींत. उदारमतवादाच्या गाभ्याच्या घटकांसंबंधीं जर एखाद्याला स्पष्ट जाणीव झाली तर त्यांना स्वतंत्रतेच्या चैतन्यात्मकतेनें त्या समस्यांचें निराकारण करतां येणें शक्य असतें. उदारमतवादी निराकरणाला दोन मर्यादा आहेत. उदारमतवादी धरातलांवर नंदनवनें आणण्याचें अभिवचन देण्यास नकार देतात, कारण त्यांना मनुष्यस्वभावाच्या अपूर्णतेची जाणीव आहे; ज्या कुणाला आपल्या मन:शांती-प्रीत्यर्थ भूवरील स्वर्गांची आवश्यकता प्रतीत होत असेल, त्यानें तो अन्यत्र धुंडाळावा. दुसरी म्हणजे उदारमतवादी कोणतेंहि निराकारण अंतिम आहे, असें मानण्यास नकार देतात; प्रत्येक गोष्ट एक प्रयोग आहे; जर तो फसला तर दुसरा एखादा प्रयोग करून पाहातां येणें शक्य आहे; भ्रमण करणाऱ्या या जगांत त्रैलोक्यचिंतामणी असत नाहींत. हे असले धरेवरील नंदनवनें आणि त्रैलोक्य-चिंतामणी कम्युनिस्ट व फॅसिस्ट यांच्या ताब्यांत आहेत, आणि त्याचबरोबर त्यांच्या ताब्यांत पोलिस, गोळीबार करणाऱ्या टोळया, व बंदिस्तांच्या छावण्या देखील असतात. या सर्वांची गरज लोकांना कह्यांत ठेवण्यासाठीं आणि ज्या लोक-विलक्षण मृगजळांतील नौकांची आशा दाखवून त्यांना भूल पाडण्यांत आली होती. त्यांचें काय झालें, हें विचारण्यास प्रतिबंध करण्यासाठीं लागत असते.

समस्या असंख्य आहेत; सध्यां त्यांचे जे विशेषत: चार लक्षणीय गट आहेत, ते असे :—सामाजिक अशांतता, वासाहतिक क्रांति, आंतरराष्ट्रीय असंतोष व ताण, आणि स्वतंत्रता प्रधान संस्थांना धोका निर्माण करूं पाहाणाऱ्या कम्युनिझम व इतर चळवळींविरुद्ध काय करावें या संबंधींचा विचार उदारमतवादी लोक-शाहीची शाश्वति मुख्यत: या समस्यांचें निराकरण स्वतंत्रेच्या चैतन्यात्मकतेनें,—म्हणजेच आधीं नमूद केलें त्या प्रमाणें. राष्ट्रांच्या अंतर्गत व राष्ट्रांराष्ट्रांच्या

मध्यें अत्यंत मोठी समानता असण्याच्या दृष्टीनें करण्याच्या योग्यतेवर अवलंबून आहे

अटलांटिक महासागराच्या दोन्ही बाजूंकडील प्रदेशांत स्थितिनिष्ठवादी असें समर्थन करीत आहेत कीं लोकांनीं तथाकथित स्वतंत्र औद्योगिक साहसांच्यामुळे जें उत्पादन होतें, त्यांत समाधान मानून घ्यावें, आर्थिक अस्थिरता आणि असुरक्षितता यांच्यामुळें निर्माण झालेल्या विकट स्थितीविषयीं मनाला लावून घेऊं नये, आणि अलीकडील पिढ्यांत झालेल्या आर्थिक घडामोडींमुळें निर्माण झालेल्या बेकारी, मक्तेदाऱ्या आणि अन्य तत्सम अप्रिय गोष्टी यांचा संभव निसर्गाच्या नियमांतून झाल्याकारणानें त्यांच्यापासून अलिप्त असावें. लोकांनीं समाधान मानून घ्यावें किंवा घेऊं नये; बेकारी, मक्तेदाऱ्या आणि नासधूस यांचा संभव निसर्गाच्या नियमांपासून झालेला आहे किंवा नाहीं, हें सर्व मुद्याला सोडून आहे; खूपच अधिक लोक असंतुष्ट आहेत आणि त्यांच्या मनांवर खूप ताण पडत आहे, म्हणून अशांतता आहे; आपण जर स्वयंसत्ताक आकांक्षेची देणगी प्राप्त झालेले बुद्धिमान् प्राणी आहोंत, बाहुलीं नव्हेत, तर आम्हांला जेव्हां दुष्टता-पाप आढळून येतें, तेव्हां आम्ही त्याच्याशीं झुंझायला सिद्ध असलेंच पाहिजे.

व्यापार उद्योगाच्या अनुल्लंघनीयतेमुळें अंध झालेल्या स्थितिनिष्ठांनीं एखाद्या गुलाम राष्ट्रांत अर्थव्यवस्थेचें स्वातंत्र्य अस्तित्वांत असूं शकत नाहीं, हें दृष्टोत्पत्तीस न आल्यामुळें भांडवलदारी पद्धतींत सुधारणा घडविण्यास, अगदीं एखाद्या मामुली दुरुस्तीची गरज स्वतंत्र राजकीय संस्थाच्या रक्षणांसाठीं भासली तरी, फारच वारंवार नकार दिलेला आहे. परंपरावादी आणि राष्ट्रवादी अजूनहि सांधिकवाद नववाणिज्यवाद आणि राज्यभांडवलवाद यांच्याविषयी प्रयोग करुन पाहात आहेत. कम्युनिस्ट आणि बहुतेक सिद्धांतवादी समाजवादी भांडवलशाहीचें जागीं अखंड सामुदायिकतेला स्थानापन्न करूं इच्छितात. उदारमतवादी सामुदायिकतेला वाटण्याच्या अक्षता देतात, याचें कारण ती स्वतंत्रतेला विसदृश असते, ते खासगी अर्थव्यवस्थेच्या लाभांना आणि राज्यव्यवस्थेपासून अर्थव्यवस्था वेगळी राखण्याच्या आवश्यकतेला मान्यता देतात. जोंपर्यंत समस्या उपस्थितच होत नसतात, तोंपर्यंत सार्वजनिक अधिकाऱ्यांना-सरकारला-हस्तक्षेप करण्याचें कारण नसतें; परंतु त्या उपस्थित झाल्या आणि राज्याच्या उपाय योजनेवांचून त्यांचें समाधान न झालें,

तर हस्तक्षेप आवश्यक होत असतो, मात्र समाजवाद्यांना जसें वाटतें त्याच्या विरोधांत, येवढें लक्षांत ठेवावें लागतें, कीं हस्तक्षेपांत अनेक वैगुण्यें असतात, आणि समुदायात्मक व वाणिज्यात्मक या दोन्ही संबंधींचीं धोरणें स्थाणुत्वाकडे नेणारीं असतात.

स्वतंत्रता आणि नागरिकांच्या मध्यें सत्तेची समान वांटणी यांच्यामध्यें असलेल्या निकट संबंधांकडे उदारमतवादी कधींच दुर्लक्ष करूं शकत नाहींत. जर आर्थिक सत्तेची वांटणी खूपच विषम असली (बहुतेक खंडांमधील बऱ्याच देशांत तीं आज तशी आहे) तर स्वतंत्रता अवघडल्यासारखी, अशक्य होत असते, किंवा निदान तिला धोका तरी निर्माण होत असतो. आर्थिक सत्तेची अनेक मूलतत्त्वें असतात, परंतु त्यांत मालमत्तेला अग्रहक्क मिळत असतो, आणि ज्याप्रमाणें राजकीय सत्तेची वांटणी मताधिकारचे द्वारां होते, बौद्धिक सत्तेची वांटणी सार्वत्रिक शिक्षणाचे द्वारां होते, त्याचप्रमाणें आर्थिक सत्तेची उत्कृष्ट वांटणी मालमत्तेच्या वितरणाद्वारां होत असते. या बाबतींत फार थोडया राष्ट्रांनीं इतर राष्ट्रापेक्षां अधिक प्रगति केलेली आहे. अमेरिकेच्या संयुक्त राज्यांमधील सर्व कुटुंबांच्या संख्येपैकीं एकतृतीयांशापेक्षां अधिकांचे, संभवतः उत्पादनाच्या साधनावरील मालकी हक्कांत वाटे आहेत, आणि तितक्याच संख्येपेक्षां अधिक असणारांच्या ताब्यांत त्यांना विचारणीय आर्थिक सुरक्षितता लाभण्याइतपत क्रयनिधि आहे. राष्ट्रकुलांमधील निदान तीन देशांमध्येंतरी, आणि तसेंच फ्रान्स व युरोपमधील कांहीं लहान लोकसत्ता यांच्यांत मालकी हक्काचें वितरण अत्यंत विस्तृत प्रमाणांत झालेलें आहे. जेथें कुठें कांहीं थोडया लोकांच्या हातीं प्रमाणाबाहेर फाजील मालमत्ता केंद्रित होण्याची प्रवृत्ति असते तेथें आर्थिक पद्धतीच्या कार्यक्षमतेमध्यें बिघाड उत्पन्न झाला तरी हस्तक्षेपाची आवश्यकता असते. प्राप्तीवरील कर, भांडवलावर जकाती, मृत्यूकर, मरणोत्तर मालकी, जमिनीच्या हक्काचें विलीनीकरण, अधिक वेतनश्रेणी हे सर्व आर्थिक सत्तेची समान वांटणी कायम राखण्याच्या साध्याचे मार्ग होत; त्याच्या योगानें स्वतंत्र संस्था मजबूत करण्याव्यतिरिक्त, नागरिकांचें बाजारांत आणि मजूरीचे दर ठरविण्याच्या कार्यपद्धतींत अधिक समानतेनें भाग घेणें शक्यप्राय होत असतें.

एकोणिसाव्या शतकाच्या अंतापासून सर्व देशांतून, जे उदारमतवादी स्थितिनिष्ठतेच्या भोंवऱ्यांत सांपडलेले नव्हते, त्यांनीं स्वतंत्र राष्ट्रांत खासगी अर्थव्यवस्थांना शाश्वति लाभून देणाऱ्या सुधारणांचें समर्थन केलेलें आहे. धनकुबेर पेढीवाले आणि उद्योगपति, त्यांच्या व्यवहारांचा संबंध संपूर्ण पद्धतीशीं

जुळवून देण्यास असमर्थ असल्यामुळें, जें व्यापारचक्र त्यांना इतराप्रमाणेंच हानिकारक होतें, त्याचा आपल्यापरीनें नाश करण्यास ते असमर्थ ठरले; त्यामुळें जमेच्या बाजूवर नियंत्रणें बसविण्याशिवाय आणि लोकसंख्येच्या बऱ्याच मोठ्या विभागाची क्रयशक्ति सरकारी उपाययोजनेनें वाढविण्याशिवाय अधिक काय करतां येणें शक्य होतें ? असें आढळून आलें होतें कीं भावांच्या चढउतारांचें फाजील प्रमाणांवर मर्यादा घालण्याच्या दृष्टीनें सार्वजनिक मालकीच्या अर्थव्यवस्थेच्या विभागाबरोबर खासगी मालकीच्या अर्थव्यवस्थेला कह्यांत ठेवणें अत्यंत महत्त्वाचें होतें. मालकांना बेकारीची समस्या उलगडतां येणें शक्य झालेलें नव्हतें; मिळूं शकत असलेल्या कामगारांच्या संघाची गरज भासली हजारों कामगारांच्यावर आळशीपणाच्या नैतिक मरणाचा प्रसंग मालकांनीं आणला; सार्वजनिक कामें सुरू करण्याच्या स्वरूपांत आणि कामगारांच्या (ट्रेड युनियन) संघांना महत्त्वाचे हक्क देण्याच्या स्वरूपांत हस्तक्षेप आवश्यक होता. आजारपण, अपघात, म्हातारपण इत्यादिकांपासून कामगारांना संरक्षण मिळवून देण्यासाठीं राष्ट्रीय विमा योजनांची तरफदारी करण्यांत आली होती. जेथें कुठें जमीन मालक झटपट श्रीमंत होण्यासाठीं अंमलांत आणणाऱ्या पद्धतींनीं आपल्या जमिनीचा कस नष्ट करून टाकीत होते, तेथें नवे कायदे करण्यांत आले होते. भांडवलदारांना भाव ठरविणारे व्यापारी संघ, विश्वस्तसंस्था आणि मक्तेदारी यांची आवड होती; यांचा शेवट गिऱ्हाइकांना नाडविण्यानेंच होत असे; त्यांना छिन्नभिन्न न करतां आल्यामुळें, त्यांना पार्लमेंटच्या नियंत्रणांखालीं आणावें लागलें होतें. उद्योगधंदेवाले आणि अर्थशास्त्रज्ञ यांनीं निषेधाचे नगारे वाजविले; त्यांना सामुदायिकता पसंत आहे काय ? त्यांना जर अर्थविषयक कायदे नको होते, तर त्यांनीं कांहींसें स्थैर्य आणि कांहींसा सुरक्षितपणा तरी आणून देण्याचें कार्य करायला हवें होतें.

आज ब्रिटनमध्यें स्वतंत्र उद्योगधंदे जरा दुर्बल झालेले आहेत, जर लॉइड जॉर्ज यांच्या सुधारणा अस्तित्वांत आल्या नसत्या, तर ते समूळ नष्ट झाले असते. अमेरिकेंत स्वतंत्र उद्योगधंदे भरभराटीला आलेले आहेत, याबद्दल अमेरिकेंतील राज्यकारभार खात्याचे योग्य कायदे करून अर्थव्यवस्था स्वतंत्र राखण्यासंबंधीं सतत प्रयत्नशील असल्याबद्दल आभार मानले पाहिजेत. स्वतंत्रतेच्या दृष्टिकोनांतून भांडवलशाही किंवा उद्योगधंद्याचें स्वतंत्र साहस हीं इतर पद्धतींच्यापेक्षां अधिक पसंत करण्यायोग्य असतात, याचें कारण त्या अर्थव्यवस्थेला राज्यसत्तेपासून भिन्न राखतात, मालमत्तेच्या वितरणांच्या द्वारां व्यक्तीची स्वाधीनता

सामर्थ्यशाली बनवीत असतात, आणि नागरिकाला आपल्या आर्थिक संकटमुक्ती-साठीं—संपन्नतेसाठीं—श्रम करण्याची योग्यता देत असतात. आतां अवनतीच्या क्रियेला अटकाव करण्यांत आल्यामुळें पुनश्च त्यांच्याकडून स्वतंत्रता आणि उदारमतवादी लोकशाही यांना उन्नत करण्याबाबतींत उपयुक्त भूमिका घडूं शकेल.

भांडवलशाही अधिक पसंत करण्यायोग्य आहे असें म्हणून एखाद्यानें तिच्या दोषांकडे दुर्लक्ष करतां कामां नये. तसेंच एकटी भांडवलशाहीच काय ती स्वतंत्रतेला अनुरूप असते, असेंहि दुराग्रही प्रतिपादन करीत त्यानें बसूं नये. आमच्या विचारसरणींतील वाढत्या दुराग्रहीपणाच्या फलितांपैकीं एक म्हणजे देशांत फक्त एकाच अर्थव्यवस्थेला स्थान असूं शकतें, अशी विलक्षण समजूत होय. कॅनडांतील आणि न्युझीलँडमधील लोकांनीं, तसेंच स्वित्झर्लंड व स्कॅन्डी-नेव्हिया यांच्यामधील लोकांनीं भांडवलशाही, सहकारी मालकी, आणि सार्वजनिक मालकी यांचें संमिश्रण करण्याबाबतींत फारच चांगली कामगिरी बजावलेली आहे. अमेरिकेंमधील उद्योगधंद्याचें स्वतंत्र साहस संयुक्त राज्यांतील शेतकऱ्यांना वाणिज्यवाद पसंत असल्याच्या (किंवा राज्यसत्तेकडून मदत घ्यावी लागत असल्याच्या) वस्तुस्थितिमुळें दुबळें झालें नाहीं. जर भांडवलशाही पूर्व काळांतील जमीन किंवा कारागिरी यांच्या आर्थिक पद्धतींचीं स्वरूपें शाश्वत राहूं शकत असतील तर,—उदाहरणार्थ फ्रान्सच्या बाबतींत,—तीं नष्ट करण्याचें कांहीहि कारण नाहीं. खासगी हितसंबंधांपेक्षां अधिक फायदेशीर होत असतील तर तशा उपयुक्त फायद्यांच्या गोष्टी म्युनिसिपालिटीनें आपल्या मालकीच्या करायला कोणताहि प्रत्यवाय नाहीं. जेथें खाजगी उपक्रम रेंगाळू लागतो, तेथें सार्वजनिक उपक्रम उपयुक्त भूमिकेनें जागा भरून काढतो.

माणसांच्या अनुभवाच्या आधारें असें दिसतें कीं स्वतंत्रतेला मालमत्तेची खासगी मालकी आणि तिचा मालकाला रास्त उपयोग करण्याची मुभा यांची गरज आहे. आधुनिक काळांत निःसंशयपणें स्वतंत्रता आणि स्पर्धाशील भांडवलशाही किंवा उद्योगधंद्यांचें स्वतंत्र साहस यांच्यांत अन्योन्य संबंध प्रस्थापित झालेला आहे, दुसरीकडे भांडवलशाहीची संपूर्ण मक्तेदारी आतां फॅसिस्टांच्या संघवादा-पेक्षां किंवा सामुदायिकतेपेक्षां स्वतंत्रतेशीं अधिक अनुरूप होत नाहीं. आर्थिक स्वाधीनता म्हणजे संपत्तीच्या खासगी स्वामित्वाव्यतिरिक्त अशी एक रचना-पद्धति कीं जिच्यांत अंतर्गत प्रयोग करून पाहाण्यासाठीं वाव मिळूं शकतो

आणि जिच्यांत कुणालाहि त्याच्या सार्वजनिक किंवा खासगी मालकाच्या बंधनांत राहावें लागत नसतें ती होय.

उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रांच्या ताब्यांतील दर्यापार परावलंबी प्रदेशांत झालेलीं आंदोलनें आणि त्यांना विविध मातृदेशांतून वसाहतवादाच्या विरोधकांकडून प्राप्त झालेलें साहाय्य, यांच्यामुळें परिणामत: अगोदरच वीस राष्ट्रें स्वतंत्र झालेलीं आहेत; पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक युद्धांत अधिकारवादी राज्यसत्तांचे उदारमतवादी लोकसत्तांनीं जे पराभव केले, त्यामुळें आणखी सहा राष्ट्रांना स्वातंत्र्याकडे वाटचाल करतां आली, आणि आतां १९५७ ते १९६० च्या दरम्यान पांच परावलंबी प्रदेशांना स्वातंत्र्य मिळणार आहे, (त्याशिवाय अन्य परावलंबी प्रदेशांच्या बाबतींत अजून कांहींहि संकेत ठरविण्यांत आलेला नाहीं तें वेगळेंच.) एकंदर एकतीस देशाची ही अशी बेरीज होते. बऱ्याच देशांच्या बाबतींत कसलीहि हिंसा न घडतां स्वातंत्र्य प्राप्त करून घेता आलें होतें, (फिलिपाइन्स आणि सिलोन यांच्या बाबतींत असें घडलें, आणि गोल्ड-कोस्ट, नायगेरिया व ब्रिटिश वेस्ट-इंडीज यांच्यामध्यें असें घडून येत आहे;) अन्यत्र जरा हिंसा घडली खरी; कांहीं थोड्या बाबतींत घडलेल्या हिंसेचें प्रमाण हें उदारमतवादी लोकशाहीच्या आणि मातृदेशांतील उदारमतवादी परंपरेच्या दुर्बलतेवर किंवा सामर्थ्यावर अवलंबून होतें. तथाकथित पाश्चिमात्य वसाहतवाद आतां क्षीण होत चालला आहे आतां एकतंत्री देशांचा, विशेषत: सोव्हियत युनियन आणि चीन यांचा वसाहतवाद विचार करण्याच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचा आहे. राष्ट्रवादी पहिल्या प्रकारच्या वसाहतवादाविषयींच फक्त चिंतातुर झालेले दिसतात, तो अगोदरच आफ्रिकेच्या दोन तृतीयांश प्रदेशांपुरता मर्यादित झालेला आहे. उदारमतवादी दोन्ही प्रकारच्या वसाहतवादाबद्दल चिंता व्यक्त करीत आहेत.

उदारमतवाद्यांचें वसाहतविषयक धोरण परतंत्र प्रदेशांमधील नागरिकांनीं वाढत्या प्रमाणांत निवडणुकांच्या द्वारें अणि अधिकारपदीं प्रवेश मिळवून सार्वजनिक कारभार चालविण्याच्या कामांत भाग घेतलाच पाहिजे, अशा प्रकारचें आहे; केवळ सिद्धांताची संस्था नव्हे, विवेचक शक्तींना वळण लावणाऱ्या, मोठ्या प्रमाणांत ज्ञानाच्या पिचकाऱ्या टोंचणें नव्हे, परंतु बुद्धीचा विकास करणाऱ्या शिक्षणाचें वितरण म्हणजे हें धोरण होय; सार्वजनिक अधिकाऱ्यांच्याकडून किंवा खासगी हितसंबंधांच्या द्वारें जो महसूल गोळा झाला, तो परतंत्र प्रदेशांतील

रहिवाशांच्याच केवळ हितार्थ तेथेंच गुंतवून टाकणें, म्हणजेच हें धोरण होय. हें सगळें करतांना एक अशी स्पष्ट दृष्टि असावी कीं तेथील रहिवासी स्वतंत्र संस्थाच्या द्वारें स्वतःचा राज्य कारभार करूं शकले म्हणजे तात्काळ नियंत्रक सत्तेनें आपलें अंग काढून घेतलेंच पाहिजे. ज्याअर्थी उदारमतवादाचा आद्य हेतु व्यक्तीची स्वतंत्रता हा आहे, राष्ट्रीय स्वातंत्र्य नव्हे, त्याअर्थी हें स्पष्टच आहे कीं जेव्हां व्यक्तीची स्वतंत्रता निश्चलपणानें प्रस्थापित झाली असेल तेव्हांच राष्ट्रीय संपादन करतां येत असतें. परकीय उदारमतवादी लोकसत्तेनें हमी दिलेल्या घटनात्मक मर्यादित स्वतंत्रतेच्या जागीं स्वदेशीय हुकूमशाहीची स्थापना करण्यांत जरा देखील उदारमतवाद नाहीं, परंतु दुर्देवानें गेल्या दहा वर्षांत अशीं कांहीं थोडीं उदाहरणें घडून आलीं आहेत.

कम्युनिस्ट हुकूमशाहीच्या आधिपत्याखालीं असणाऱ्या देशांच्या मानानें पश्चिमेंतील वासाहतिक प्रश्नाचें स्वरूप अगदीं स्वल्प आहे. झारशाही आणि मांचुशाही साम्राज्यांचीं शकलें शकलें झाल्यामुळें बऱ्याच दलित लहान राष्ट्रांना बंधनमुक्तता प्राप्त झाली. कीफ आणि उरुमची, टिफलीस आणि ल्हासा, रिगा आणि उर्गा, यांच्यामध्यें स्वातंत्र्य घोषित करण्यांत आलें. रशियनांनीं यादवी युद्ध संपल्याबरोबर युक्रेन, कॉकेशस आणि मध्य आशिया परत जिंकून घेतले व मंगोलिया व्यापला; दुसऱ्या जागतिक युद्धांत पडण्यापूर्वीं त्यांनीं बाल्टिक राष्ट्रें खालसा केलीं; दुसरें जागतिक युद्ध संपलें तेव्हां त्यांचें आधिपत्य आणखी सहा युरोपियन राष्ट्रांवर आणि जर्मनीच्या कांहीं भागावर त्यांनीं स्थापन केलें; माओच्या चिनी लोकांनीं अलीकडेच तिबेटी, विघुरी व मांचुरियन लोकांनीं संपादन केलेलें स्वातंत्र्य संपुष्टांत आणलें. त्यांनीं दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, लाओटिया, थायलंड व नेपाळ येथील जनतेवर जरब बसविली. सोव्हियत आणि चिनी साम्राज्यांमधील राष्ट्रीय अल्पसंख्यांक जमातींची एकूण लोकसंख्या पंचवीस कोटी इतकी असून त्यांनीं संपूर्ण युरोपएवढा विस्तीर्ण क्षेत्रफळाचा मुलूख व्यापून टाकलेला आहे. त्या अल्पसंख्यांक जमातींपैकीं विसांपेक्षां अधिकांचीं राष्ट्रें असून त्यांना त्यांची भिन्न-भिन्न संस्कृति, इतिहास आणि प्राचीन परंपरा आहेत; बाकीच्या निव्वळ वन्य जमाती असून त्यांचा सांस्कृतिक दर्जा आफ्रिकेंमधील रानटी बांटूसजमातीइतका जेमतेम आहे. त्या पंचवीस कोटी लोकांचा कम्युनिस्टेतर जगाशीं फारच अल्प संबंध येतो किंबहुना मुळींच येत नाहीं

म्हटलें तरी चालेल; परंतु त्यांची विस्मृति घडणें शक्य नाहीं, आणि एके सुदिनीं त्यांचें स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं त्यांना आपली मदत देण्याचें उदारमतवादी लोकसत्तावाद्यांचें कर्तव्य आहे.

आंतरराष्ट्रीयत्वानें १८९९ सालीं झालेल्या पहिल्या हेग परिषदेपासून, परमनंट कोर्ट ऑफ् आर्बिट्रेशन (कायमचे लवाद न्यायालय), लीग ऑफ् नेशन्स (राष्ट्रसंघ) आणि संयुक्त राष्ट्र संघ (युनो), १९२६ ते १९३३ पर्यंत झालेल्या आणि अलीकडील शस्त्रसंन्यास परिषदा, १९२८ सालीं झालेला ब्रियाँ-के लॉग पॅक्ट (करार) आणि १९५५ सालीं झालेली समीट परिषद् येथपर्यंत प्रगति केलेली आहे. ठराव आणि घोषणा, करार आणि सनद, यांचें एकमेव उद्दिष्ट शांतता होतें. शांतता कायम राखता आली नाहीं; फारच थोडया लोकांच्या हातीं अत्यंत अधिक अधिकार, हेंच नेहमीं संघर्षाचें एकमेव मूळ होतें; शिवाय जर अधिकाराच्या व्यतिरिक्त हुकूमशाहीच्या हातीं विरोधकांपेक्षां मोठें सामर्थ्य असलें तर परिणामीं युद्ध होतें. शक्तींचा समतोलपणाच फक्त त्याला प्रतिबंध घालूं शकतो. सर्व उदारमतवादी लोकसत्ताक राष्ट्रांचें तात्कालिक उद्दिष्ट शक्तींचा समतोलपणा सांभाळण्याचें आहे. त्याचाच अर्थ हे मैत्रीचे करार, लष्करी तळ, संरक्षण-सिद्धता, लष्करी अंदाजपत्रकें आणि लष्करी खातें होत. ही अनिश्चित शांततेची वर्तमान परिस्थिति किती वर्षे आणि दशकें टिकेल याची आपल्यास माहिती नाहीं. जोंपर्यंत एखादी विश्वव्यापी हुकूमशाही विजयी होत नाहीं, (आणि तसें झाल्यानें मानवी सुधारणा लयास जाईल), किंवा सर्व शक्तिमान् देशांकडून स्वतंत्र संस्थांचा स्वीकार होणार नाहीं, तोंपर्यंत आपल्याला अनिश्चितपणापासून सुस्थिरपणाकडे जाण्यासाठीं तिष्ठतच बसावें लागणार आहे. स्वतंत्र राष्ट्रांच्या जगांत जेव्हां नागरिक आपल्या सरकारांवर नियंत्रण ठेवूं शकतील, अनियंत्रित जुलूमाचा नायनाट होईल, मुक्त निर्वाचन आणि मुक्त मुद्रण कार्यान्वित होईल, मंदगति लोकसत्ताक कार्यपद्धतीच्या द्वारांच निर्णय घेण्यांत येतील, म्हणजेच जेव्हां अधिकारशाहीची जागा उदारमतवादी लोकशाही घेऊं शकेल, तेव्हांच फक्त युद्धाचा धोका नाहींसा होऊं शकेल. स्वतंत्रतेप्रीत्यर्थ जो स्वदेशीं किंवा दूरदेशीं झटत असतो, तो शांततेसाठींदेखील झटत असतोच.

उदारमतवादी लोकसत्तांना नेहमींच अधिकारवादी प्रवृत्ती आणि आंदोलनें यांचे संबंधीं काय करावें, या समस्येला तोंड द्यावेंच लागेल. कारण स्वातंत्र्य असल्या-

मुळें व्यक्ति आणि गट त्यांच्याविरुद्ध उठाव करूं शकतात; हें अगदीं अटळ आहे, आणि ज्यांचें निरसन होणें अत्यंत बिकट आहे, अशा समस्यांपैकीं ही एक आहे. स्वित्झर्लंडमध्यें आणि ग्रेट ब्रिटनमध्यें फॅसिस्ट गटांचें संघटन करणें शुरू झालें होतें, त्याला कांहीं फारसा कालावधि होऊन गेलेला नाहीं; जर्मनीच्या वेमर प्रजासत्ताकानें नाझी व कम्युनिस्ट यांना जे योग आणून दिले, ते त्यांना विल्यमच्या अर्धअधिकारवादी साम्राज्यांत मिळूं शकले नसते; अमेरिकेच्या संयुक्त राज्यांत क्लॅन, अमेरिका फर्स्टर्स, आणि मॅकॉर्थी पंथ होऊन गेले आहेत. हिंदुस्थानांत लोकसंसदीय सांधिक प्रजासत्ताक स्थापन झाल्यापासून अधिकारवादी उजवे आणि एकतंत्रवादी डावे हे अधिक बोलके आणि वजनदार बनले आहेत.

उदारमतवादी लोकशाहीला होणारा विरोध हा एखाद्या स्वतंत्र समाजामध्यें अस्तित्वांत असलेल्या दोषांमुळें निर्माण झालेल्या गंभीर आणि न्याय्य असंतोषाची साधी अभिव्यक्ति असू शकेल. (आपण हें कधींच विसरून चालतां कामां नये कीं स्वतंत्रतेची भूमिका कितीहि तेजस्वी असली तरी ती सुष्टतेप्रमाणें दुष्टतेची देखील निर्मिति करीत असते, तद्वतच परिवर्तनाचा उगम असते आणि वेळोवेळीं परिवर्तनाचा अर्थ दुःख कष्ट हा होत असतो.) या बाबतीत विरोध एका उपयुक्त कार्याची पूर्ति करीत असतो, आणि जे दोष असंतोषाला कारणीभूत झाले असतील त्यांचें निवारण करणें हें उदारमतवाद्याचें कर्तव्य होय, उदारमतवादी लोकशाहीला होणारा विरोध हा दोषांच्या कारणामुळें होत नसून, तो स्वतंत्रतेचे लाभ अथवा उणीवा यांच्यावर ताण करणाऱ्या अधिकारवादी ठाम विश्वासांमधून देखील निर्माण झाला असावा. उच्चाराचें, जाणीवेचें, मुद्रणाचें आणि शिक्षणाचें स्वातंत्र्य हें पापमूलक असतें, असें सर्व देशांमधील परंपरावादी समर्थन करीत असतात. प्रातिनिधिक संस्था दुष्टतामूलक असतात, असें समर्थन दुराग्रही राष्ट्रवादी करीत असतात. राजकीय स्वातंत्र्य ही एक फसवणूक असून, आर्थिक स्वातंत्र्य हें अनिष्ट असतें, असें समर्थन कम्युनिष्ट करीत असतात. या बाबीत निर्णयाच्या अभावाला कांहीं स्थानच नाहीं, हें स्पष्ट आहे. जर हा विरोध मूलतः शोभेच्या झालरीप्रमाणे विलक्षण गोष्ट ( उदाहरणार्थ ज्याप्रमाणें १९१४ च्या आधीं बऱ्याच युरोपांतील राष्ट्रांना सतावून सोडणाऱ्या औरसनिष्ठ, संपनिष्ठ व वंशनिष्ठ प्रवृत्ती, आणि आजची ट्राटस्कीवादी निष्ठा) असेल तर त्याच्याकडे दुर्लक्ष करावें व त्याला तसेंच सोडून द्यावें; उदारमतवादी लोकशाहींत असुखकारक शेजाऱ्यां-

च्या सोबतीनें राहाण्यास लोकांनीं शिकून घेणें आवश्यक आहे, जर असा मूलभूत विरोध स्वतंत्र संस्थांना संकट निर्माण करीत असेल, तर त्याला अवश्य दडपून टाकलें पाहिजे; त्याच्यासाठीं गरज भासल्यास बलप्रयोग करावा आणि त्याचा नाश करावा. ब्रिटिशांनीं स्टुअर्ट औरसनिष्ठांच्या बाबतींत, हेंच केलें होतें, फ्रेंचांनीं कम्युनिस्टांच्या बाबतींत, आणि हिंदी लोकांनीं दख्खनमधल्या कम्युनिस्टां-च्या संबंधीं असेंच केलें होतें. स्वतंत्रतेच्या शत्रूंची केव्हां गय केली पाहिजे आणि केव्हां त्यांचा नाश केला पाहिजे, हें कोणत्याहि पुस्तकांत नमूद केलेलें नाहीं किंवा कुणाहि राजनीतिविशारदाला सांगतां येणें शक्य होणार नाहीं; कशी आणि केव्हां हालचाल करावी याचें ज्ञान असणें, यालाच राजकीय प्रगल्भतेचें एक लक्षण मानतात, अशा प्रकारची प्रगल्भता स्वीस लोकांनीं जेव्हां फॅसिस्ट आणि कम्युनिस्ट संघटना बंडखोर म्हणून न्यायसंरक्षणबाह्य घोषित केल्या तेव्हां त्यांच्या अंगीं होती.

फॅसिझमच्या अवनतीपासून—अधिकारभ्रष्टतेपासून—स्वतंत्रतेला कम्युनिझमचा प्रमुख धोका आहे. टेबलखुर्चीतील कामगारांचा आणि शेतकऱ्यांचा कम्युनिझम हा मुख्यतः आर्थिक दुष्टतेविरुद्ध असणाऱ्या तीव्रतर असंतोषाची एक अभिव्यक्ति होय, ती दुष्टता नष्ट करण्यांत उदारमतवादी लोकशाहीवाद्यांनीं साहाय्य केलें पाहिजे; जगांत कुठेंहि कामगार आणि शेतकरी स्वतंत्रतेचे वैरी असत नाहींत. मनोभंगानें कुढणारे आणि मनोराज्यवादी बुद्धिमंतांच्या, जे आंदोलनाचा गाभा बनलेले आहेत, त्यांच्या कम्युनिझमचें हेतुदर्शन, उदारमतवादी लोकशाही ज्या प्रत्येक गोष्टीचा पुरस्कार करते, तिच्या अत्यन्त सखोल घृणेंतून होत असतें; त्या गोष्टी म्हणजे स्वतःच्या जीवनाचा निर्णयकर्ता होण्याचा एखाद्याचा हक्क आणि त्याचें कर्तव्य, प्रयोगांची विभिन्नता आणि विपुलता यांना अनुकूल असणारी लवचीक समाज-रचना, लोकसंसदीय पद्धतीचें सरकार, विरोध, मतभेद व प्रस्थापित सिद्धांताला अमान्यता यांचेसंबंधीची सहिष्णुता या होत. कम्युनिस्ट रशियाकडून मिळणाऱ्या विपुल साधनसामुग्रीच्या जिवावर कम्युनिझम सामर्थ्यशाली बनल्या-कारणानें निष्ठावंत कम्युनिस्टांना अकलेची गोष्ट आणि समंजस तडजोड यांचें वावडेंच असू शकणार.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम. २८४८२. २५ वि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. १०२७५

REFBK-0010276

स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि.
क्रमांक